# मनोज चापके

# निशासंध्या



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# निशा-संध्या

(एक दिर्घकथा)

## लेखक : मनोज चापके

# निशा-संध्या

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# निशा-संध्या

लेखक : मनोज चापके

पत्ता : 1462, मु. नागेश्वरी पाडा, पो. चिंचणी,

ता. डहाणू, जि. पालघर - 401503 (महाराष्ट्र)

मोबाईल नंबर:- 8446106927

ई-मेल : manojchpk33@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ जानेवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोज चापके



मुंबई युनिवर्सिटी मधून कला शाखेतून बी.एचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर जॉब करता - करता वाचनाची सवय जडली. तसे पाहिले तर वाचनाची आवड आधीपासूनच होती. पण वाचायचं काय? वाचनासाठी गावात जवळपास लायब्ररीची व्यवस्था नाही. मग एखाद्या वर्तमान पत्रातील एखादी गोष्ट, लेख अशा प्रकारच्या वाचनाला सुरवात झाली. पुढे जाऊन एके दिवशी एका मित्राकडून ई-साहित्य वर प्रकाशित झालेली विषामृत ही कथा ई-बुक स्वरुपात मिळाली. अन मग वाचनाचा सपाटा सुरु झाला. ई-साहित्य वरुन खुप सारी पुस्तके डाऊनलोड करुन वाचु लागलो. त्यामध्ये प्रामुख्याने ईश्क, पाठलाग - अनिकेत समुद्रे, डेथ विल - सूरज गाताडे, नागमणी - एक रहस्य - प्रसाद शिर्के, प्लांचेट, पुर्वाभास - सोनाली सामंत, शेवटचा साक्षीदार - संजय काळे, दि सिक्स्थ सेन्स - विनायक पोतदार व विहीर - सुषमा जाधव ह्या लेखकांचे लिखाण खुप आवडले. अनिकेत सुमुद्र ह्यांची लिखाणाची शैली खुपच आवडली. त्यांनी यापुढेही असेच लिहित रहावे अशी माझी मनापासून ईच्छा आहे.

ई-साहित्य ने वाचनाची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल ई-साहित्य प्रकाशन आणि टीमचे खुप-खुप आभार. ई-साहित्यवरची नव-नविन लेखकांची पुस्तके वाचता-वाचता आपणही लिहु शकतो ही जाण होऊ लागली अन एके दिवशी आपणही काहीतरी लिहावे या उद्देशाने लिखाणास सुरवात केली.

लिहता-लिहता पुर्ण कथा लिहून झाली खरी; पण कथेला काय नाव द्यायचे हे सुचत नव्हते म्हणून कथेतील नायिकांचेच नाव कथेला देत आहे. आकाशाची दोन रुपे संध्या आणि निशा.

लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. त्यामुळे वाचकांना विनंती आहे की माझ्या लिखाणात काही कमी राहून गेले असल्यास, कोणाच्या भावना दुखावल्यास क्षमा असावी. तसेच आपल्या प्रतिक्रियांचं स्वागत.

प्रतिक्रिया कोणत्याही असो; अगदी टिकाही चालतील. जरुर लिहा माझा हा पहिला प्रयत्न आपणास कसा वाटला.

मनोज चापके

पत्ता: 1462, मु. नागेश्वरी पाडा, पो. चिंचणी,

ता. डहाणू, जि. पालघर - 401503 (महाराष्ट्र)

मोबाईल : 8446106927

ई-मेल : manojchpk33@gmail.com

या कथेतील पात्र, नावे तसेच ठिकाणं काल्पनिक असून त्याचा कोणत्याही जिवित अथवा मृत व्यक्तिशी काहिही संबंध नाही. तसा  काही संबंध आढळल्यास तो केवळ एक योगा-योग समजावा. तसेच या कथेतून लेखकाचा कुणाच्याही भावना दुखावण्याचा हेतु नाही. अजाणतेपणी कुणाच्या भावना दुखावल्या गेल्यास क्षमा असावी.

# १

इतर दिवसाच्या तुलनेत तसा आज तो थोडा उशिराच उठला.

उठला म्हणजे झोपेतून जागा झाला पण बिछान्यात नुसताच पडून होता.

तसं सुट्टी असो अथवा वर्कींग डे असो तो नेहमी वेळेवर उठुन सकाळचा मॉर्निंग वॉक, एक्सरसाईज आटपून मग अंघोळ, तयारी नी मग चहा - नाश्ता करुन ऑफिस ला जाणे हे त्याचे रुटीन होऊन गेले होते.

अगदी सुट्टीच्या दिवशी देखिल तो न चुकता वेळेवर उठुन सकाळचा मॉर्निंग वॉक, एक्सरसाईज वेळेवर आटपायचा.

पण आज कुणास ठाऊक काय झाले होते. बिछान्यावर पडल्या-पडल्या कोणत्या तरी विचारात मग्न होऊन गेला होता तो.

अन अचानक खालून मालती बाईंची हाक आली “अरे आकाश येतोय न खाली; मी नाश्ता न चहा मांडलाय टेबल वर, की पाठवु वरच” अन त्याची तन्द्री भंगली.

तो तसाच उठला “अगं आई येतो खालीच” असे बोलून अंघोळीसाठी बाथरुम मध्ये शिरला.

मालती बाई म्हणजे एक प्रेमळ व्यक्तिमत्व, प्रत्येक व्यक्तिशी प्रेमळ पणे वागत त्या. आकाशचे वडील गेल्यापासून आकाश एकमेव आधार होता त्यांना, अन त्यांचा आकाशला.

आकाशचे वडील एका छोट्या कंपनीत क्लेरीकल पदावर कार्यरत होते तरी सुद्धा घराची उत्तम जबाबदारी ते पार पाडत होते. पण त्यांना अचानक आलेल्या ह्रदयविकाराच्या झटक्याने आता घरची पुर्ण जबाबदारी आकाश वर पडली होते अन ती जबाबदारी तो उत्तम रित्या पार पाडत होता.

वडील गेल्यापासून आकाश ने स्वत:च्या अथांग मेहनतीने प्रथम एक वर्कशॉप चालु केले होते अन आता बघता-बघता त्या वर्कशॉपचे एक छोटया इंडस्ट्री मधे रुपांतर झाले होते. पण यामागे आकाश ची अथांग मेहनत कामी आली होती, तसेच त्याने आपल्या अपेक्षा, आपली स्वप्ने याचा देखिल त्याग केला होता हे सर्व उभं करण्याकरिता. आपल्या मेहनतीच्या जोरावर आज त्याने आपल्या परिस्थितीवर मात करुन स्वत:चे घर, गाडी आणि बँक बॅलेन्स हे सर्व काही मिळवले होते.

शॉवर घेताना देखिल त्याचे मन कसल्या तरी विचारात गुंतले होते. अन एवढ्यात दारावरच्या टक - टक आवाजामुळे तो भानावर आला.

बाहेरुन मालती बाई आवाज देत होत्या “अरे काय रे आकाश अजून किती वेळ”, “अगं आई तू जा खाली मी आलोच”, आकाश

तसा तो पटकन बाथरूम मधून निघून बेडरुम मध्ये गेला अन कपडे घालून तयार होऊन नाश्ता करण्यासाठी टेबल वर जाऊन बसला.

मालती बाई त्याची टेबल वर कधीपासून वाट बघत बसल्या होत्या.

“काय आकाश काय झालं आज एवढा उशिर, बर नाहीए का तुला?”, मालतीबाई

“तसं काही नाही ग आई, जरा ऑफिसच्या कामाचा ताण आहे बस्स” एवढे बोलून आकाश नाश्ता करण्यात गुंग झाला.

आज सकाळपासूनच मन जरा बेचैन वाटत असल्यामुळे त्याने बाहेर फिरायला जायचे ठरविले. तसे त्याला फिरायला आवडत असे पण वडिल गेल्यापासून जबाबदारी अन ऑफिस मुळे त्याला बाहेर फिरायला जाण्यासाठी वेळच मिळत नसे. त्याने आपल्या खिशातून मोबाईल काढला अन निशाला फोन लावला; पण तिचा मोबाईल नॉट रिचेबल येत होता. त्याने परत दोन-चार वेळा प्रयत्न करुन पाहिला पण तिचा नंबर काही केल्या लागेना. शेवटी त्याने हताश होऊन मोबाईल बाजुला ठेऊन दिला.

निशा म्हणजे आकाश ची गर्लफ्रेन्ड. पण गर्लफ्रेन्ड असे ही म्हणता नाही येणार कारण आकाश तिच्या बाबतीत अजून शुअर नव्हता.

कारण काही खास नव्हते पण आकाश ला जशी मुलगी हवी होती तशी ती नव्हती. म्हणजे अगदिच दिसण्याला वाईट नव्हती पण तरी प्रत्येकाच्या मनात एक गर्लफ्रेन्डबद्दलची प्रतिमा असते तशी नव्हती. अन नुकतीच एक महिन्या पुर्वी आकाश आणि निशा ची फेसबुक वरून ओळख झाली होती.

निशा आता T.Y.B.Com. ला होती. त्यांची ओळख झाल्यापासून अवघ्या वीस दिवसांतच निशाने आकाश ला प्रपोज केले होते. पण आकाशचे म्हणणे होते आपण थोडा वेळ घेउ म्हणजे आपल्यात प्रेम आहे की आकर्षण ते आपल्याला समजेल. आणि निशाला सुद्धा त्याचे हे म्हणणे पटले होते. म्हणूनच त्यांचे प्रेम कम् मैत्री अजूनच घट्ट होत चालली होती.

निशा तशी खुप समजदार मुलगी होती. ती जरी आकाशच्या प्रेमात पडली असली तरी तिची पुढची दिशा क्लिअर होती. म्हणजे B.Com. पुर्ण झाल्यावर तिला Finance मध्ये MBA करायचे होते.

तो स्वतःशीच पुटपुटला “निशाचा फोन का नॉट रिचेबल येत असावा”. अन त्याला पटकन क्लिक झाले निशाचा आज एक्स्ट्रा क्लास होता. परिक्षा जवळ असल्यामुळे अन पोर्शन पुर्ण न झाल्या मुळे सरांनी रविवार असून देखिल एक्स्ट्रा क्लास ठेवला होता.

त्याने परत आपला मोबाईल उचलला अन अव्या ला फोन लावला.

“हॅलो, अरे अव्या वीस मिनिटात चौकात थांब, मी आलोच” एवढेच बोलून आकाशने फोन कट केला आणि तो गाडिची चावी घेऊन बाहेर पडला.

अव्या म्हणजेच अविनाश, आकाशचा बालपणापासूनचा खास मित्र, दोघही एकाच शाळेत, एकाच वर्गात शिकले. अव्या प्रत्येक सुख - दुःखात अकाशच्या सोबत असायचा. एक-मेकांचे जिवलग मित्र होते दोघेही.

आकाश गाडी घेऊन चौकात पोहोचला तिथे अव्या त्याची वाट बघत थांबला होता.

“अरे काय रे हे आकाश मी बोलतो न बोलतो तोच तू फोन कट केलास, प्रत्येक वेळी असंच असते तुझं, बोल आता लवकर काय काम आहे. मला एका क्लाईंटला भेटायचं आहे. आपण इव्हीनिंगला भेटलो असतो तर...” अविनाश

तसा आकाश बोलला “अरे अव्या काही कारण नसताना तुला मी नुसतच बोलावलं असतं का असं?

“आणि तू तुझ्या क्लाईंटना अटेंड कर अथवा नको करु तुला काही फरक पडणार आहे का? तुझं कमिशन तुझ्या बॅंक अकाउंट मध्ये वेळेवर जमा होयचे ते होणारच आहे न” आकाश

तसं आकाशचं बोलणं ही बरोबरच होतं, कारण अविनाश एका मार्केटींग बिझनेस मध्ये उच्च पदावर होता आणि आता त्याने काहिही नाही केलं तरी त्याच्या हाताखाली काम करत

असलेल्या माणसांनी केलेल्या कामातील कमिशन त्याच्या खात्यात आपोआप जमा होत होते, एकंदरीत अविनाशला आता बसल्या बसल्या पैसे मिळत होते.

“अरे अव्या आज सकाळपासूनच जरा बेचैन-बेचैन वाटतेय म्हणून तुला फोन करुन भेटायला सांगीतलं, वाटल जरा फिरुन येऊ म्हणजे बरं वाटेल. असे बोलून आकाशने अविनाश ला गाडीत बसायला सांगितले अन गाडी स्टार्ट करुन त्याने पळवायला सुरवात केली.

दोघेही पुढच्या सिटवर बाजु बाजुला बसून देखिल आकाश काहिच बोलत नाही म्हणून अखेर अविनाशने FM चालु केला.

FM वर गाण वाजत होतं 'तुम बिन जीया जाए कैसे, कैसे जीया जाए तुम बिन' आणि गाण ऐकताच आकाशच्या मनाची चलबिचल अचानक वाढली, ती त्याच्या चेहऱ्यावरुन अविनाशला स्पष्ट जाणवत होती.

आता आकाशने एका मॉल समोर गाडि पार्क केली आणि अविनाशला तो म्हणाला “आपण आज मॉल मध्ये जाऊया.”

आकाशच्या लहरी मुड ची आता अविनाशला चांगलीच सवय झालेली होती त्यामुळे अविनाश आकाश सोबत फिरायला निघाला की कुठेही जाण्यासाठी सदवै तयार असे.

दोघही मॉल मध्ये शिरले, अविनाश विनाकारण काही वस्तु न्याहाळण्यात गुंग झाला अन आकाश सुद्धा वस्तु न्याहाळता न्याहाळता त्याची नजर एका फ्रेम वर खिळली.

त्या फ्रेम मधिल एक टुमदार घर, घराच्या बाजूने वाहणारा एक छोटासा ओढा अन त्या ओढयावर असलेला एक लाकडी पुल, सर्वीकडे पसरलेली हिरवळ; फ्रेम मधिल ह्या मोहक सौंदर्याने त्याचे मन भुतकाळातील आठवणीत बुडाले.

लहानपणी शाळेच्या बाजुने वाहणारा ओढा, त्यावरील लाकडी पुल अन कधी कंटाळा आला तर शाळेतील एखादा तास बुडवून त्या पुलावर बसून पाण्यात पाय मोकळे सोडून आपल्याच विश्वात हरवून जाणे....

कुणाचा तरी धक्का लागला तसा आकाश भानावर आला. “अरे अव्या कुठ आहेस”, 'अरे हा काय इथंच तर आहे ' अविनाश एक कॉफिचा मग न्याहाळत बोलला.

दोघही पुढे चालु लागले अन अचानक आकाशला तिची एक झलक नजरेस पडली...

दुसऱ्याच क्षणी त्याच्या मनात एक विचार तरळून गेला, ती इथे कशी काय असू शकते? नाही ती नसावी, मलाच भास झाला असावा....

आपल्या मनातील तिच्याबद्दलचा विचार बाजूला सारुन तो परत काही वस्तु न्याहाळण्यात मग्न झाला.

अचानक त्याची नजर समोर गेली....

आणि ती त्याच्या नजरेस पडली, हो तीच होती ती.

तीचीही नजर आकाशच्या नजरेला भिडली. आता आकाशला पुर्ण खात्री पटली की आपला तो भास नव्हता तर खरंच ती होती त्या वेळी.

पण सकाळपासून ज्या व्यक्तिच्या आठवणीने मन उदास होते ती अशी अचानक समोर येईल असे स्वप्नात देखिल त्याला वाटले नव्हते.

# २

संध्या...

संध्या, आकाश १०वी ला असताना त्याच्याच वर्गात शिकणारी एक साधारण मुलगी, दिसणं साधारणच, गव्हाळ वर्ण, सडपातळ अन नाजूक बांधा अन संपूर्ण शरीरयष्टीला शोभणारे काळे अन टपोरे डोळे. मोजून दोन-चार मैत्रीणी आणि त्या मैत्रीणी मध्येच रममाण असणारी, आजु-बाजुच्यांशी काहिही घेण-देणं असणारी अशी ती...

अविनाशने आपल्या उजव्या खांद्याने आकाशच्या डाव्या खांद्याला झटका दिला अन आकाश चाचपडत भानावर आला.

“कसली भारी आयटम आहे न आकाश, अन ती तुला लाईन पण देते बघ” असे बोलून अविनाश मिष्कीलपणे हसला.

“काय रे अव्या, तू पण न. एखादी मुलगी बघितली की लागतो लगेच माझ्यासाठी बघायला.”

“काय करणार आकाशराव, बाई सरकारांचा तसा आदेशच आहे आम्हाला” असे मिष्किलपणे बोलून पुन्हा एकदा अविनाश हसला.

अविनाश म्हणजे आकाशच्या एकदम विरुद्ध व्यक्तिमत्व. आकाश कसा बुजऱ्या स्वभावाचा, पटकन कोणातही न मिसळणारा, कोणासमोर सहजा सहजी व्यक्त न होणारा. आणि अविनाश म्हणजे एकदम फ्लर्टी माणूस, कोणालाही आपल्या बोलण्यात भुलवणारा, गंडवणारा. कितीतरी मुलींबरोबर लफडी करुन आता संसाराच्या बेडीत अडकलेला असा हा अविनाश.

तसं पाहिल तर मालती बाईंनी खुप वेळा आकाशला लग्नाबद्दल विचारुन झालं होतं, पण आकाश आता २७ वर्षाचा होऊन देखिल लग्नाचा विचार करत नाही म्हणून मालती बाईंनी ही जबाबदारी अखेर आकाशच्या जीवा-भावाच्या मित्रावर म्हणजेच अविनाशवर सोपवली होती.

"चल रे अव्या," असे बोलून आकाश अन अविनाश दोघेही मॉलच्या बाहेर पडले अन गाडित जाऊन बसले.

अविनाशच्या घराजवळचा चौक आला तरी आकाशने गाडी थांबवली नाही.

"अरे आकाश थांब की, घर आले माझे"

पण आकाश गाडी थांबवण्याच्या मुड मध्ये नव्हता. खुप दिवसांनी ते दोघे एकत्र भेटले होते अन म्हणून आज आकाश त्याला आपल्या घरी जेवणासाठी घेऊन जायच्या विचारात होता.

"अरे अव्या आज माझ्या घरी तुझे जेवण" असे बोलुना आकाशने गाडी आपल्या घराच्या वाटेला घेतली.

आकाश आणि अविनाश दोघे आकाशच्या घरी आले तेव्हा मालती बाई आकाश ची जेवणासाठी वाटच बघत होत्या. अविनाशला बघून त्यांना आनंदच झाला.

"अरे अवि आज वाट चुकलास की काय?" मालतीबाईंनी अविनाश ला प्रश्न केला. कारण खुप दिवसांनी अविनाश आकाशच्या घरी आला होता.

तसे आकाश आणि अविनाश वरचेवर बाहेर नेहमी भेटत असत.

"नाहि काकु' कामाच्या दग-दगीमुळे घरी येणं जमतच नाही. त्यामुळे प्रथम मी तुमची माफ़ी मागतो", अविनाश

“ओके, ठिक आहे; पहिले तुम्ही जेऊन घ्या अन मग बसा गप्पा मारत” असे बोलून मालतीबाई दोघांना ताट वाढुन देण्यासाठी गेल्या.

दुपारचे जेवण आटोपले आणि अविनाश मालतीबाई आणि आकाशचा निरोप घेऊन घरी जाण्यासाठी निघाला. आणि आकाश आपला लॅपटॉप ओपन करुन ऑफिसच्या कामात बिझी झाला.

ट्रींग, ट्रींग मोबाईल वाजला तसा आकाशचे लक्ष मोबाईलकडे गेले.

आकाशने मोबाईलकडे पाहिले तर निशाचा फोन होता. आकाशने दुर्लक्ष केले.

परंतु पुन्हा आकाशचा फोन वाजला, पुन्हा निशाचाच फोने होता; शेवटी आकाशने नाईलाजाने फोन उचलला.

“अरे आकाश. संध्याकाळी भेट. आपण मस्त फिरुया, आणि मला थोडी शॉपींग पण करायची आहे”. पण आकाशने तिला आपले काहितरी महत्वाचे काम असल्याचे सांगून भेटण्याचे टाळले आणि फोन ठेऊन दिला.

पण काही क्षणातच त्याला असे वाटून गेले की आपण निशाला खोट बोलायला नको होतं, तिचा मनाला वाईट वाटले असेल. बिचारी भेटतेच कधी आपल्याला सन्डे व्यतिरिक्त.

पुन्हा त्याने आपले डोके लॅपटॉप मध्ये खुपसले आणि तो आपले काम करु लागला.

एवढ्यात मालतीबाई त्याच्यासाठी कॉफी घेऊन आल्या.

“आकाश, कधीपासून काम करतोस, आधी कॉफी पिऊन घे बरं” तसं आकाशने लॅपटॉप बाजुला ठेवला अन तो कॉफी पीऊ लागला.

“आकाश, मला तुझ्याशी थोड बोलायचं होत” मालतीबाई बोलु लागल्या.

“अगं बोल आई, त्यात कसली पर्मिशन मागायची” आकाश उत्तरला.

“आकाश. तुला तर माहितच आहे तुझे वडिल गेल्यापासून मी व्यवस्थित जबाबदाऱ्या पार पाडल्या, पण आता वयानुसार मला नाही झेपत रे, म्हणून माझ्या एका मैत्रीणीच्या नात्यातली एक मुलगी आहे, तुझ्यासाठी तिला विचारावं असं मला वाटत होत”.

“आई मला तुझ्या मनाची घालमेल कळते, पण प्लिज मला थोडा वेळ हवा आहे. ॲटलिस्ट ६ महिने”, असे बोलून आकाशने मालतीबाईंना आश्वस्त केले. आणि जर ६ महिन्यात मी तुझ्यासाठी सून शोधण्यात असमर्थ ठरलो तर मग तू ज्या मुली बरोबर सांगशील त्या मुली बरोबर मी लग्न करेन असे बोलून आकाश मोकळा झाला.

पण त्याच्या मनात एक विचार तरळून गेला, खरंचं ६ महिने पुरेसे आहेत का? संध्याच्या बाबतीत जाणून घेण्यासाठी.

आणि तिच्या जीवनात अजून कोणी नसेल कशावरुन? संध्याचा विचार मनातून जातो न जातो तोच निशा चा विचार त्याच्या मनात आला “अन निशाच काय करायचं?” कि तिलाच आई समोर उभ करावं लागणार? पुरता गोंधळून गेला बिचारा.

“हे बघ आकाश. मी तुझ्यावर लग्नासाठी दबाव नाही आणत, पण तू आता लग्नाचा विचार करायलाच हवा; माझे एवढेच म्हणणे आहे. कारण मी काय आयुष्यभर तुझ्या सोबत राहणार नाही मिळत. तेव्हा तू तुझा जोडीदार निवडावा एवढीच माझी इच्छा आहे” असे बोलून मालतीबाई खाली निघून गेल्या.

आकाशने आपले काम आटोपून लॅपटॉप बाजुला ठेऊन दिला, तोपर्यंत संध्याकाळचे ६ वाजून गेले होते. काम करुन थोडा थकवा जाणवत होता म्हणून त्याने थोडे फिरुन येण्याचे ठरविले. पण एकटयालाच बाहेर जाण्याचा कंटाळा आला म्हणून त्याने फिरायला जाण्याचा विचार बाजुला ठेवला अन निशाला फोन लावला.

आकाशने अजूनपर्यंत निशाच्या प्रेमाला होकार दिलेला नसला तरी त्यांच्या दोघांमध्ये मैत्रीचं चांगल नातं होतं, तिच्यासोबत फिरणे, गप्पा मारणे आकाशला आवडायचं, आणि आकाशने आजपर्यंत जरी आपल्याला होकार दिला नसला तरी एक न एक दिवस तो आपल्याला नक्की हो सांगेल असे निशाला नेहमी वाटे.

निशाशी बोलता बोलता, इकडच्या - तिकडच्या गोष्टी करता करता वेळ कधी निघून गेला त्याला कळलेच नाही. शेवटी निशाला बाय करुन त्याने फोन ठेऊन दिला.

रात्रीच्या जेवणानंतर शतपावलीला जाणे हा माय-लेकाचा नित्याचा कार्यक्रम. कारण आकाश दिवसभर ऑफिसला असल्यामुळे माय-लेकाचे सहसा बोलणे चालणे होत नसे. म्हणून दिवस भराच्या गप्पा-टप्पांसाठी खास राखुन ठेवलेली ही वेळ.

“आकाश, तुला कोणी आवडते का? खरं तर दुपारी जेव्हा विषय निघाला अन तू तुला थोडा वेळ हवा आहे असे बोलला तेव्हाच हा प्रश्न मला पडला, पण ती वेळ योग्य नाही असे वाटल्यामुळे मी त्यावेळी तुला विचारणे टाळले”.

त्यावेळी आकाशने फक्त होकारार्थी मान हलवली आणि मालतीबाई पुढे काही विचारणार इतक्यात “आई. वेळ आली की तुला सर्व काही सांगेन मी, तुर्तास हा विषय नको” असे बोलून तो विषय तिथेच संपवला.

शतपावली करुन तो बिछान्यावर पडला अन पुन्हा त्याचे मन खोल भुतकाळात शिरले....

आज मॉल मध्ये पाहिलेली ती, अन शाळेत असतानाची ती, व्यक्ति एकच पण कीती वेगवेगळया.

शाळेत असताना नेहमी केसाला खुप तेल लाऊन दोन वेण्या बांधलेल्या, मग शाळा असो अथवा एक्स्ट्रा क्लास. पण एक विशेष गोष्ट अशी की ती नेहमी न चुकता केसात लाल रंगाचे गुलाब माळायची... आणि त्यामुळे साधारण असून सुद्धा ती विशेष होती. प्रत्येकाला एकच प्रश्न पडायचा की हिच्या घरी गुलाबाची बाग तर नाही ना?

अन् आज अचानक मॉल मध्ये समोर आलेली ती, केस मोकळे सोडलेले, कानाच्या दोन्ही बाजूने बाहेर निघालेल्या वलयांकीत केसाच्या बटा, दोन्ही भुवयांच्या मधोमध लावलेली चन्द्रकोर बिंदी, चेहऱ्यावर मंद हास्य अन मध्यम बांधा असलेली शरीरयष्टि.... एकंदरीत एखाद्या सिनेनटीप्रमाणे अप्रतिम सौंदर्य.

तिला बघून एकवेळ आकाशही कोड्यात पडला होता, हिच ती संध्या का? पण केवळ तिच्या काळया अन टपोरे डोळया वरुन त्याने तिला अचुक ओळखले होते.

तिचा विचार करता-करता त्याचा कधि डोळा लागला हे त्यालाही समजले नाही. सकाळी त्याला जाग आली तेव्हा सकाळचे सहा वाजून गेले होते.

सकाळचं रुटीन आटोपून तो ऑफिसला जाण्या साठी निघाला.

आज ऑफिसच्या कामामध्ये त्याचं मन लागत नव्हतं. राहून राहून त्याच्या मनात संध्याचाच विचार येत होता. शेवटी त्यानं ठरवलं काहीही करुन आपण संध्याचा शोध घ्यायचा.

पण कसा? त्याच्या डोक्यात एक कल्पना सुचली. त्याने आपला लॅपटॉप काढुन पटकन फेसबुक चा पेज ओपन केला. सर्च मध्ये संध्या XXXXX टाकून सर्च केले.

त्याच्या समोर १५-२० प्रोफाईल्स आल्या, कुणाच्या प्रोफाईल वर रिअल पिक्स, कुणाच्या प्रोफाईल वर सिने नटींचे पिक्स, कुणाच्या प्रोफाईल वर छोटया मुलांचे पिक्स तर कुणाच्या प्रोफाईल वर आणखी कसले पिक्स होते.

पण त्याला जी प्रोफाईल हवी होती ती नव्हती. म्हणून त्याने नेक्स्ट पेज वर क्लिक केले. पुन्हा १५-२० प्रोफाईल्स समोर आल्या. त्याने ओझरती नजर त्यावरुन फिरवली. अन त्याला तो चेहरा दिसला. तसा त्याने पटकन त्या प्रोफाईल वर क्लिक केले.

प्रोफाईल पिक्चर मध्ये एकापेक्षा एक असे सुंदर सुंदर पिक्स तिने अपलोड केलेले होते. त्यापैकी एक पिक आकाशला खुप आवडला म्हणून त्याने तो आपल्या लॅपटॉप वर डाऊनलोड करुन घेतला.

मोबाईल अपलोडेड वर त्याने क्लिक केले.... त्यामध्ये तिच्या लहानपणीचे, शाळेतले असे २-४ पिक्स होते. ते पाहून आकाशला खात्री पटली कि हीच ती संध्या.

आता त्याने आपला मोर्चा तिच्या अ‍ॅड्रेसकडे वळविला. पण तिने तिचा जुनाच अ‍ॅड्रेस प्रोफाईलवर ठेवला होता. तसा तो थोडा नर्वस झाला...

शेवटी न रहावून त्याने तिला फ्रेन्ड रिक्वेस्ट पाठवायचे ठरविले.

त्याने सेंट फ्रेन्ड रिक्वेस्ट वर क्लिक केले पण तिच्या अकाउन्ट सेटींग मुळे त्याची फ्रेन्ड रिक्वेस्ट सेन्टच झाली नाही, आणि त्याची चल-बिचल अधिकच वाढली.

तो आपल्या चेअर वरुन उठुन ऑफिस मध्ये येरझाऱ्या मारु लागला. अन त्याला अचानक काही आठवल्यागत झाले.

तसा तो परत आपल्या चेअरवर येऊन बसला. त्याने पुन्हा एकदा आपली नजर तिच्या प्रोफाईल वरुन फिरवली.

आणि त्याच्या हाती एक लिंक लागली. तिच्या प्रोफाईल मध्ये प्रोफेशनच्या कॉलम मध्ये ती अमुक एका बॅंकेत जॉब वर होती असे दर्शवत होते. आणि त्याच्या माहिती प्रमाणे त्या बॅंकेच्या दोन शाखा त्याच्या शहरात होत्या. आता त्याच्या चेहऱ्यावर मंद हास्य अवतरुन गेले.

त्याने मनोमन ठरविले आज ऑफिस मधून लवकर निघून त्या बँकेच्या दोन शाखे पैकी जवळच्या शाखेत संध्या कार्यरत आहे की नाही त्याचा ठाव-ठिकाणा लावायचा. आणि तो आपल्या ऑफिसच्या कामात बिझी झाला.

दुपारहून एका बिझनेस पार्टीबरोबर असलेल्या तातडीच्या मिटींगमुळे त्याला आपण केलेला सकाळचा संध्याच्या बाबतीतला प्लान कॅन्सल करावा लागला. त्याने मनाशी ठरविले आज नाही जमले तर हरकत नाही उद्या आपण नक्की जायचे.

मिटींग संपून ऑफिस मधून बाहेर निघता-निघता संध्याकाळचे ७ वाजून गेले होते.

तो तसाच बॅग घेऊन बाहेत निघाला, आपली बॅग त्याने गाडित टाकली आणि तो ड्राइव्ह करायला लागला.

अर्ध्या रस्त्यात पोचतो न पोचतो तोच त्याचा फोन खणाणला. त्याने फोनकडे लक्ष दिले तर डिस्प्ले वर निशाचे नाव झळकत होते.

थोडावेळ मोबाईल तसाच वाजत राहिला अन बंद झाला. आकाशने गाडी एका चहाच्या टपरीच्या बाजुला पार्क केली आणि चहा ची ऑर्डर दिली.

त्याने मोबाईल घेतला अन निशाचा नंबर डायल केला “हेलो, हा निशा बोल”.

'अरे कुठे आहेस, मी मगापासून फोन लावतेय', निशा.

“अगं आज मिटींगमुळे ऑफिस मध्ये वेळ झाला, अन ड्रायव्हिंग करत होता म्हणून मोबाईल उचलला नाही”, आकाश

“ओके. ऐक ना, उद्या संध्याकाळी मला कॉफिशॉप मध्ये भेट. तुझ्याशी महत्वाचं बोलायचं आहे”. अगं पण निशा.... तोपर्यंत तिने कॉल कट केला होता.

आकाशला माहित होते निशा किती हट्टी मुलगी होती तिला पुन्हा कॉल करुन सांगितले असते की मला उद्या भेटणे जमणार नाही तरी ती ऐकली नसती म्हणून त्याने कॉल न करणेच पसंत केले.

चहा घेतल्यावर त्याला थोडे तरतरीत वाटले. तसा तो परत घराकडे निघाला.

आकाश अरे आज येण्यासाठी खुप उशिर झाला. मालतीबाईंनी आकाशला प्रश्न केला.

“अगं आई आज एक महत्वाची मिटींग होती, अन एवढे दिवसांपासून मी ज्या प्रोजेक्ट ची वाट पाहत होतो. तो प्रोजेक्ट मला मिळाला आहे. आज मी खुप खुश आहे”, आकाश

अरे व्वा. ही तरी खुप आनंदाची बातमी आहे, मग तर आज तुझ्या पसंतीचं स्विट व्हायला पाहिजे असं बोलून मालतीबाई किचन मध्ये गेल्या.

जेवणं होऊन माय-लेक शतपावलीसाठी निघाले, आकाश थोडा गप्प-गप्प होता. ते पाहून मालती बाई “काय रे आज गप्प-गप्प का?”

“काही नाही गं आई, आज ऑफिसमध्ये जरा जास्त काम होत म्हणून जरा थकल्यासारखं वाटतंय” असे बोलून तो मोकळा झाला. पण कारण काही वेगळेच होते. एक तर सकाळी ऑफिस मधून लवकर निघून संध्याचा तपास करण्याचं त्याचं प्लानिंग पुर्णपणे फिस्कटलेलं होतं अन दुसरे म्हणजे निशाचा उद्या भेटण्यासाठी आलेला कॉल.

आजपासून त्याच नविन प्रोजेक्टवर काम चालु होत होतं, त्यामुळे ऑफिसमध्ये कामाचा खुप लोड होता.

मोबाईल ची मॅसेज टयुन वाजली. त्याने मोबाईल स्क्रिनकडे कटाक्ष टाकला. निशाचा मॅसेज होता. “संध्याकाळी 4:30 वाजता, अमुक एक कॉफीशॉप... “

तिला हर्ट होऊ नये म्हणून त्याने तिच्या मॅसेज चा रिप्लाय केला “Ok Dear..”.

त्याने ठरविले आपण दुपारी 3:30 ला ऑफिस मधून बाहेर पडायचे अन संध्या ज्या बँकेत जॉबला आहे त्या बँकेची आपल्या शहरातील जी जवळची शाखा आहे तिथे जाऊन संध्या त्या शाखेत कार्यरत आहे का ह्याची शहानिशा करायची अन मग निशाला भेटायला जायचे.

ठरल्या प्रमाणे त्याने ठिक 12:00 वाजता ऑफिस मधील सिनिअर स्टाफची मिटींग बोलवली. त्यामध्ये आजपासून आपण चालु केलेला प्रोजेक्ट आपल्यासाठी किती महत्वाचा आहे वगैरा वगैरा... अन त्या प्रोजेक्ट ची रुपरेषा अशा काही गोष्टी डिस्कस झाल्या.

अन मग त्याने आज आपण ह्या प्रोजेक्टच्या संदर्भात एका डिलरशी मिटींग करण्यासाठी दुपारहून लवकर बाहेर जात आहोत तेव्हा तुम्हा सर्व सिनिअरची जबाबदारी आहे ऑफिस सांभाळायची असे सांगून मिटींग आटोपती घेतली.

डिलरशी मिटींग वगैरा काही नव्हते. पण का म्हणून आपल्या पर्सनल लाईफ मधलं आपल्या स्टाफला सर्व सांगायला पाहिजे? म्हणून त्याने मुद्दाम मिटींग असल्याची थाप मारली होती.

3:40 ला तो ऑफिस मधून बाहेर पडला. जवळ जवळ 4 वाजेच्या दरम्यान तो त्याच्या शहरातील त्या बँकेच्या जवळील शाखेपाशी पोहोचला. बँकेच्या मेन डुअर जवळच त्याने गाडी पार्क केली अन गाडितूनच सिक्युरिटी गार्डला  इशाऱ्याने जवळ बोलावले.

“बोला साहेब काय काम आहे?”, सिक्युरिटी गार्ड

“संध्या नावाची कोणी लेडी बँकमध्ये काम करते का?”, आकाश

“माफ करा साहेब; पण अशी खाजगी माहिती आम्ही कुणालाही बाहेरच्या व्यक्तिला देत नाही”, सिक्युरिटी गार्ड

आकाशने त्या सिक्युरिटी गार्डच्या बोलण्याचा रोख ओळखला. त्याला माहित होते असे कुणी कोणासाठी फुकटात काम करत नाही. आकाशने पटकन आपल्या पर्समधून 500 ची नोट काढुन त्या सिक्युरिटी गार्डच्या शर्टच्या खिशामध्ये टाकली.

तसा त्या सिक्युरिटी गार्डच्या बोलण्यात कमालीचा फरक पडला. “बोला साहेब, कोणत्या लेडीबद्दल तुन्ही विचारतायत. म्हणजे त्या कशा दिसतात? साधारण कोणत्या वयोगटातील आहेत? वगैरा.. वगैरा...”

“हे बघ म्हणजे माझ्याच वयोगटातील, मध्यम बांधा असलेली, काळे अन टपोरे डोळे, लडिवाळ केस....” असे साधारण पणे संध्याचे वर्णन आणि नाव त्याने सिक्युरिटी गार्डला सांगितले.

“नाही साहेब. या बॅंकेत जेन्ट्स व्यतिरिक्त फक्त दोनच लेडी स्टाफ आहे. आणि तुम्ही सांगितलेल्या वर्णनाची अन तुमच्या वयाची अशी एकही बाई नाही बघा साहेब”, सिक्युरिटी गार्ड

“तुला पक्की खात्री आहे का?”, आकाश

“हो साहेब. एकदम खात्रीनेच सांगतो बघा”, सिक्युरिटी गार्ड

“ओके, ठिक आहे.” असे बोलून आकाशने गाडी स्टार्ट केली आणि तो कॉफीशॉपच्या रस्त्याला लागला.

“शी. विनाकारण त्या गार्डच्या खिशात पाचशे रुपये टाकले”, आकाश स्वत:शीच पुटपुटला. कारण पैसे खर्च करुन देखिल त्याला हवी असलेली माहिती मिळालेली नव्हती.

तो कॉफिशॉपवर पोचला तेव्हा निशा त्याची वाट बघत बसली होती.

“I am sorry Nisha, ते ट्राफिकमुळे थोड....” आकाशचं बोलणं पुर्ण होते न होते तोच निशा बोलली “त्यात काय एवढ मोठ आकाश, मी पण आत्ताच आली आहे.”

आपली थाप पचली म्हणून आकाशला हायसं वाटल. तो मनोमन “सुटलो बाबा”

“बोल. का बोलवलंस मला इथे?”, आकाश

“आकाश अरे मला तुझ्याशी थोड महत्वाच बोलायचं होतं, जे फोनवर बोलणं शक्य झालं नसतं म्हणून तुला इथे बोलवलं”, निशा

“हम्म, बोल आता”, आकाश

तेवढयात, “अरे आकाश तू इथे काय करतोस” अविनाशने आकाशला आवाज दिला. योगायोगाने तोही तिथेच होता.

“हाय अव्या” आकाशने अविनाशला आवाज दिला पण त्याच तिथं असणे आकाशला आवडलं नाही. “ह्याला पण हेच कॉफिशॉप दिसलं का?” आकाश स्वत:शीच पुटपुटला.

“हा कोण?” निशाने आकाशला प्रश्न केला.

“अगं निशा माझा बालपणापासूनचा मित्र आहे”, आकाश

“ह्याला पण आत्ताच यायचं होतं का?” निशा स्वत:शीच पुटपुटली

“हो नं”, आकाश

तिचं पुटपुटणं आकाशच्या कानापर्यंत गेलं अन आकाशने पण प्रतिक्रिया दिली

दोघंही एक-मेकांकडे बघून गालातल्या गालात हसले.

अविनाश आकाश आणि निशा बसले होते त्या टेबलवर येऊन बसला.

“अरे आकाश ही कोण”, अविनाशने आकाशकडे झुकत हलकेच आवाजात आकाशला विचारले.

आकाशनेही हलक्याच अन दबक्या आवाजात त्याला उत्तर दिले. “फ्रेन्ड आहे माझी. फक्त फ्रेन्ड”

“Nisha meet my friend Avinash, and Avinash she is Nisha,” आकाशने फॉर्मॅलिटी म्हणून दोघांची ओळख करुन दिली

जवळ-जवळ वीस-तीस मिनिटे तिघांच्या गप्पा रंगल्या अन मग अविनाश दोघांचा निरोप घेऊन निघून गेला.

“हम्म बोल आता लवकर, ह्या अव्यामुळे नं तुसतीच विस-तीस मिनिटे फुकट गेली”, आकाश

“कसला चिपकु मित्र आहे रे तुझा. आपण दोघांना बघून लगेच इथे येऊन बसला, तेही न विचारता. आपल्याला खाजगीत काही बोलायचे असेल तेही नाही समजत का त्याला”, निशा

“हो बाई, ठिक आहे. आहे तो चिपकु, बोल तू आता लवकर नाहितर अजून कोण टपकायचं”, आकाश

“हम्म ओके, बोलते”, निशा “काल रात्री मी माझ्या मम्मी-पप्पांच बोलणं ऐकलं, मम्मी बोलत होती आता निशाच डिग्रीचं फाईनल इयर संपत आलं आहे, आपण तिच्यासाठी स्थळं शोधणं चालु करायला हवं, म्हणजे डिग्री पुर्ण झाली की तिच लग्न करायला आपण मोकळे, तिला पुढे शिकायचं असेलच तर नवऱ्याच्या घरी गेली की शिकेल. तसं पण लग्न वेळेवर झालेल बरं. नाहितर चांगली स्थळं शोधूनही सापडत नाही. वगैरा.. वगैरा...” निशा आकाशला तिच्या आईचं सर्व बोलणं सांगत होती.

“हम्म, तर...?”, आकाश

“काय रे असा करतोस, एवढी गंभीर गोष्ट असून तुझं केवळ हम्म एवढच. आणि माझ्या प्रपोजलचं तू अजून काहिही आन्सर का नाही दिलसं?”, निशा

“आकाश मी तुला आवडते न नक्की?”, निशा

“निशा अगं तसं नाही, पण...”

“पण काय आकाश”, निशा

“सध्या माझ्यासाठी आजपासून चालु झालेला एक प्रोजेक्ट महत्वाचा आहे. अन त्या प्रोजेक्ट मधून मला भरपुर पैसे मिळणार आहेत. मग प्रोजेक्ट पुर्ण झाला की आपण लग्नाचा विचार करु असे माझे मत होते”, आकाश

“ओके, ठिक आहे. पण तुझा प्रोजेक्ट कधीपर्यंत पुर्ण होईल?”, निशा

“साधारण महिना - दिड महिना लागेल असे वाटते बघ”, आकाश

“काययय..? वेडा-बिडा झालास का तु. अरे एवढा वेळ, अन तेवढयात माझ्या मम्मी-पप्पांनी एखादं स्थळ माझ्यासाठी फायनल केलं तर....”, निशा

“तर मग त्याच्या बरबर लग्न करुन टाक” असे बोलून आकाश मिष्किलपणे हसला.

“ए काय रे”, असे बोलून निशा आकाशला लाडा-लाडातच बळे-बळे मारु लागली.

“बरं, ठिक आहे. मी आई बरबर बोलतो तुझ्याबद्दल आज” असे बोलून आकाशने विषय संपवला. बिल पे केले आणि ते दोघेही जाण्यासाठि निघाले.

“आणि हां, तुला एक सांगायचं राहून गेलं बघ, उद्यापासून मी प्रोजेक्टच्या कामामधे बिझी राहणार आहे. सो काही दिवस आपण भेटु शकणार नाही. मी वेळ मिळेल तसा तुला कॉल करेन. बाय”, आकाश

“काही दिवसापेक्षा एक-दिड महिना सांग की”, निशा

“ह्म्म…. तेच!” असं बोलून आकाश गाडी स्टार्ट करुन निघून गेला.

आजपासून त्याच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने प्रोजेक्टचं काम चालु होत होतं. म्हणून काही महत्वाच्या मेल्स आलेल्या आहेत का हे पहावे म्हणून त्याने त्याचा लॅपटॉप चालु केला.

स्क्रिनवरील संध्याचा पिक पाहून त्याला पुन्हा वाटून गेले; कालची संध्याच्या बाबतीतली जी मोहीम फत्ते होउ शकली नाही ती आज करावी का? पण लगेच त्याला प्रोजेक्टबद्दल आठवले. अन प्रोजेक्टचे काम वेळेवर झाले नाही तर भविष्यात आपल्याला असे प्रोजेक्ट्स मिळणे मुश्कील होऊन बसेल म्हणून तुर्त प्रोजेक्टचे काम पुर्णत्वास जात नाही तोवर आपण संध्याचा विषय बाजुलाच ठेवलेला बरा असा विचार करुन तो आपल्या पुढील कामाला लागला.

काही महत्वाच्या मेल्सना रिप्लाय देऊन त्याने आपला लॅपटॉप बंद केला अन तो वर्कशॉप मध्ये प्रोजेक्टवर कसे काम चाललय हे बघण्यासाठी गेला.

प्रोजेक्टच्या कामात तो एवढा बिझी होऊन गेला होता की विकली सुटटी घेण्याची देखिल त्याला सवड नव्हती. रोज ऑफीस अन घर हेच त्याच चाललं होतं. अक्षरश: दिवसाचे १२-१२, १४-१४ तास तो ऑफिसच्या कामात बिझी असे.

अधून - मधून निशा बरबर फोनवर त्याचे बोलणे होत होते पण निशाला भेटणे तुर्तास त्याने टाळले होते. अन निशा देखिल त्याला भेटण्यासाठी फोर्स करत नव्हती. कारण तिलाही माहित होते हा प्रोजेक्ट आकाशच्या दृष्टीने किती महत्वाचा होता ते.

बघता-बघता एक महिना उलटून गेला. आता कुठे प्रोजेक्टच्या कामातून थोडे रिलॅक्स झाल्या सारखे आकाशला वाटत होते. पोजेक्ट जवळ-जवळ पुर्णत्वाच्या तयारीत होता.

# ३

इथे संध्याचं देखिल रुटीन व्यवस्थित चाललं होत. पण तिला सॅटरडे आणि सन्डे अशी दोन दिवस सुटटी असल्यामुळे तिला जॉबचं बर्डन नव्हतं अन ती आपल्या जॉबबद्दल खुष होती.

तिच्याकडे लोन डिपार्टमेंट असल्यामुळे जास्त वर्क लोड देखिल नव्हता

“मॅडम. लोनबद्दल चौकशी करायची होती”, एक क्लाईंट

“तुम्ही बसून घ्या अगोदर”, संध्या

“हम्म बोला आता...., आमच्याकडे घरासाठी लोन, वाहन लोन, गॅझेट लोन, वगैरा.. वगैरा.. लोन आहेत, तुम्हाला कोणतं हवं आहे”, संध्या

संध्याने त्या व्यक्तिला लोनबद्दल व्यवस्थित माहिती दिली.

“ठिक आहे मॅडम. उद्या किंवा परवा येतो सर्व कागदपत्रासह फॉर्मॅलिटी पुर्ण करायला”, ती व्यक्ती

“आकाश ईथे ये चल बाळ”, ती व्यक्ति

आकाश शब्द कानी पडताच संध्याच्या काळजात धस्स झालं, तिच्या काळजाचा ठोका चुकला अन ती आपल्या भुतकाळात गेली.

त्या दिवशी शाळेच्या आवारात आपण माळलेल्या गुलाबाला उद्देशुन आपल्याला चिडवल्याबद्दल, अन अविनाशने चिडवून आकाश केवळ अविनाश सोबत असल्यामुळे आपण त्या दोघांना वाटटेल ते बोलले, अन त्यांची तक्रार देखिल प्रिन्सिपला सरांना केली ह्या आठवणीने तिचे मन दु:खी झाले.

अन दुसऱ्या दिवशी शाळेच्या रस्त्यावर आकाशने हाक मारुन देखिल आपण थांबले नाही म्हणून त्याने जबरदस्तीने पकडलेला आपला हात अन आपण काहीही विचार न करता त्याच्या काना खाली दिलेली तिला आठवली.

आपलं चुकलंच, त्या वेळी तो काय बोलणार आहे ते आपण एकदा ऐकून घ्यायला हवं होतं....

आणि आत्ता मॉल मध्ये भेटलो तेव्हा आपण त्याला स्माईल द्यायला हवी होती. पण त्याने तरी कुठे आपल्याला स्माईल दिली. कदाचित त्याच्या मनात अजून आपल्याबद्दल राग असेल बहुतेक....

नाही. राग असता तर आपल्याकडे एकटक बघत का होता तो, हरवून गेल्या प्रमाणे.

संध्याचे मन भुतकाळाच्या हिंदोळयावर हेलकावे घेत होते. हो-नाहीचे अंदाज बांधत होते.

ओ मॅडम चहा थंड होतोय घ्या की, बॅंक कर्मचाऱ्याने आवाज दिला अन संध्या भानावर आली.

ती भानावर आली पण अजूनपर्यंत तिच्या मनात आकाशचाच विचार चालु होता. “तो FB वर असेल का?, असेल तर आपल्याला त्याने रिक्वेस्ट का पाठवली नसेल?, कदाचित आपल्याबद्दल त्याच्या मनात अजून तर राग नसेल ना, आणि म्हणूनच त्याने आपल्याला रिक्वेस्ट पाठवली नसावी का? असे अनेक प्रश्न तिच्या मनात उठत होते.

महीनाभरापासून रोज १२-१२, १४-१४ तास काम करुन आलेला कंटाळा दुर करण्याच्या हेतुने अन एवढया दिवसांपासून संध्याच्या बाबतीत खोळंबलेले काम पुर्ण करण्याच्या

हेतुने आज त्याने दुपारी २ वाजताच ऑफिस सोडले. अन तो त्या बॅंकेच्या दुसऱ्या शाखेच्या रस्त्याला लागला.

ती शाखा त्याच्या ऑफिसपासून चांगलीच ३०-३५ कि.मी. लांब होती. अन एकटयालाच जायचे असल्याने काही अंतर कापल्यावर त्याला बोअर वाटु लागले. म्हणून त्याने FM चालु केला.....

FM वर “बचके तू रहना रे बचके तू रहना, नहीं दुजा मोका मिलेगा संभलना” हे गाणे वाजत होते.

त्याच्या दृष्टीने आणि त्या सिच्युएशनच्या दृष्टीने ते गाणे बकवास असल्याने त्याने चॅनेल बदलले. त्यावर जुनी गाणि लागली होती. त्याचे मन त्या गाण्यांमध्ये रमले.

ह्यावेळी बॅंक सिक्युरीटी गार्डकडून माहिती मिळविण्यापेक्षा आपण तडक बॅंकेतच जायचे, अन संध्या कुठे दिसते का ते पहायचे असे त्याने ठरविले.

जवळ-जवळ एका तासात तो त्या बॅंकेजवळ पोहोचला. त्याने पार्किंग मधे गाडी पार्क केली अन तो तडक बॅंकेत शिरला.

समोरील दोन तीन काउंटर वरुन त्याने नजर फिरवली, अन एका काउंटर वर त्यानी नजर स्थब्ध झाली.

संध्या, त्याच्या मनाला खुप बरे वाटून गेले. शेवटी आपली मेहनत कामी आली.

संध्या तिच्या कामात मग्न होती.

त्याचं लक्ष ती बसलेल्या काउन्टरवर असलेल्या प्लेटवर गेले.... 'लोन सेक्शन'

“I want some info about Loan”, आकाश

“Yes sure, please have a seat.”, संध्या

तीने आकाशला ओळखले, पण ती ऑफिसची फॉर्मॅलिटी फॉलो करत बोलली.

कोणत्या टाईपचं लोन हवं आहे आपल्याला...

“अॅक्चुली माझा एक छोटा बिझिनेस आहे अन त्यासाठी मला लोन हवं आहे”, आकाश

(अॅक्चुली त्याला लोन वगैरा ची आवश्यकता नव्हती, पण संध्या सोबत बोलण्यासाठी लोन सेक्शनची प्लेट वाचल्यावर त्याला सुचलेली ती आयडीया होती.)

त्यानंतरची जवळ-जवळ १५-२० मिनिटे तिने त्याला पुर्णत: लोन स्किमबद्दलची कल्पना दिली.

तिलाही आपली ओळख आकाश समोर दाखवण्याची मनोमन तिव्र इच्छा होती. पण आपली ओळख कशी प्रगट करावी? असा प्रश्न होता.

“स्क्युज मी सर, तुमचे विझिटींग कार्ड मिळू शकेल का?”, संध्या

Yes sure, असे बोलून त्याने आपले विझिटींग कार्ड काढून संध्याला दिले अन तो जाण्यासाठी निघाला.

आपणास संध्याने ओळखले असावे का? की ती जाणून बुजून ओळख दाखवत नाही असा विचार त्याच्या मनात घोळतच होता इतक्यात....

आकाश. ओळखलसं नाही का मला? , संध्याने त्याला मागून आवाज दिला.

तो एक क्षण स्तब्ध झाला अन पलटून “ओळखलं न, पण....”, आकाश

“ओके, नंतर बोलुया, I will call u later” असे बोलून तिने आकाशला निरोप दिला.

ऑफिस मध्ये खाजगी नको ह्याचे भान ठेऊनच तिने आकाशचा निरोप घेतला होता.

आकाश आज खुप खुश होता. घरी पोहोचल्या-पोहोचल्या त्याने करकचुन आपल्या आईला मिठी मारली.

“काय रे वेडया, काय झालं?”, मालतीबाई

आकाशच्या चेहऱ्यावरील आनंद ओसांडून वाहत होता. अन मालतीबाईंना तो स्पष्ट दिसत होता.

“काय झालं आकाश खुप खुष दिसतोस, आपल्या आईला सांगशील का?”, मालतीबाई

“आई अगं ती.....”, त्याने अर्धवट आपले वाक्य तोडले. “म्हणजे तो जो प्रोजेक्ट आहे ज्यावर मी काम करतो आहे. तो आज पुर्ण होत आहे. अन पुढे जाऊन असेच आणखी प्रोजेक्ट मला मिळणार आहेत. म्हणून मी आज खुप खुष आहे.”

मालतीबाई देखिल त्याच्या आनंदात सामिल झाल्या. अन तू अशीच प्रगती करत राह असा आशिर्वाद देऊन आपल्या कामास निघून गेल्या.

काय करतोस हे आकाश? त्याने त्याच्या मनालाच प्रतिप्रश्न केला.

अजून आपल्याला संध्याच्या बाबतीत काहीच माहित नाहिए, अन एवढया लवकर आईला सांगणे म्हणजे आपला मुर्खपणा ठरेल.

त्याच्या मनाची अस्वस्थता वाढत चालली होती. कारण रात्रीचे जेवण वगैरा आटपून झोपायची वेळ झाली तरी देखिल संध्याचा फोन आला नव्हता.

तो बेडवर पडून तिचा फोन येण्याची वाट बघत होता....

आज सकाळी - सकाळीच संध्या त्याच्या घरी आली होती.

"काकु, आकाश आहे का घरी?", संध्या

"हो आहे ना. पण अजून झोपलेलाच आहे बघ", मालतीबाई

तशी संध्या डायरेक्टली आकाशच्या बेडरुम मधे गेली. "आकाश ऐकतोस का, उठ न, अरे उठ न"

आजचं मी मस्तपैकी प्लानिंग केलं आहे. आज आपण दिवसभर मस्तपैकी बाहेर जाऊया, फिरुया, शॉपींग करुया, वगैरा.. वगैरा...

तसा आकाश उठला अन मस्तपैकी काही वेळात तयार होऊन खाली आला.

संध्या अन मालतीबाई खाली चहा घेत - घेत गप्पा गोष्टीत बिझी होत्या....

"चल ग संध्या", आकाश

आई आम्ही येतो, आकाश अन संध्या एकत्रच बोलले.

अन दोघेही घराबाहेर पडले.

आकाश गाडी चालवत होता अन संध्या त्याच्या बाजुच्या सिटवर बसलेली होती. तिचं गाणं गुणगुणणं चालु होतं.

तिचं ते गुणगुणणं आकाशला एवढं मोहून गेलं होतं की त्याने गाडीमधला *FM* देखिल चालु करण्याची तसदि घेतली नव्हती.

ते एका मॉल जवळ पोहोचले तसे आकाशने पार्किंग मध्ये आपली गाडी पार्क केली. अन ते दोघेही मॉल मध्ये शिरले.

"आकाश ऐक न, हा ड्रेस बघ नं, कसा दिसेल मला", संध्या

"खुप छान आहे, *तू* स्वत:च ट्राय करुन बघ नं, खुप शोभुन दिसेल तुझ्यावर", आकाश

दोघांनीही एकमेकांच्या पसंतीची खुप सारी शॉपिंग केली होती. अन मुवी बघण्याच्या प्लानिंगने ते मॉलच्या बाहेर पडले.

त्याने सामान गाडीच्या डिकीमध्ये टाकले अन तो ड्रायव्हींग साठी सिटवर येऊन बसला.

अन एवढ्यात मागून कसला तरी जोराचा आवाज आला म्हणून त्याने मागे पाहिले तर एक मोठा डंपर चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे त्या मॉलच्या आवारात घुसला होता अन तो पलटी होऊन घसपटत येऊन जोरात मागच्या बाजूने आकाशच्या गाडीला धडकला.

तशी संध्या गाडीची पुढची काच फडकून बाहेर फेकली गेली. तिला जबर मार बसून ती विव्हळत पडली होती. तिच्या डोक्यातून रक्ताच्या धारा वाहत होत्या.

आकाश स्टेअरिंग मध्ये अडकल्यामुळे त्याला तिच्या मदतीसाठी जाता येत नव्हते. तो गाडी मधूनच मदतीसाठी ओरडण्याचा खुप प्रयत्न करत होता. पण का कुणास ठाऊक त्याच्या तोंडून  एकही उच्चार बाहेर पडत नव्हता.

तो खुप हात-पाय हलवत होता पण काही केल्या त्याला बाहेर निघता येत नव्हते

अन अचानक त्याला जाग आली. पहाटेचे ४ वाजले होते. त्याचे पुर्ण शरीर घामाने चिंब झाले होते. हृदयाची  धड-धड दुपटीने वाढलेली होती.

अजून देखिल तो घाबरलेल्या अवस्थेतच बिछान्यावर पडून होता.

त्याला काहीच समजत नव्हते की आता काही क्षणापुर्वी जे पाहिले ते सत्य होते की स्वप्न. काही वेळातच त्याची खात्री पटली की ते स्वप्नच होते.

तरी सुद्धा त्याचे हृदय खुप जोर-जोरात धडधडत होते. त्याने डोळे घट्ट मिटून झोपण्याचा प्रयत्न केला पण त्याला काही केल्या झोप लागत नव्हती. नंतर बऱ्याच उशिरा त्याचा डोळा लागला. सकाळी जाग आली तेव्हा जवळ- जवळ ८ वाजायला आले होते.

तो गडबडीने उठुन ऑफिसच्या तयारीला लागला.

सध्या त्याच्या रुटीन मध्ये खुप बदल आले होते. कधी-कधी तो रोजच्या व्यायामाला देखिल टाळु लागला होता.

आज ऑफिसला पोहोचायला त्याला उशिरच झाला होता. तो ऑफिसला पोहोचला तेव्हा ११ वाजून गेले होते.

खरं तर आज तो ऑफिसला आला तर होता पण त्याचे मन कामात नव्हतेच.

रात्री पडलेले स्वप्न त्याच्या डोक्यातून जातच नव्हते. राहून राहून तेच तेच विचार त्याच्या मनात घोळत होते.

खरंच पहाटेची स्वप्न खरी होतात का......?

कुणाशी बोलावं...? कुणाला सांगावं....?

त्याच्या मनाची घालमेल चालुच होती.

अव्याला सांगावं का....?

नको यार...तो नुसताच शहानिशा करायचा.

एवढ्यात त्याचा फोन वाजला. निशाचा फोन होता.

“काय यार आकाश. काय चाल्लय”, निशा

“एवढे दिवस फोन नाय, मेसेज नाय, काय करतोस काय तु”, निशा

“अन मी तुला फोन केला तर कधी तू कॉल pic up नाय करत. तर कधी तुझा फोन out of coverage area येतो”, निशा

“ए विसरला की काय रे. Pleas yaar dont forget me”, निशा

निशा कमालीची सिरियस होऊन बोलत होती.

“असं कसं विसरेन यार, तू तर माझी चांगली फ्रेन्ड आहेस. बस थोडा कामात बिझी होता म्हणून तुला कॉल करणे जमलं नाही गं”, आकाश

“काय यार फक्त फ्रेन्ड”, निशा

“आकाश, तू तुझ्या आईशी बोलणार होता माझ्याबद्दल”, निशा

“निशा एवढे दिवस मी माझ्या प्रोजेक्टच्या कामात बिझी होता सो मला आईशी बोलण्यासाठी वेळच मिळाला नाही आणि.....”

“आणि काय आकाश...”, निशा

“निशा प्लिज मनाला खराब वाटून घेऊ नकोस, पण अजून मी तुझ्याबद्दल शुअर नाहीए. सो मला अजून थोडा वेळ हवा आहे. अन म्हणूनच मी तुझ्याबद्दल अजून आईला काहिही सांगीतले नाही”., आकाश

“ठिक आहे आकाश, तुला हवा तेवढा वेळ घे. पण प्लिज मला तुझ्यापासून दुर करु नकोस रे. तुझी खुप सवय झाली आहे. मी नाही राहु शकत तुझ्यापासून दुर..प्लिज आकाश”, निशा

“निशा स्वत:च्या भावनांवर ताबा ठेव”, आकाश

“आणि हो मी विचार करेन तुझ्या प्रपोजलचा. आता तर खुष न”, आकाश

ओके चल बाय मला थोडे काम आहे असे बोलून आकाशने फोन ठेऊन दिला.

बिच्याऱ्याच्या मनाची द्विधा अवस्था झाली होती.

“काय चालले आहे हे जिवनात”, आकाश स्वत:शीच पुटपुटला

एवढ्यात त्याची सेक्रेटरी त्याच्या केबिन मधे शिरत..."आय एम सॉरी, पण काय झाले सर"

"नाही काही नाही, तू बोल", आकाश

"सर पार्टीचा फोन आलेला, ते विचारत होते प्रोजेक्टच काम कुठवर आलयं म्हणून", सेक्रेटरी

"सर मी कॉल ट्रान्सफर पण केला होता तुम्हाला पण तुम्ही रिप्लाय नाही दिला सो मी पार्टीला सांगीतले नंतर सरांशी बोलते म्हणून", सेक्रेटरी

"ओके मी आफ्टर लंच पार्टीला मेल करतो. तोपर्यंत तू एक काम कर, प्रोजेक्टचे सर्व डिटेल्स कलेक्ट कर अन माझ्याकडे घेऊन ये", आकाश

आकाशचा फोन खणाणला, डिस्प्लेवर अन-नोन नंबर होता म्हणून त्याने कॉल कट केला अन तो परत जेऊ लागला.

पुन्हा त्याच नंबरने कॉल आला तसा त्याने कॉल रिसिव्ह केला.

हेलो, समोरुन एक लेडी बोलत होती.

"माफ करा, मी आपणास ओळखले नाही", आकाश

"हेलो, आकाश! मी संध्या बोलते. ओळखले का?", संध्या

क्षणभर त्याचा आपल्या कानावर विश्वासच बसला नाही.

एका क्षणासाठी वेळ थांबल्या प्रमाणे तो स्तब्ध झाला. त्याच्या हातातला घास त्याच्या ओठांजवळच  स्थिरावला.

"हेलो आकाश, तुच बोलतोस न", संध्या

तसा आकाश पटकन भानावर आला. त्याने आपल्या हातातील घास खाली ठेवला अन तो खुर्चीवरुन उठून बोलु लागला.

“अगं संध्या. I dont belive, की तू मला कॉल केलाय”, आकाश

“हो मीच बोलते”, संध्या

“अरे तू त्या दिवशी लोन साठी आलेला. सो आज दुपारहून येऊ शकतोस का तु? ब्रान्च मधे”, संध्या

“अगं आज मला जरा एक महत्वाच काम होतं. सो...”, आकाश

“आपण संध्याकाळी भेटुयात का?”, आकाश

ओके, संध्याने पण संमती दर्शवली.

ॲक्च्युली त्याला संध्याला भेटण्याची संधी दवडवायची नव्हती. तिने जर संध्याकाळी भेटणे जमणार नाही असे बोलले असते तर दुपारचे काम बाजुला ठेऊन देखिल तो जाण्यासाठी तयार झाला असता.

अन तिथे संध्याला देखिल आकाशला भेटण्याची इछा होती म्हणून तिनेदेखिल त्याच्या बोलण्याला लगेच संमती देऊन टाकली.

“पण कुठे. अन तसं पण या शहरात मी नविन आहे”, संध्या

“तु काळजी करु नकोस तुझ्या ऑफिस सुटण्याच्या वेळेला मी तुला रिसिव्ह करायला येतो.”, आकाश

“ठिक आहे “, संध्या

दुपारच्या जेवणानंतर त्याने लगेच आपल्या सेक्रेटरीकडून प्रोजेक्टचे डीटेल्स मागवून घेतले व तो लगेचच आपल्या कामाला लागला.

कारण त्याला संध्याकाळी वेळेवर संध्याला रिसीव्ह करायला पोहोचायचे होते.

पार्टीला मेल करून ३:३० वाजेपर्यंत तो मोकळा झाला.

अन लगबगीने आपली बॅग भरून संध्याला रिसीव्ह करण्यासाठी निघाला.

जेव्हा तो तिच्या बँक शेजारी पोहोचला तेव्हा संध्याकाळचे ४:४५ झाले होते. काही वेळ तो तसाच गाडीत बसून राहीला.

अन त्याला सकाळी पडलेल्या स्वप्नाची आठवण झाली. त्याचे हृद्य जोर जोरात धडधडू लागले.

खरंच सकाळचे स्वप्न खरे झाले तर......

सकाळी असे स्वप्न पडले अन संध्याने पण आजच बरोबर फोन केला. आपण आज तिला भेटायला पाहिजे होते की नाही ह्यां विचारात तो गढून गेला होता.

गाडीच्या डूअरच्या काचेवर टक टक चा आवाज आला.

बाहेरून संध्या आकाशला आवाज देत होती.

“अरे आकाश कधीपासून आवाज देतेय मी तुला”, संध्या

“अग सॉरी,  माझे लक्ष जरा बाजूला होते”, आकाश

“काय? बाजूला. कोणत्या मुलीला वगैरा बघत होतास की काय?”,  असे बोलून संध्या मिश्कील पणे हसली.

“नाही ग, तसं काही नाही.  जरा विचारात मग्न होतो.”, आकाश

त्याने गाडी चालू केली अन तो तडक आपल्या आवडीच्या कॉफी शॉप मध्ये तिला घेऊन गेला.

# ४

“हम्म, काय घेणार मग”, आकाश

“मला न एक पतियाला पैग, अन काहीतरी खायला”, संध्या बोलून हसू लागली.

संध्याचा स्वभाव पहिल्यापेक्षा खूप जॉली झाला होता.

“अरे यार, कॉफी शॉप मध्ये आलो आहोत तर कॉफीच मिळणार ना”, संध्या

“I mean to say, which type of coffee”, आकाश

“मला एक कोल्ड कोफी”, संध्या

त्याने संध्या साठी कोल्ड कॉफी अन स्वत:साठी हॉट कॉफीची ऑर्डर दिली.

कॉफिच्या बाबतीत मात्र दोघांच्या ही सवई एकदम विरुद्ध होत्या.

“संध्या आपण असे अचानक भेटू कधी असे मला स्वप्नात देखील वाटले नव्हते”, आकाश

“First of all I am sorry Sandhya”, आकाश

“कशासाठी सॉरी आकाश”, संध्या

“शाळेमध्ये त्यावेळी जे काही घडले......”, आकाश

“Ohh, Common आकाश, ते तर मी केव्हाच विसरले”, संध्या

“अन मुळी तुझ्यावर माझा राग कधी नव्हताच”, संध्या

आकाश मनात खूप खुश झाला.

“तरीसुद्धा अव्याबद्दल सॉरी”, आकाश

“हम्म”, संध्या

“अरे अविनाश काय करतो आता, तुझ्या संपर्कात आहे का अजून”, संध्या

“हो, आम्ही चांगले मित्र आहोत”, आकाश

“अन एकमेकांच्या घरी येण जाणं असते आमचं”, आकाश

एवढ्यात वेटर कॉफी घेऊन आला.

“अरे आपण ज्या कामासाठी भेटत आहोत ते तर बाजूलाच राहिले”, संध्या

“तुला लोन हवे होते न”, संध्या

(आकाशच्या दृष्टीने खरे तर लोन हे संध्याला भेटण्याचे एक बहाणे होते.)

“हो ग, हवे होते. पण आता ती गरज मिटली आहे.”, आकाश

“म्हणजे”, संध्या

“अग, मी एका प्रोजेक्ट वर काम करत होता तो प्रोजेक्ट आता पूर्ण झाला आहे. अन थोड्याच दिवसात मला त्याचे खूप पैसे भेटणार आहेत.”, आकाश

संध्या थोडी नर्व्हस होतच बोलली.

“म्हणजे तुलां आता लोनची आवश्यकता नाही का?”, संध्या

“नाही, पण.....”, आकाश

“पण काय आकाश?”, संध्या

“आपण कामा व्यतिरिक्त ही भेटू शकतो न संध्या”, आकाश थोडा चाचपडतच बोलला.

त्याला अपेक्षित होते संध्या नाही असे बोलेल. पण झाले उलटेच

“हो आकाश, मला आवडेल पुन्हा तुला भेटायला”, संध्या

तिच्या या बोलण्याने आकाशच्या मनावरचे खूप मोठे दडपण दूर झाले.

दोघेही कॉफी संपवून शॉप मधून बाहेर पडले.

“संध्या मी तुला ड्रोप करतो घरी”, आकाश

“नाही आकाश, मी जाईन”, संध्या

आकाशने खूप हट्ट केला, पण ती बाय करून जायला निघाली.

आजचा दिवस खूप चांगला गेला होता आकाशसाठी. आपल्या आईला संध्याच्या बाबतीत सर्व काही सांगावे असे त्याला वाटले.

पण सकाळी निशाचा आलेला फोन, अन तिच्या बरोबर झालेला संवाद त्याला आठवला. अन त्याने आपल्या आईला संध्याबद्दल मग काही दिवसांनी सांगू असे ठरविले.

कारण त्याला अजून संध्याच्या मनाचा वेध घ्यायचा होता. तिच्या मनात आपल्या साठी जागा आहे का हे जाणून घ्यायचे होते.

“अन अजून तर आपली मैत्री देखील पाहिजे तशी फुलली नाही, मग कसा घेणार तिच्या मनाचा वेध”, आकाश स्वत:शीच पुटपुटला.

संध्याला देखील आकाशला भेटून बरे वाटले होते. तिच्या मनातला आकाशबद्दलचा संकोच पुरता दूर झाला होता. कि आकाश आपल्याशी बोलेल की नाही?.

रात्रीचे ११.३० वाजले असतील. आकाशचा मोबाईल वाजला.

त्याचा नुकताच डोळा लागला होता.

त्याने ओझरती नजर मोबाईल वर टाकली

निशाचा मॅसेज होता. त्याने वरवर नजर फिरवली अन पुन्हा मोबाईल बाजुला ठेऊन दिला.

क्षण भरातच जोराचा विजेचा झटका लागावा तसा तो बेडवर उठुन बसला.

त्याने पुन्हा मोबाईल घेतला अन तो मॅसेज वाचु लागला.

आकाश, निशाला सर्प दंश झाला आहे. तिला अमुक एका हॉस्पिटल मध्ये अॅडमिट केले आहे. तू लवकर पोहोच. निशाची फ्रेन्ड XXXX

तो तसाच उठला अन कपडे चेंज करुन गाडिच्या चाव्या घेऊन बाहेर पडला.

आपण निशाला बघून दिड-दोन तासांत परत येऊ असा विचार करुन आपल्या आईची झोप मोड होऊ नये म्हणून मालतीबाईंना न सांगताच तो घरा बाहेर पडला होता.

तो हॉस्पिटल वर पोहोचला तोपर्यंत निशावर उपचार चालु होते. तिचे आई-वडिल भयंकर घाबरलेले होते. अन आई तर अक्षरश: रडतच होती. तिचे वडिल तिच्या आईची समजुत काढत होते. बाकीच्या तिच्या २-४ मैत्रीणी होत्या. त्यापैकीच एकीने आकाशला मॅसेज करुन कळविले होते.

काही काळाने डॉक्टर बाहेर आले.

तसे निशाच्या आई-वडिलांनी निशाबद्दल त्यांच्याकडे विचारणा केली.

खुप विषारी साप होता. बरे झाले तुम्ही वेळेत तिला हॉस्पिटल मध्ये हलविले., डॉक्टर

“पण डॉक्टर.....”, निशाची आई

“हो, मला माहित आहे. तुम्हाला काय विचारायचे आहे.”, डॉक्टर

“आम्ही तिच्या शरीरातून पुर्ण विष बाहेर काढले आहे. पण जोपर्यंत ती शुद्धीवर येत नाही तोपर्यंत आम्ही काहिही सांगू  शकत नाही”, डॉक्टर

डॉक्टरांचे बोलणे ऐकताच निशाच्या आईच्या डोळयातून अश्रु धारा घळाळु लागल्या.

निशाच्या मैत्रीणींनी तिच्या आई वडिलांना हिम्मत ठेवायला सांगून, आम्ही उद्या सकाळी पुन्हा येऊ असे बोलून त्यांचा निरोप घेतला.

आता फक्त तिथे निशाचे आई- वडिल आणि आकाशच होते.

आकाशची निशाच्या आई-वडिलांना भेटण्याची कधी वेळच आलेली नव्हती अन निशाने देखिल आकाशबद्दल तिच्या आई-वडिलांना कधी सांगीतले नव्हते. त्यामुळे ते एक-मेकांसाठी अनोळखीच होते.

आकाशनेच शेवटी पुढाकार घेऊन आपली ओळख देण्याचे ठरविले.

“हाय अंकल, मी निशाचा फ्रेन्ड”, आकाश

माय सेल्फ आकाश, वगैरा.. वगैरा.... त्याने निशाच्या वडिलांना आपले इंट्रोडक्शन दिले.

“हवं असेल तर तुम्ही निशाच्या मम्मीला घरी सोडून या. मी थांबतो इथे तुम्ही येईस्तोवर”, आकाश

निशाच्या वडिलांना आकाशचे म्हणणे पटले.

ठिक आहे आकाश असे बोलून ते निशाच्या आईची समजुत काढत तिला घरी घेऊन जाण्यास निघाले.

निशाचे वडील तिच्या आईला घरी सोडून आले तोपर्यंत आकाश बाहेरच खुर्चीवर बसलेला होता.

तिचे वडिल आकाश जवळ जाऊन त्याला हाक मारणार, इतक्यात त्यांचा लक्षात आले आकाशचा डोळा लागला आहे.

त्यांनी त्याला डिस्टर्ब न करता तसेच झोपु दिले.

सकाळी आकाशला जाग आली तेव्हा सकाळचे ९ वाजून गेले होते.

अरे आकाश, तू ईथे काय करतोस......

आवाज ओळखीचा होता. आकाशने पलटून पाहीले. अविनाश त्याच्या बायको सोबत होता.

आता आपण पुरते मेलो, आकाश मनोमन

“काय झाले. काकूंना बरे वगैरा नाही का?”, अविनाश

“अरे नाही रे. एक फ्रेन्ड अ‍ॅडमिट आहे”,  आकाश

“कोण?”, अविनाश

“अरे तू नाही ओळखत”, आकाश

“मी नाही ओळखत, असा कोणता फ्रेन्ड आहे रे तुझा”, अविनाश

“ती माझी नविन फ्रेन्ड आहे”, आकाश

“ती?”, अविनाश

अविनाश एकदम प्रश्नार्थक आणि आश्चर्याने  त्याच्याकडे बघून बोलला.

“येतोच मी, तुझ्या वहिनीची अपॉईंटमेंट घेऊन, तोपर्यंत थांबच तु”, अविनाश

अविनाश गेल्याचे पाहून आकाशने लगेच निशाचा वडिलांचा निरोप घेतला. त्यांना आपला मोबाईल नंबर दिला अन काही मदत लागल्यास जरूर कळवा. मी पुन्हा येऊन जाईन असे बोलून आकाश अविनाशला टाळण्यासाठी तिथुन सटकला.

तो घरी पोहोचला तेव्हा मालतीबाई प्रचंड अस्वथ होत्या. आकाशच्या अशा अचानक गायब होण्याने त्यांना काय करावे अन काय नाय काही सुचत नव्हते.

त्या पोलिसांना आकाशच्या अचानक गायब होण्याची माहिती देण्यासाठी फोन लावणारच होत्या तेवढ्यात आकाशची गाडी त्यांना मध्ये येताना दिसली. अन त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.

पण त्या आकाश वर प्रचंड चिडल्या होत्या. आजपर्यंत कधीही न सांगता आकाश असा घरातून बाहेर पडलेला नव्हता.

आकाश येताच त्यांनी आकाशची चांगलीच खडसावणी केली. आकाश देखिल आपल्या आईचे हे रुप पहिल्यांदाच पाहत होता. आकाशला देखिल पटले कि आपल्या आईचे रागावणे योग्यच आहे. शेवटी आईचे ह्रुदय आहे हे. आईला आपल्या मुलाची काळजी लागणारच. शेवटी त्याने आपल्या आईची माफी मागीतली. मी आधी फ्रेश होतो अन मग तुला सर्व काही सांगतो असे बोलून तो आपल्या रुम मध्ये निघून गेला.

तो जेव्हा फ्रेश होऊन खाली आला तेव्हा मालतीबाई त्याची चहाच्या टेबलवर वाट बघत बसल्या होत्या.

तो आपल्या आई शेजारी जाऊन बसला.

आपल्या आईचा हात हातात घेऊन काल रात्री घडलेला सर्व प्रकार त्याने आपल्या आईला सांगितला.

“अन ही निशा कोण?”, मालतीबाई

“आणि तू जाताना एकदा तरी मला सांगून जायला हवे होते की नाही?”, मालतीबाई

“तुझ्या अशा अचानक गायब होण्याने मी किती घाबरले होते”, मालतीबाई

“हो आई मान्य आहे, माझी चुकी झाली. पण मला वाटले होते मी दिड - दोन तासांत परत येईन मग नुसतीच तुझी झोपमोड नको म्हणून मी तुला न सांगताच बाहेर पडलो.”, आकाश

“अन तिथे गेल्यावर अडकलो.  अन तिथे बसल्या बसल्या माझा कधी डोळा लागला मला समजलेच नाही. जेव्हा जाग आली तेव्हा सकाळचे ९ वाजून गेले होते”, आकाश

“आई निशाबद्दल मी संध्याकाळी तुझ्याबरबर बोलतो. आता मला ऑफिसला निघायला हवे”, आकाश

मालतीबाईंचा निरोप घेऊन तो ऑफिसला जाण्यासाठी बाहेर पडला.

त्याने ऑफिस ला जाताना हॉस्पिटल ला वळून निशाची तब्बेत आता कशी आहे ते पाहावे या विचाराने हॉस्पिटलच्या रस्त्याला गाडी वळविली. पण क्षणार्धात तो थांबला. तिथे पुन्हा अव्या भेटला तर....

नाही नकोच, आकाश स्वत:शीच पुटपुटला.

त्याने आपला मोर्चा पुन्हा ऑफिसकडे वळविला.

ऑफिसला पोहोचल्यावर त्याने निशाच्या मोबाईल वर कॉल केला. पण तिचा मोबाईल स्विच्ड ऑफ येत होता.

“बहुतेक कालपासून मोबाईल ची बॅटरी चार्ज केली नसावी म्हणून मोबाईल बंद झाला असावा”, आकाश

त्याने आपला मोबाईल बाजुला ठेवला अन तो पुन्हा कामात बिझी झाला.

एवढ्यात त्याच्या मोबाईल वर Whats App चा मॅसेज आला.

संध्याचा मॅसेज होता “हाय, गुड मॉर्निंग”

त्याने रिप्लाय केला “वेरी गुड मॉर्निंग डिअर”

संध्याकडून पुन्हा मॅसेज आला “डिअर???”

“का? काही चुकलं का माझं, की तुला डिअर बोललेलं आवडलं नाही?”, आकाश

“नाही तसे काही नाही. पण.....”, संध्या

'“पण काय?” , आकाश

'“काही नाही”, संध्या

अन पुढे हसण्याचे सिंबॉल होते.

आकाशने अजून दोन-चार मॅसेज केले, पण संध्याने काहीच रिप्लाय नाही दिला.

संध्याकाळी आकाश जेव्हा घरी पोहोचला तेव्हा मालतीबाई अन अविनाशच्या गप्पा-टप्पा अन चहा चालला होता.

आकाश जसा हॉलमध्ये शिरला, दोघेही एकदम शांत झाले.

आकाश समजला काहीतरी आपल्याबद्दलच बोलणे चालले असणार. म्हणूनच दोघेही एकदम शांत झाले.

पण त्याने आपल्या चेहऱ्यावरचे भाव जराही न बदलता अविनाशला विचारले...

'“अरे अव्या, अचानक कसा काय?”, आकाश

'“अरे असचं, काकुंची आठवण आली म्हणून आलो भेटायला”, अविनाश

'“आकाश, तू फ्रेश होऊन ये, मी कॉफी टाकते”, मालतीबाई

तो फ्रेश होऊन आला तोपर्यंत मालतीबाई सुद्धा कॉफी घेऊन आल्या.

'"काय आकाश राव सकाळी मला न भेटताच तुम्ही हॉस्पिटल मधून पळ काढला?", अविनाश

अविनाशने जाणून-बुजून मालतीबाईं समोरच प्रश्न उपस्थित केला.

आकाश विषय बदलणार तितक्यात....

'"हा, आकाश तू निशाबद्दल संध्याकाळी बोलु असे बोलला होतास", मालतीबाई

आता आकाशला हा विषय टाळण्याजोगा नव्हता. त्याने निशाबद्दल सर्व काही सांगण्यास  सुरवात केली.

आमची ओळख फेसबुक वरुन झाली. त्यानंतर फोनवर बोलणं, भेटणं अन काही दिवसांपुर्वीच तिने त्याला केलेले प्रपोज.... वगैरा... वगैरा...

हे सर्व ऐकताना मालतीबाईंच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसत होते.

'"मग गाडी अडली आहे कुठे आकाश", मालतीबाई

आता तर त्याला संध्याबद्दल बोलणे देखिल अनिवार्य होऊन बसले होते.

पण अजूनपर्यंत त्याला संध्याबद्दल जास्त काही माहित नव्हते म्हणून त्याने संध्याबद्दल बोलणे टाळले.

अन....

"निशा चांगली मुलगी आहे, पण मी तिच्याबद्दल अजूनपर्यंत शुअर नाही, अन तिच्या मनात माझ्याबद्दल प्रेम भावना असतील, पण माझ्यासाठी ती माझी चांगली मैत्रीण आहे". एवढे बोलून त्याने तो विषय तिथेच संपवला.

'"ठिक आहे. मग तुझ्या मैत्रीणीची तब्बेत कशी आहे आता हे तरी बघायला जायला हवं की नाही आपल्याला",  मालतीबाई

'"ठिक आहे. पण आज नको, आधीच खुप उशिर झाला आहे", आकाश

सकाळी आकाश उठला तेव्हा त्याच्या मोबाईल वर निशाच्या वडीलांचा मॅसेज आला होता.

'"थॅन्क्स आकाश, निशाची तब्बेत आता बरी आहे. तू केलेल्या सहकार्याबद्दल पुन्हा एकदा थॅन्क्स"

(आकाशने निशाच्या हॉस्पिटल खर्चाची पुर्ण जबाबदारी स्विकारली होती अन म्हणूनच तिच्या वडिलांनी आकाशचे आभार मानले होते)

मालतीबाई आणि आकाश १०:३० ते ११:००च्या दरम्यान हॉस्पिटल ला पोहोचले.

निशा बेडवर बसलेली होती.

तिच्या आजुबाजुला तिचे आई-वडिल आणि काही मैत्रीणी बसलेल्या होत्या.

आकाश आणि मालतीबाई गेले तशा तिच्या मैत्रीणी तिच्या आई-वडिलांची आणि निशाची भेट घेऊन जायला निघाल्या.

'"निशा, कशी आहेस? कसे वाटतेय आता?", आकाश

'"ठिक आहे, पण पायाला थोडी सुज आहे.", निशा

त्यानंतर काही वेळ एक-मेकांचा परिचय आणि वायफळ गप्पा चालल्या.

साधारणत: अर्ध्या - पाऊण तासाने मालतीबाई अन आकाश, निशा व तिच्या आई-वडिलांचा निरोप घेऊन घरी जाण्यासाठी बाहेर पडले.

आकाश ड्राईव्ह करत होता. मालतीबाई त्याच्या बाजुच्याच सिटवर बसलेल्या होत्या.

दोघेही आपल्याच विचारात गढुन गेले होते. कुणीही एकही शब्द बोलत नव्हते.

अन अचानक मालती बाई बोलल्या....

'"मस्त मुलगी आहे निशा, नाही का आकाश", मालतीबाई

'"अम्मSSS", आकाश

'"मी म्हणाले, मस्त मुलगी आहे निशा. पण जरा फॅशनेबल आहे", मालतीबाई

'"हम्मSS", आकाशने मान डोलवली.

'"आकाश, मला असे वाटते तू निशाबद्दल विचार करावा", मालतीबाई

'"संधी अशी सारखी सारखी नाही चालून येत, अन निशा सारख्या चांगल्या मुलीला तू नाही म्हणतोस", मालतीबाई

'"ठिक आहे आई मी विचार करेन", आकाश

'"हम्म जरुर कर, बघ आकाश तू तिला रिस्पोन्स नाही दिला अन उद्या जर तिचे दुसरे कुणावर प्रेम जडले; अन मग तुला तुझ्या प्रेमाची जाणीव झाली तर त्या वेळी तुझ्या हातात काहिच उरलेले नसेल आकाश", मालतीबाई

मालतीबाई जिवाच्या आकांताने आकाशला समजावत होत्या.

'"आई माझे एका मुलीवर प्रेम आहे." आकाशच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

गाडी कुंपणाच्या दरवाज्यातून आत शिरली अन घराच्या दरवाज्यापाशी जाऊन थांबली.

मालतीबाई गाडीतून उतरुन घरात गेल्या. आकाशने गाडी शेड मध्ये पार्क केली अन तो देखिल घरात घेला.

दुपारच्या जेवणावेळी मालती बाईंनी आकाशला विचारले.

'"कोण मुलगी आहे ती", मालतीबाई

शेवटी आकाशला संध्याच्या बाबतीत मालतीबाईंना सगळे-सगळे सांगावे लागले.

आकाशने संध्याच्या बाबतीत आपल्या आईला सगळे सांगितले.

'"पण अजून तिला कुणी आवडतो का? किंवा तिचे कुणा सोबत प्रेम प्रकरण आहे अजून तरी मला काहिच माहित नाही.", आकाश

'"म्हणून मला काही वेळ हवा आहे आई", आकाश

'"ठिक आहे. तू वेळ घे, पण माझे असे मत आहे की लवकरात-लवकर तिला विचारावं", मालतीबाई

त्याने जेवणानंतर संध्याला मॅसेज केला.

'"जर आज तू संध्याकाळी फ्री असेल तर आपण भेटुया का?", आकाश

संध्याकाळी ४ वाजेच्या दरम्यान तिचा रिप्लाय आला.

'"ठिक आहे आकाश. पण कुठे भेटणार", संध्या

'"मागे भेटलेलो त्याच कॉफी शॉप मध्ये", आकाश

'"नको आकाश, या वेळी तिथे नको", संध्या

'"आणि तसं पण मला थोडी शॉपिंग पण करायची आहे.", संध्या

"“मी तुला कॉल करेन, आकाश”, संध्या

“ठिक आहे. बाय”, आकाश

संध्याला भेटायचे म्हणून तो तयारीला लागला.

सलून मध्ये जाऊन क्लिन शेव केली. चांगले पण फॉर्मलच कपडे घातले.

मस्तपैकी उंची सेंट लावला. अन आरशात आपण कसे दिसत आहोत हे न्याहाळतच होता इतक्यात त्याचा फोन वाजला.

संध्याचा कॉल होता. त्याने एकही क्षण न दवडता कॉल उचलला.

"“हॅलोSSS. आकाश, मी घरुन निघते आहे. तू मला अमुक एका मॉल जवळ भेट. ठिक आहे न.” संध्या

"“हम्मSS,  ठिक आहे संध्या”, आकाश

आकाशचे बोलणे ऐकताच तिने फोन ठेऊन दिला. ती कसल्या तरी घाईत असल्या सारखे वाटत होती.

आकाश मॉल जवळ पोहोचला तेव्हा संध्या त्याची बाहेरच वाट पाहत उभी होती.

"“सॉरी संध्या, ट्राफिक मुळे मला जरा उशिर झाला”, आकाश

"“अरे पण मी तुला विचारलेच कुठे की तुला उशिर का झाला म्हणून”, संध्या

दोघेही एक-मेकांकडे बघून हसले. अन मॉल मध्ये गेले.

तिला हव्या असलेल्या वस्तु ती न्याहाळत होती. अन घेत होती.

आकाश आपले नुसताच तिच्या मागे-मागे फिरत होता.

"“अरे काय रे आकाश, काय माझ्या मागे मागेच राहतोस. मला वस्तु सिलेक्ट करायला हेल्प कर की”, संध्या

"“संध्या मला कुठे माहित आहे तुझी चॉईस, अन तसं पण माझी चॉईस काय तितकीशी चांगली नाहीए”, आकाश

"“मला देखिल तुझी चॉईस नाही माहित. अन तस पण आपण एकत्र सिलेक्शन केलं तर आपल्याला देखिल एक-मेकांची चॉईस माहित होईल”, संध्या

"“म्हणजे. मी समजला नाही”, आकाश

"“काही नाही बुद्धु, चल पुढे”, संध्या आकाशला म्हणाली अन गालातल्या गालात हसली.

आकाशला काहीच समजले नाही. तो तिच्या मागे-मागेच जात राहिला.

ती काही वस्तु न्याहाळत होती एवढ्यात एका छोट्या मुलाच्या धावत जाण्याचा तिला हिसका बसला अन तिचा तोल जाऊन ती खाली पडू लागली. तशी ती डोळे गच्च मिटून जोरात किंचाळली.

पण लगेच दुसऱ्या क्षणाला शांत झाली. तिने अलगद आपले डोळे उघडले तर ती आकाशच्या बाहुपाशात होती. दोघांचीही नजर एकमेकांच्या नजरेत खिळली.

तिच्या किंचाळण्याने आजु-बाजुला गर्दि जमली होती. कुणाच्या तरी बोलण्याचा आवाज आला “गुड जॉब मिस्टर”

तसे आकाश आणि संध्या दोघेही एकदम भानावर आले. तशी ती गालातल्या गालात हसली अन सावरु लागली. तिच्या हसण्यामध्ये काहीतरी अर्थ दडलेला होता. आकाशने तो टिपण्याचा प्रयत्न केला. पण त्याला नक्की काय ते उमगलेच नाही.

ते शॉपिंग करुन मॉलच्या बाहेर पडले.

'"थांब मी तुझ्यासाठी ऑटो अरेंज करतो", आकाश

'"का? तू नाही सोडणार मला घरी", संध्या

संध्याच्या अशा बोलण्याने आकाश एकदम चकित झाला. कारण या अगोदर आकाशने तिला घरी सोडण्याचा आग्रह केला होता तेव्हा तिने त्याला मना केले होते.

'"यस, सोडतो न तुला घरी", आकाश

आकाश मनोमन खुप खुष झाला. कारण संध्याच्या घरी जाण्याची त्याची इच्छा अनपेक्षित पणे पुर्ण होत होती.

दोघेही गाडित बसले. अन संध्याच्या घराकडे आकाशने गाडी सुसाट सोडली.

काही वेळातच दोघेही संध्याच्या घरी पोहोचले. संध्या आकाशला आपल्या घरात घेऊन गेली. तसं तिच घर जुनाट पद्धतिच होतं. कारण ते एका भाड्याच्या घरात राहत होते. बाहेरुन जरी ते घर जुनाट वाटत असले तरी आतून कसे सर्व जागच्या जागी, टाप-टीप होते. एक मंद सुगंध सर्वकडे दरवळत होता.

तिचे वडिल हॉलमध्ये वर्तमान पत्र वाचत बसले होते. त्यांनी आकाशचे स्वागत केले. संध्या आकाशला बसायला बोलून किचन मध्ये निघून गेली.

संध्या किचन मधून परतताना तिच्या हातात ट्रे होता. त्यात कोल्ड्रींक आणि काहिसे खायला होते. सोबत तिची आई होती. थोडावेळ एक-मेकांची ओळख आणि गप्पा चालल्या.

थोड्या वेळाने आकाश संध्याच्या आई-वडिलांचा निरोप घेऊन जाण्यास निघाला.

'"बाळ, असेच येत रहा.", संध्याचे आई-वडील

'"ठिक आहे, येतो मी", आकाश

संध्या त्याला सोडण्यासाठी त्याच्या सोबत बाहेर आली. आकाश गाडीत बसला. अन संध्याला म्हणाला...

"“संध्या, खुप दिवसांपासून तुला काहीतरी सांगायचे होते.”, आकाश

"“अरे मग बोल न”, संध्या

त्याने सर्व शक्ति एकवटली. एक मोठा दम भरला अन बोलला...

“संध्या. तू मला खुप आवडतेस. माझी जिवनसाथी होशिल का?”

संध्या एकदम हसली. अन बोलली....

"“चल वेड्या”

अन तिने घराकडे धाव घेतली. पुढे जाऊन ती क्षणभर थांबली अन तिने आकाशकडे वळून बघितले.

आकाश तिच्याकडेच बघत होता. तिच्या चेहऱ्यावर लाज, मृदु हास्य अन समाधानाच एकत्रीकरण होतं.

ती पुन्हा पळु लागली अन घराच्या उंबऱ्यावर जाऊन थांबली.

तिने आकाशला हात वर करुन बाय केले. तसा आकाश घरी जाण्यास निघाला.

तो जेव्हा घरी पोहोचला. त्याच्या मोबाईल वर संध्याचा मॅसेज होता.

तिने बरेच काही लिहिले होते. शेवटी एक वाक्य लिहिले होते, “तु ही मला खुप-खुप आवडतोस, अगदी जसा आहे तसा”

आकाश खुप खुष होता. त्याला जे पाहिजे होते तसेच घडले होते. पण त्याची खुषी जास्तवेळ टिकली नाही. कारण त्याच्या मनात निशाचा विचार तरळून गेला.

“जर निशाला कळले तर… की आपले संध्यावर प्रेम आहे, अन संध्या पण आपल्यावर प्रेम करते. तर निशाच्या मनाची काय अवस्था होईल, ती कशी रियॅक्ट करेल? तिने जर स्वत:चे काही बरे-वाईट करुन घेतले तर….”

तो या विचाराने एकदम घामाघुम झाला. नाही. आपण निशाच्या मनाचा कल ओळखुन तिला संध्याबद्दल सर्व सांगायला हवे. पण त्या अगोदर आपण संध्याशी देखिल निशाच्या बाबतीत बोलायला हवे. त्याने स्वत:च्या मनाशी विचार पक्का केला.

# ५

आज सकाळपासूनच मालतीबाईंना जरा अस्वस्थ वाटत होते. पण त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. आकाशही आपल्या ठरल्या वेळेत ऑफिसला निघून गेला.

दुपारी १२.०० ते साधारण १२:३०च्या दरम्यान त्याचा मोबाईल वाजला. मोबाईल वर त्याच्या घरचा फोन नंबर झळकत होता. आकाशने कॉल घेतला.

फोनवर त्याच्या घरचा गडी एकदम घाबरलेल्या आवाजात बोलत होता. "“साहेब, बाईंची तब्बेत ठिक नाय, त्या अचानक खाली जमिनीवर पडल्या. बाजुच्या मधु काकांच्या मदतीने बाई साहेबांना हास्पिटल मध्ये भर्ती केलं हाय. तुमी बी लवकर हास्पिटल मंधी पोचा.”

"“अरे...”, आकाशने त्याला हॉस्पिटलचा पत्ता, नाव-गांव विचारण्या अगोदरच त्याने फोन ठेऊन दिला होता.

पुन्हा घरी फोन लाऊन त्याला विचारण्यात काही अर्थ नाहि. आकाश स्वत:शीच पुटपुटला.

आणि त्याने तडक मधु काकांनाच फोन लावला.

“मधु काका, आकाश बोलतो.”, आकाश

“हा आकाश बेटा, तू त्वरित लाईफलाईन हॉस्पिटल मध्ये निघून ये.”, मधुकाका

“काका, तसं काही.... काय झालंय नक्की आईला”, आकाश

"“बाळ, तसं काही घाबरण्याचे कारण नाही, ठिक आहेत आता मालतीबाई. पन तू लवकर ये”, मधुकाका

आकाश तसाच निघाला अन हॉस्पिटल ला पोहोचला.

मधुकाका मालतीबाईंच्या शेजारीच बसलेले होते.

रुमच्या दारातच त्याला डॉक्टर भेटले. तसा तो रुम मध्ये न जाता त्यांच्या मागोमाग बाहेर पडला.

"“डॉक्टर साहेब, मी आकाश”, आकाश

"“आत्ता तुम्ही ज्यांची ट्रिटमेंट करुन बाहेर आलात त्यांचा मुलगा”, आकाश

"“हम्म, या माझ्या सोबत, केबिन मध्ये बोलु”, डॉक्टर

दोघेही केबीन मध्ये शिरले.

"“बसा. मि. आकाश”, डॉक्टर

"“डॉक्टर साहेब, नक्की काय झालंय आईला”, आकाश

"“हे बघा आकाश, वयानुसार तब्बेत बिघडणे स्वाभाविक आहे.,” डॉक्टर

"“या अगोदर कधी त्यांची अशी अचानक तब्बेत बिघडली होती काय?”, डॉक्टर

"“नाही”, आकाश

"“पण काय झालंय नक्की, डॉक्टर साहेब”, आकाश

"“हे बघा, मि. आकाश, हा हृदय विकाराचा सौम्य झटका आहे. अन बहुधा पहिलाच आहे. तुम्हाला या पुढे त्यांची खुप काळजी घ्यावी लागेल.”, डॉक्टर

त्यानंतर मालतीबाईंच्या आरोग्याबद्दल काही टिप्स वगैरा वर आकाश आणि डॉक्टरांचं बोलणं चाललं

"“ओके, ठिक आहे. कधीपर्यंत मी त्यांना घरी घेऊन जाऊ शकतो.”, आकाश

“हो, त्यांना मी इंजेक्शन दिले आहे. आत्ता काही घाबरण्याचे कारण नाही तसे”, डॉक्टर

“अगदी आत्ता सुद्धा घेऊन जाण्यास हरकत नाही. पण त्यांच्या तब्बेतीची काळजी घ्यावी लागेल.”, डॉक्टर

“हवं असल्यास चार्जेबल बेसिस वर तुम्ही नर्स अपॉइंट करू शकता मि. आकाश”, डॉक्टर

“ हो जरूर भासल्यास नक्की तुम्हाला सांगु डॉक्टर साहेब, पण सध्या तरी मला तसे काही वाटत नाही.” आकाश

“हम्म मला देखिल तसेच वाटते मि. आकाश”, डॉक्टर

डॉक्टरांचा निरोप घेऊन आकाश अन मालती बाई दोघे हॉस्पिटलच्या बाहेर पडले. आकाश ड्रायव्हींग करत होता पण तो कोणत्या तरी विचारात गढुन गेला होता.

“काय झालं बाळा, असा शांत शांत का?” मालती बाईंच्या प्रश्नाने तो भानावर आला.

“ काही नाही आई”, आकाश

“ मला माहित आहे; तुला माझ्या तब्बेतीची काळजी लागली आहे नं”, मालतीबाई
“मग माझी तब्बेतीची काळजी घेणारी कोण आण नं”, मालतीबाई

“आई आपण नर्स ला अपॉइंट करुयात का?” आकाश

“मला नर्स नको; सून हवी आहे. तुला समजत कसे नाही”, मालतीबाई

मालतीबाई बोलता-बोलता थोड्या हायपर झाल्या.

मालतीबाईंना शांत करत आकाशने त्यांना पाणी दिले अन “आपण नंतर बोलु या विषयावर”, असे बोलून शांत झोपी जायला सांगीतले.

ड्रायव्हींग करता-करता संध्याला कॉल करावा असा विचार त्याच्या मनात आला. पण आईची झोपमोड होऊ नये म्हणून त्याने तिला कॉल करणे टाळले.

एव्हाना त्याचे घर देखिल आले होते. त्याने गाडी पार्क केली अन आपल्या आईला उठविले.

आईला तिच्या रुम मध्ये झोपवून आकाश बाहेर आला.

मोबाईल वर संध्याचे दोन मिस्ड कॉल होते.

त्याने संध्याला कॉल केला अन आईच्या तब्बेती विषयी तिच्याशी तो बोलु लागला. एवढ्यात निशाचा देखिल कॉल त्याला येत होता.

“संध्या प्लिज एक मिनिट वेट कर”, असे बोलून आकाशने निशाचा कॉल घेतला.

“निशा मी बिझी आहे; नंतर कॉल करतो. असे बोलून त्याने कॉल कट केला व तो पुन्हा संध्याशी बोलु लागला.

निशाने आणखी एक दोन वेळा त्याला कॉल केला पण त्याने तिचा कॉल उचण्याची तसदी घेतली नाही.

शेवटी निशाने रागवून त्याला मॅसेज केला. I dont want to speak with u any more, and dont call me again; go to hell.

संध्याशी बोलणं झाल्यावर त्याने निशाला कॉल केला.

त्याच्या तीन-चार वेळच्या अथक प्रतत्नानंतर शेवटी तिने त्याचा कॉल रिसिव्ह केला.

तिने आकाशचा कॉल रिसिव्ह केला खरा, पण समोरुन काहिच रिस्पोन्स ती देत नव्हती.

“ हॅलो, Nisha are u there?” , आकाश

“ हॅलो निशा, काहितर बोल”, आकाश

आकाशने मनोमन ताडले की निशाला आपला खुप राग आलेला असणार

त्याला माहित होते आपण कितीही तिला मनवण्याचा प्रयत्न केला तरी तो व्यर्थ आहे म्हणून तो डायरेक्ट मुद्द्यावरच आला.

हे बघ निशा मला माहित आहे तू मला ऐकतेस, आकाश

"“ अगं निशा आईला फर्स्ट स्टेजचा हार्ट अटॅक येऊन गेला, तिला हॉस्पिटलाईज करावे लागले मी तिथेच होता, सो तुला कॉल करु नाही शकला, I am so sorry”, आकाश

आकाशचे एवढे शब्द ऐकताच निशा एकदम वितळली, तिचा राग कुठच्या कुठे पळून गेला.

“आकाश! आणि हे सर्व तू मला आत्ता सांगतोस”, निशा

“एवढा कसा वेंधळा तु”, निशा

“अगं निशा त्या सिच्युएशनला मला काय करावे सुचतच नव्हते बघ”, आकाश

आकाशला बरोबर माहित होते की निशाला आपला कितीही राग आलेला असेल तरी आईच्या हार्ट अटॅकबद्दल ऐकताच तीचा राग जाईल, आणि म्हनुनच त्याने काही गोष्टी सत्य-असत्य मिक्स करुन तिला सांगीतल्या होत्या. कारण संध्या नावाच प्रकरण एवढ्या लवकर त्याला निशाला माहित पडु द्यायचे नव्हते.

पुढील अर्धाक तास त्यांचे मोबाईल वर बोलणे चालले. अन मग आकाश मालतीबाईंना जेवण अन औषध देण्याची वेळ झाल्यामुळे निशाला बाय करुन मालतीबाई जवळ गेला.

**दोघांचेही जेवण झाल्यावर आकाश मालतीबाईंना औषध देऊन झोपण्यास गेला.**

**तसंही कामाच्या अति ताणामुळे अन मालतीबाईंच्या तब्बेतीमुळे त्यांचे रात्रीचे चालणे बंद झाले होते.**

**दिवसभराच्या धावपळीमुळे बिछान्यावर पडल्या पडल्याच त्याला झोप लागली.**

आज त्याचे लग्न होते.

आकाश जेवढा खुष होता त्याही जास्त मालतीबाई आनंदीत होत्या. आजच्या इतके नटलेले आकाशने त्यांना कधीच पाहिले नव्हते. एखाद्या महाराणी प्रमाणे त्यांचा पेहराव होता.

तो मालतीबाईंना घेऊन आपल्या लग्नाच्या मंडपात जात होता; अन त्याला अचानक समोरुन एक मोठी वरात येताना दिसली.

जशी वरात जवळ येऊ लागली तसे त्याने पाहिले की व-हाडी आपल्या खांद्यावरुन दोन पालख्या घेऊन येत आहेत.

ते व-हाडी मंडपा शेजारी आले अन त्यांनी त्या दोन्ही पालख्या खाली ठेवल्या.

त्या दोन्ही पालख्यांतून नवरीच्या पोशाखात नटलेल्या दोन सुंदर तरुणी बाहेर पडल्या.

पण हे काय? त्या दोघींच्याही डोक्यावर पदर होते. त्यामुळे त्या कोण आहेत हे आकाशला ओळखणे शक्यच झाले नाही.

काही क्षणातच त्या दोघींनीही आपल्या डोक्यावरचे पदर बाजुला केले. त्या दोघींच्याही हातात वरमाळा होत्या.

त्यापैकी एक संध्या तर दुसरी निशा होती.

एखाद्या धावण्याच्या शर्यतीत खेळाडू जसे *Get Set Goच्या* तयारीत असतात तशा त्या आकाशकडे धावण्याच्या तयारीत होत्या.

अन त्या दोघींनी वरमाळा घेऊन आकाशकडे धाव सुद्धा घेतली.

त्या दोघींना आपल्या दिशेने धावत येताना पाहून आकाश एकदम गांगरुन गेला त्याला काय करावे सुचत नव्हते.

त्याने तेथुन पळण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ..

एखाद्या स्टॅच्यु प्रमाणे त्याचे संपूर्ण अंग जड झाले होते. त्याला तेथुन थोडे देखिल हलता येत नव्हते.

त्या दोघीही समान वेगाने आकाशच्या दिशेने धावत येत होत्या. अन अचानक निशाने संध्याला जोराचा धक्का दिला; त्यामुळे तोल जाऊन संध्या खाली पडली.

तसे संधीचा फायदा घेत निशाने पुढे येऊन ती वरमाळ आकाशच्या गळयात टाकली.

परंतु आकाशचे लक्ष निशाकडे नव्हतेच; त्याचे पुर्ण लक्ष विव्हळत पडलेल्या संध्याकडे होते.

त्याने संध्याकडे पाहून जोरात तिला आवाज दिला; संध्या.....

अन दुसऱ्याच क्षणी तो त्याच्या बेडवर घामाघुम अवस्थेत उठुन बसला.....

त्याला क्षणभरात जाणीव झाली की आत्तापर्यंत आपण जे पाहीले ते आपल्याला पडलेले स्वप्न होते. तशा अवस्थेतच त्याचा हात थरथरतच टेबलावरच्या पाण्याच्या ग्लासवर गेला. त्याने घटा-घटा पाण्याचा पुर्ण ग्लास आपल्या पोटात रितवला. त्यानंतर त्याला जरा स्वस्थ वाटले. त्याने घामाने भरलेला आपला चेहरा पुसून काढला अन तो परत बिछान्यावर पडला.

पण काही केल्या त्याला झोप लागत नव्हती. पुन्हा-पुन्हा त्याला तेच स्वप्न आठवत होते.

कुस बदलत-बदलत पुन्हा त्याचा डोळा लागला.

पुन्हा त्याला तेच स्वप्न पडले. पण आता त्या स्वप्नाचा पार्ट २ होता.

त्याने पाहीले काही अंतर दुर संध्या विव्हळत पडलेली आहे.

अन ज्या मुलीने आपल्याला वरमाळा घातली (निशा) तिचा चेहरा परावर्तीत होऊन ती देखिल संध्याच आहे.

एक संध्या विव्हळत पडली आहे तर दुसरी संध्या जिंकण्याच्या खुशीत असुरी हास्य करत आहे. त्याला काहीच समजत नव्हते कोणत्या संध्याला जवळ घ्यावे.

अन अचानक त्याला जाग आली.

आपल्याला पुन्हा तेच स्वप्न पडल्याचा अन्वयार्थ त्याला लागत नव्हता. तो अधिक अस्वस्थ झाला.

तो तसाच उठुन बाथरुम मध्ये गेला. जवळ-जवळ अर्ध्या तासाच्या शॉवर नंतर त्याला हलके हलके फिल होऊ लागले.

मालतीबाईच्या तब्बेतीमुळे काही दिवस ऑफिस ला सुट्टी घेऊन कामाची जबाबदारी आपल्या मॅनेजर वर सोपवली होती त्याने.

आकाश कॉफीचे घोट घेत-घेत न्युज पेपर न्याहळत बसला होता. तेवढ्यात निशा त्याच्या घरी आली.

“हाय आकाश!”, निशा

“हॅलो; निशा, काय विशेष”, आकाश

“ काय विशेष म्हणजे?; अरे आईला बघायला आली आहे”, निशा

“ ओह! ये नं”, आकाश

दोघेही मालतीबाईंच्या रुम मध्ये गेले.

" आई; निशा आली आहे" आकाश

मालतीबाई अजून बिछान्यावरच पडून होत्या.

"आई! कशी आहे आता तब्बेत?", निशा

"ठिक आहे बाळ", मालतीबाई

"तुझं कॉलेज कस चाल्लंय", मालतीबाई

मालतीबाई अन  निशाच बोलणं चालु होतं अन आकाशचा मोबाईल वाजला.

संध्याचा कॉल होता. तसा तो लगेच मालतीबाईंच्या रुमच्या बाहेर आला अन त्याने कॉल रिसिव्ह केला.

"हम्म; बोल संध्या", आकाश

"अरे यार कुठे आहेस", संध्या

"कुठे म्हणजे घरी आहे", आकाश

"मी तुझ्या घराच्या बाहेर आहे; लवकर ये बाहेर", संध्या

"ओह माय गॉड", आकाश

"काय झाले आकाश", संध्या

"नो. नथिंग; वेट मी आलोच", आकाश

अन त्याने मोबाईल ठेवला.

“ आता काय करायचं? संध्या अन निशा एकाचवेळी?” तो स्वत:शीच पुटपुटला

“बघून घेऊ जे होईल ते नंतर” असे स्वत:शीच ठरवून तो दरवाजा ओपन करण्यासाठी सरसावला.

त्याने दरवाजा ओपन केला तशी संध्या डायरेक्ट घरातच आली.

“काय झालं आईला? अन मला तू त्यावेळीच का नाही सांगीतलस?' संध्या

“अगं जरा दम घे. बस अगोदर”, आकाश

“नाही; मला अगोदर आईला भेटु दे”, संध्या

तसा आकाशचा नाईलाज झाला. तिला तो मालतीबाईंच्या रुम मध्ये घेऊन गेला.

आकाश अन संध्याला मालतीबाईंच्या रुम मध्ये एकत्र येताना बघताच क्षणी निशाच्या मनात संध्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झालं.

तसंच प्रश्नचिन्ह मालतीबाईंच्या मनात देखिल निर्माण झालं.

“आता ही कोण? अन आकाशने त्याला कोणी मैत्रीण आहे असे आपल्याला कधी सांगीतले देखिल नव्हते”, निशा स्वत:शीच पुटपुटली

“ आई! ही संध्या... माझी बालपणीची मैत्रीण. आणि माझं आणि संध्या.... त्याने तिथेच अर्धवट वाक्य तोडलं

“ संध्या आता आपल्या शहरातल्याच एका बॅंकेत काम करते”, आकाश

आकाशने निशा अन संध्याची दोघींचीही वरवर ओळख घालून दिली.

जसे निशाच्या मनात संध्याबद्दल काही प्रश्न होते. तसेच संध्याच्या मनात देखिल निशाबद्दल काही प्रश्न होते.

निशाला आकाशच्या अशा वर-वर बोलण्याचा संशय आला अन ती मालतीबाईंचा निरोप घेऊन आकाशशी एकही शब्द न बोलता तेथुन निघून गेली.

मालतीबाई अन संध्याची ही पहिलीच भेट होती.

संध्या आणि मालतीबाईं मध्ये बऱ्याच वेळ बोलणं चाललं. मालतीबाईंनी तिला आपल्या घरी जेऊन जाण्याचा आग्रह केला; परंतु काही महत्वाचे काम असल्याचे सांगून पुन्हा कधितरी नक्की येऊ म्हणून तिने त्यांची मनधारणी करुन ती जाण्यास निघाली.

जाताना तिने देखिल आकाशशी बोलणे टाळले.

निशा अन संध्याच्या अशा वागण्याने आकाशला समजून चुकले आपले नक्कीच काहितरी चुकले आहे.

“पण नक्की काय चुकले आपले?”, आकाश स्वत:शीच पुटपुटला

तो संध्याच्या मागे गेला पण तोपर्यंत ती निघून गेली होती.

तो तसाच निराश होऊन पुन्हा आपल्या आईच्या रुम मध्ये आला.

मालतीबाईंना देखिल आता संध्याबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता लागली होती. अन ती ही आकाशच्या तोंडून.

आकाश त्यांच्या रुम मध्ये आला तसाच मालती बाईंनी त्याला प्रश्न केला.

“आकाश! ही संध्या काय भानगड आहे; अन या अगोदर तिच्याबद्दल तू कधीही मला काही सांगीतले नाहीस”, मालतीबाई

“आई तिच्या बाबतीत तुझ्याशी बोलायला तसा मला कधी निवांत वेळ मिळालाच नाहि; मी तुला तिच्याबद्दल सर्व काही सांगणार होतो”, आकाश

“असो. पण आज सर्व काही सांगतो मी तुला”, आकाश

जवळ जवळ तासभर त्यांच्या गप्पा चालल्या; आज आकाश मनमोकळे पणे सर्व काही बोलत होता. संध्या कशी भेटली ते तिला आपण प्रपोज केले इथपर्यंत त्याने सर्व काही आपल्या आईला सांगीतले.

तसेच निशाने सुद्धा आपल्याला प्रपोज केल्याचे त्याने मालतीबाईंना सांगीतले.

खरं तर मालतीबाईंना निशा आपली सून व्हावी असे वाटत होते. पण आता संध्या आकाशला आवडते अन ती देखिल निशा पेक्षा कमी नाही मिळत म्हणून मालतीबाईंनी देखिल आकाशच्या मताला दुजोरा दिला.

“आकाश ठीक आहे; संध्या चांगली मुलगी वाटते. आपण तिच्या घरी लग्नासाठी विचारु”, मालतीबाई

आकाश खुष झाला. “पण आई........”

“आता काय झाले?”, मालतीबाई

“ या अगोदर त्या दोघींनाही मी कधिच एक-मेकींबद्दल काहिच सांगीतले नव्हते. अन आज त्या अशा काही एक-मेकींसमोर येतील याची मला कल्पना देखिल नव्हती.

“ हम्म, तुझे चुकले आकाश, त्या दोघींना तू असे अंधारात ठेवायला नको होते”, मालतीबाई

“ अन आत्ता तर त्या दोघीही माझ्याशी काहिही एक न बोलता निघून गेल्यात म्हणजे नक्कीच त्यांना एकमेकींबद्दल काहीतरी डाऊट अन मझ्याबद्दल राग आलेला दिसतो.

“ तू दोघींशीही व्यवस्थित बोल; त्या नक्की समजून घेतील”, मालतीबाई

मालतीबाईंच्या सांगण्यानुसार आकाशने दोघींनाही एकत्रच भेटण्याच ठरवलं, जेणे करुन दोघींच्या मनातील शंका दुर होतील.

दोघींनाही त्याने त्या दिवशी खुप वेळा कॉल करण्याचा प्रयत्न केला. पण दोघींचेही मोबाईल स्विच्ड ऑफ येत होते.

तो पुर्ण दिवस त्याचा खराब गेला होता. झोपण्याच्या वेळी देखिल त्याचे मन खुप अस्वस्थ होते. त्याने झोपण्याचा खुप प्रयत्न केला पण काही केल्या त्याला झोप लागत नव्हती; खुप रात्री उशीरा त्याचा कधी डोळा लागला हे त्यालाही समजले नाही.

आज दोघींनाही एकत्रच भेटून त्यांच्या मनात जो काही गोंधळ, गैरसमज निर्माण झाला आहे तो दुर करण्याच्या हेतुने आकाशने दोघींनाही एकत्रच भेटण्यासाठी बोलवण्याचे ठरविले.

त्यानुसार त्याने दोघींनाही SMS करुन सकाळी ११.०० वाजता अमुक एका कॉफीशॉप मध्ये भेटण्याचे सांगीलतले.

एव्हाना दोघींचाही राग थोडा निवळला होता.

पहिला रिप्लाय संध्याकडून आला; तिला ऑफिसला जायचे असल्याने तिने सकाळी १०.०० वाजता भेटण्याचे आकाशला सजेस्ट केले होते.

काही वेळाने निशाचा सुद्धा रिप्लाय आला. तिला कॉलेजला जाणे जरुरीचे असल्याने तिने दुपारहून भेटु असा रिप्लाय केला होता.

त्यानुसार आकाशने पहिले संध्याला अन दुपारहून निशाला भेटण्याचे ठरविले.

आकाश कॉफी शॉपवर पोहोचला तोपर्यंत संध्या तिथे त्याची वाट पाहत बसली होती.

“  हाय संध्या!”, आकाश

परंतु संध्या जास्त रिॲक्ट न होता हळुच हाय बोल्ली.

आकाशला समजले हिचा आपल्यावरचा राग अजून उतरलेला नाही.

त्याने वेटरला आवाज दिला अन दोन कॉफिची ऑर्डर दिली.

“ संध्या मला माहीत आहे; तू माझ्यावर रागावली आहेस; अन का? हे देखील माहीत आहे”, आकाश “ मी तुला निशाबद्दल सर्व काही सांगणार होतो.....

“पण कधी! आकाश”, संध्या चढ्या आवाजातच बोल्ली.

आजु- बाजुच्या टेबलवर बसलेले दोनचार लोक तिच्याकडे अन आकाशकडे पाहु लागले.

“संध्या please listen to me”,  आकाश

तशी संध्या थोडी रिलॅक्स झाली.

“ हम्म, बोल”, संध्या

त्यानंतर आकाशने निशाच्या बाबतीत सर्व काही संध्याला सांगण्यास सुरुवात केली. अगदी निशाची अन त्याची ओळख, मग निशाने त्याला केलेले प्रपोज, निशा सोबत केलेली शॉपिंग इत्यादि सर्व काही आकाशने संध्याला सांगितले.

सर्व सांगून झाल्या नंतर काही काळ दोघेही शांत होते.

अन आकाश......

“संध्या पण तुला खरेच सांगतो; निशाला आज देखिल मी माझी एक चांगली फ्रेन्ड मानतो. त्या व्यतिरिक्त तिच्याबद्दल दुसरे काहिच नाही मिळत माझ्या मनात.”

“पण आकाश, निशाने तुला अगोदर प्रपोज केले आहे. अन मला असे वाटते मी तिचे प्रेम हिरावून घेत आहे; तेव्हा तू तिच्या प्रेमाचा स्विकार करावा”, संध्या

“मी उगाचच तुमच्या दोघांच्या मधे आली.”, संध्या

“ अन तसं पण माझ्या अगोदर निशा तुझ्या जिवनात आली”, संध्या

“ संध्या माझ्या जिवनात आलेली पहिली मुलगी तू आहेस; अगदी ९ वीपासून.........
“

संध्या आश्चर्य चकित मुद्रेने आकाशकडे पाहत राहीली; अन काही वेळाने हसु लागली.

“ U mean.. ९ वीपासून....

“ हो; ९ वीपासून तू मला आवडतेस”, आकाश

“ अन म्हणून आजपर्यंत मी कोणत्याच मुलीला जवळ केलं नाही; मनाशी पक्के ठरविले होते लग्न करेन तर तुझ्याशीच”, आकाश

“ अरे वेड्या! अन मी तुला भेटलीच नसते कधी तर......”, संध्या

“ तर लग्नच केले नसते मी”, आकाश

“ काहीही बोलु नकोस”, संध्या

“ वेडा आहेस तु. बरं; आता पुढे काय? अन निशाला काय सांगणार आहेस?”, संध्या

“ मी सांगेन तिला तुझ्या बाबतीत सर्व काही; जसे मी तुला सांगीतले तिच्या बाबतीत”, आकाश

“ पण आकाश निशा तयार होईल का? आपलं नात स्विकारायला”, संध्या

" मी ओळखतो तिला संध्या; ती हट्टी आहे, पण तेवढीच समजदार देखिल आहे. समजून घेईल ती", आकाश

संध्याला ऑफिसला जायला वेळ होत होता, तिने आकाशचा निरोप घेतला अन ती ऑफिसला जायला निघाली.

आकाश दुपारी ३.०० वा.च्या आसपास कॉफी शॉपला पोहोचला; तोपर्यंत निशा आलेली नव्हती.

त्याने आतमध्ये बसून तिची वाट पाहणे पसंत केले.

तो टेबलवर बसून कसल्यातरी विचारात गढुन गेला होता. वेटरने टेबलावर टक-टक असा आवाज केला तसा तो भानावर आला.

"काय साहेब! कसल्या विचारात आहात", वेटर

आकाश नेहमी त्याच कॉफी शॉप वर जात असल्याने आजपर्यंत तिथल्या बऱ्याच वेटर बरोबर त्याची चांगलीच ओळख जमली होती.

आकाशही त्यांच्या बरोबर एकदम मन-मिळाऊ पणे वागत असल्याने तेही आकाशला खुप मानत.

"काही नाही मित्रा; बस असचं", आकाश

"ओके! साहेब; काय देऊ. तुमची आवडती कॉफी की आणखी काही", वेटर

"अर्थात  माझी आवडती कॉफीच, पण आत्ता नको. जरा वेळाने ऑर्डर देतो", आकाश

"अच्छा; सकाळच्या मॅडम का?", असे बोलून तो वेटर स्मित हास्य करत तेथुन निधून गेला.

जवळ-जवळ ३.३० वा.च्या आसपास निशा आली.

“काय हे निशा; कधीपासून मी तुझी वाट पाहतोय. अन तू आत्ता येतेस”, आकाश

“माझ्या जवळ तुझ्या सारखी गाडी नाही मिळत”, निशा उखडलेल्या आवाजातच बोलत होती.

आकाशने त्यावर जास्त काही न बोलणेच पसंत केले.

मॅडमचा राग अजून गेला नाही वाटते; तो हलकेच पुटपुटला.

“काय बोललास”, त्याचे पुटपुटणे निशाने नोटीस केले;  पण तो नक्की काय बोलला ते तिला समजले नाही.

“काही नाही. काय घेणार”, आकाश

“काही नको; मला का बोलवले आहेस ते बोल”, निशा

निशाने जरी काही नको सांगीतले तरी आकाशने वेटरला बोलवून दोघांच्याही आवडीच्या कॉफी ऑर्डर केल्या.

कॉफी येईपर्यंत दोघंही एकही शब्द बोलले नाही. काही वेळाने तोच वेटर कॉफी घेऊन आला अन त्याने कॉफी टेबलवर ठेवली; अन जाता-जाता तो आकाशकडे निरखुन बघून खुणाऊ लागला. त्याचा खुणावण्याचा अर्थ आकाशला समजला; तो खुणेने विचारात होता आत्ता ही मॅडम?

पण आकाशने “ अजून काही लागले तर तुला आवाज देतो” असे बोलून त्याला तेथुन पाठवून दिले.

निशाने कॉफीचा मग आकाशकडे देण्यासाठी उचलला अन आकाशने ही कॉफीचा मग घेण्यासाठी हात उचलला; अन ह्या गडबडीत थोडी गरम-गरम कॉफी आकाशच्या हातावर सांडली. त्याने लगेच आपला हात मागे घेतला. त्याच्या हाताला खुप जळ-जळ होत होती. आकाशची अवस्था बघून तिला खुप दु:ख झाले.

“ Sorry Akash, माझ्यामुळेच हे सर्व झाले”, निशा

आकाशने तिला समजावण्याचा खुप प्रयत्न केला, Its ok निशा, पण तिचे त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतेच.

आकाशला जे भाजलं ते आपल्यामुळेच, अन ह्या सर्वासाठी आपणच जिम्मेदार आहोत एवढेच तिच्या दिमागात चालले होते.

अन आकाशचा लाल झालेला हात पाहून अचानक तिच्या डोळयातून अश्रु वाहु लागले.

तिच्या वाहणाऱ्या अश्रुंना पाहून आकाशच्या मनाला एक विचार चाटून गेला.

ही मुलगी आपल्याला एवढेसे भाजले म्हणून स्वत:च्या डोळयातील अश्रु सावरु नाही शकत; अन जर आज संध्याबद्दल तिला माहित पडले तर कसं सावरू शकेल स्वत:ला?

तरीही आकाशने मनाशी ठाम राहून पुढे जे काय होईल ते होईल असे ठरवून निशाला आज संध्याबद्दल सर्व काही सांगून टाकावे असे ठरविले.

“निशा! निशा ऐकतेस नं”, आकाशने निशाला हाताला पकडून हलवत भानावर आणले.

“ हम्मSSS”, निशा एकदम भानावर आली.

“निशा! मला तुझ्याशी खुप महत्वाच बोलायचं आहे. माझं बोलणं ऐकल्यावर तू कसं रिॲक्ट करशील माहित नाही. तरी तू मला समजून घेशिल अशी माझी अपेक्षा आहे”, आकाश

“ काल माझ्या घरी तुझ्या समोर अचानक संध्या आली अन तुझ्या चेहऱ्यावरचा रंगच उडाला; तू काहीही एक न बोलता तेथुन निघून गेली तेव्हाच मी ताडले होते की तुला खुप राग आला आहे. अन संध्याबद्दल तुझ्या मनात खुप प्रश्न देखिल असतील.”, आकाश

“ आज तुझे सर्व डाऊट्स मी क्लिअर करणार आहे”, आकाश

“निशा! संध्या अन मी एकाच शाळेत १० वीपर्यंत शिकलो; अन अगदी ९ वीपासूनच संध्या मला आवडू लागली होती.”, आकाश

“ त्यानंतर शिक्षणाच्या निमित्ताने आम्ही वेगळे झालो. पुन्हा संध्या मला कधी भेटेल असे मला वाटलेच नव्हते.”, आकाश

“ माझं एज्युकेशन वगैरा झाल्यावर काही काळा पुर्वी तू माझ्या जिवनात आली, पण फक्त एक चांगली फ्रेन्ड म्हणून”, आकाश

“त्यानंतर तू मला प्रपोज देखिल केलं; पण माझं मन तुझ्यात गुंतायला तयार नव्हतं; कुठे तरी आशा होती की, माझे संध्या वरचे प्रेम खरे असेल तर ती नक्की आपल्याला पुन्हा भेटेल”, आकाश

“अन माझ्या नशिबाने देखिल माझी साथ दिली, मला एके दिवशी एका मॉल मध्ये संध्याची झलक दिसली”, आकाश

यानंतर आजपर्यंतची सर्व कहाणी आकाश निशाला सांगत होता. अन बोलता-बोलता त्याचे लक्ष निशाच्या डोळयांकडे गेले.

तिला खुप गहीवरुन आले होते. तिचे डोळे पाण्याने गच्च भरले होते.

पण अजूनही तिच्या अश्रुंना कशाने तरी आवर घातल्या प्रमाणे तिच्या डोळयातील अश्रु आपली सिमा पार करु इच्छित नव्हते.

आकाशने अचानक आपले बोलणे थांबविले अन तो एक क्षण तिच्याकडे टक लाऊन पाहू लागला.

आतापर्यंत तिने आपल्या डोळयांना घातलेला आवर सुटला अन अश्रुंचा बांध फुटून अश्रु घळा-घळा वाहु लागले.

अश्रुंचा प्रत्येक थेंब खाली पडताना जणु हेच विचारत होता “ आकाश तू असे का केलेस?”

टेबलावरील कॉफीच्या मगातील कॉफीवर आलेला फेस तिच्या अश्रुचा प्रत्येक थेंब आपल्या मध्ये सामावून घेत होता; अन आकाशकडे बघ्याच्या भुमिकेशिवाय काहीच नव्हते.

खरं तर आकाशची जबाबदारी आज तो कॉफीचा मग पार पाडत होता. आकाशनेही तिच दु:ख अश्रुंमध्ये वाहून जावं या उद्देशाने तिला काही काळ तसेच रडु दिलं.

काही वेळाने जणु आसवांचा तलाव आटावा; तसे तिच्या डोळयातील अश्रु बाहेर येणे थांबली.

काही काळ कुणीच काही बोलले नाही; आकाशने वेटरला हाक मारुन न पिलेली कॉफी बदलून दुसरी नविन कॉफी आणण्याची ऑर्डर दिली.

“निशा! प्लिज....”, आकाश

त्याचा हात तिच्या हातावर होता; तिने क्षणाचा विचारही न करता आपला हात बाजुला केला अन ति सावरुन बसली.

आज फर्स्टटाईम असे घडले होते की निशाला आकाशचा हवा-हवासा स्पर्श परका वाटु लागला होता.

तोपर्यंत वेटर दुसऱ्यांदा कॉफी घेऊन आला.

आज का कुणास ठाऊक पण कॉफीतील गोडवा कमी वाटत होता; अगदी कॉफी तिच अन कॉफीशॉप ही तेच असून तरीही....

काही वेळाने निशाने स्वतःला सावरत स्वत:च आकाशशी बोलण्यास सुरवात केली.

“हम्म! मग आकाशराव, कधी करताय लग्न”, निशा

तिच्या ह्या प्रश्नाने आकाश समजून चुकला की निशा जरी वरुन-वरुन स्वत:ला सावरत असली तरी मनातून खुप खचली आहे.

“सांगेन लवकरचं”, आकाश

“पण निशा आपण चांगले फ्रेन्ड तर राहु शकतो न?”, आकाश

“संध्या असताना तुला माझी काय आवश्यकता”, निशा

“हे बघ निशा; संध्या माझी प्रेयसी आहे अन तू माझी खुप चंगली फ्रेन्ड. अन मला असे वाटते की तिची जागा तू नाही घेऊ शकत अन तुझी जागा ती”, आकाश

“तेव्हा मला आयुष्यात कधीही मैत्रीची कमी भासु नये म्हणून मला तुझ्या सारखी मैत्रीण आयुष्यभर हवी आहे”, आकाश

“हे तुझं मत असेल पण आपली मैत्री संध्याला मान्य असेल का?”, निशा

निशाच्या ह्या प्रश्नावर आकाशला हसु आले.

“काय झालं; अन का हसतोस वेड्या सारखं”, निशा

“अग वेडी, संध्याचीच तशी इच्छा आहे. तिला आपली मैत्री कायम असावी असे वाटते”, आकाश

आकाशचे बोलणे ऐकताच निशा पटकन खिन्न झाली.

“अगं काय झालं दु:खी व्हायला?”, आकाश

“ काही नाही आकाश”, निशा

“बोल नं! नक्किच काही तरी लपवतेस तु”,  आकाश

निशाच्या डोळयांतून पुन्हा एक अश्रुची धार खाली ओघळली.

“खरंच आकाश, संध्याच्या बाबतीत मी किती चुकीचे होते; तिच्या जागी जर मी असते; तिला कधी तुझ्या आप-पास देखिल भटकु दिले नसते”, निशा

“खरंच खुप मोठ्या मनाची आहे संध्या”, निशा

“आकाश! आपल्याला निघायला हवे; अजून जास्तवेळ मी तुझ्या समवेत थांबली तर कदाचित स्वत:ला सावरु शकणार नाही”, निशा

निशाने आपली बॅग उचलली अन ती चालु लागली.

“निशा मी ड्रॉप करतो तुला”, आकाश

“प्लिज आकाश; मी जाते ऑटो पकडून, आता मला तुझ्या शिवाय राहायची सवय करायला हवी, निशा आकाशकडे वळून न बघताच बोलून गेली”

आज अशी पहिली वेळ होती की आकाश तिला ड्रॉप करण्यासाठी फोर्स करत होता अन ती त्याला टाळत होती. नाहीतर इतर वेळी ती त्याला हट्टाने घरी सोडण्यास भाग पाडत असे.

तिच्या या एका वाक्याने आकाशच्या मनाला भगदाड पडलं; जाणून-बुजून नाही पण अजाणतेपणे आपण निशाला खुप दुखावले आहे याची जाणीव झाली त्याला.

पण तिला न थांबवणेच योग्य समजले त्याने. कारण जर त्याने निशाला दुखावले नसते तर निश्चितच संध्या दुखावली गेली असती; अन मग ना आकाश खुष राहु शकला असता ना संध्या, ना निशा.....

त्रिकोणातल्या त्या तीन कोनांप्रमाणे तिघांची अवस्था झाली असती; जे एकमेकांसमोर तर असतात पण कधी भेटु शकत नाही....

आकाश देखिल काही वेळाने घरी जाण्यास निघाला.

घरी गेल्या-गेल्या दिवसभरात संध्या अन निशाच्या सोबत झालेलं बोलणं सगळ काही त्याने मालतीबाईंना सांगितलं. मालतीबाई सुखावल्या; शेवटी आपला मुलगा लग्नासाठी तयार झाला ह्याचा खुप मोठा आनंद त्यांना झाला होता.

मालतीबाईंना आता जरा सुद्धा वेळ घालवु द्यायचा नव्हता; त्यांनी येत्या दोन-चार दिवसांतच संध्याच्या घरच्यांशी आकाश अन संध्याच्या लग्नाची बोलणी करण्याचे ठरविले.

“आकाश आपण पुढच्या दोन दिवसांतच संध्याच्या घरी तिला मागणी टाकण्यासाठी जाउयात”, मालतीबाई

“अग आई, जरा दमाने; संध्याने तिच्या घरच्यांना अजून काहीही सांगीतले नाही मिळत”, आकाश

“तिला अगोदर तिच्या घरच्यांना विश्वासात घेऊ दे, मग आपण तिच्या घरच्यांसमोर लग्नाचा प्रस्ताव ठेऊ”, आकाश

“ठीक आहे बाळ; पण आता जास्त थांबायचे नाही, मला माझी सून कधी एकदाची घरी येते असं झालं आहे”, मालतीबाई

“आई. तू पण नं”, आकाशच्या चेहऱ्यावर थोडीशी लाजेची छटा उमटली, अन तो तेथून आपल्या रुमकडे निघून गेला.

बेडवर पडून तो संध्या अन त्याच्या पुढच्या आयुष्याची स्वप्ने रंगवत होता अन दुसऱ्या बाजुला नियती काही वेगळीच खेळी खेळत होती.

आकाशच्या नकारामुळे निशा डिप्रेशन मध्ये जाऊ लागली होती. अन तिच्या मनात संध्याबद्दल चिड निर्माण होऊ लागली होती.

“काहीही झाले तरी मी संध्याला आकाशची कधीच होऊ देणार नाही”, निशा स्वत:शीच पुटपुटली अन तिने समोरच्या टेबलावरील वस्तु इतस्त: विखरुन टाकल्या.

तिच्या मनात आता संध्याबद्दल प्रचंड तिरस्कार निर्माण होऊ लागला होता. कारण आकाश सोबत बघितलेली भावी जीवनाची स्वप्ने तिच्या डोळया देखत तुटत होती.

“निशा काहीतरी कर, असे स्वस्थ बसून काहीही होणार नाही”, तिचे मन राहून-राहून तिला आकाशपासूनच्या दुराव्याची आठवण करुन देत होते.

आकाशने संध्याला फोन केला अन आपली आई तुझ्या घरच्यांपाशी आपल्या दोघांच्या लग्नाबाबतीत लवकरच बोलणार असल्याचे सांगीतले. आकाशचे बोलणे ऐकताच संध्याच्या गालावरील खळी अधिकच खुलली; अन मी नाही जा... असे बळेबळेच बोलून संध्या लाजेने अधिकच लाजून गेली.

नंतर बराच वेळ ते दोघे फोनवर आपल्या भावी आयुष्याबाबत बोलत होते, बोलता-बोलता रात्रीचे २.०० कधी वाजले दोघांनाही समजले नाही.

बोलता बोलता संध्याची नजर खिडकी पाशी गेली अन आपल्याला कुणीतरी बघत असल्यासारखे तिला वाटले, तिने उठुन खिडकीच्या आजु-बाजुला नजर टाकली पण तिथे कुणीच नव्हते.

ती पुन्हा आपल्या बेडवर येऊन बसली अन आकाश सोबत बोलु लागली.

“काय झाले संध्या?”, आकाश

“अरे काही नाही”, संध्या

“ओके आकाश, खुप वेळ झालाय आता आपल्याला झोपायला हवे, उद्या बोलुयात”, संध्या

असे बोलून तिने फोन ठेवला अन ति पुन्हा एकदा खिडकी पाशी जाऊन बाहेर डोकावू लागली, पण तिथे कोणी चिटपाखरू देखिल नव्हते.

तिने खिडकी व्यवस्थित बंद केली अन ती बिछान्यावर पडली.

परंतु तिला त्या विचाराने झोप लागत नव्हती, “खरंच तिथे कुणी होते की आपल्याला भास झाला”, ती स्वत:शीच पुटपुटु लागली.

इतक्यात बाहेत कुत्रे भुंकण्याचा आवाज आला, तिने खिडकी न खोलताच फक्त खिडकीचा पडदा बाजुला सारुन बाहेर बघण्याचा प्रयत्न केला.

अन तिला एकदम धक्काच बसला, बाहेर काही अंतरावर एक काळी आकृती चालत जात होती, खिडकी बंद असल्यामुळे ती व्यक्ती कोण होती हे तिला ओळखता नाही आले.

ती एवढी घाबरली होती की तिने खिडकी उघडून ती व्यक्ती कोण आहे हे पाहण्याचे धाडसही केले नाही.

तिने पटकन पडदा बंद केला अन तशीच ती बेडवर पडली.

“आपण आकाशला फोन करुयात का?”, तिने स्वत:लाच प्रश्न केला.

पण घड्याळयात २.३० वाजून गेले म्हणून तिने आकाशला फोन करण्याचे टाळले.

ती बेडवर पडली पण ती आकृती अजून देखिल तिच्या डोळयासमोरुन जात नव्हती. शेवटी बऱ्याच वेळाने तिचा डोळा लागला.

“आकाश वाचव मला, वाचव मला”, संध्या मोठ्या-मोठ्याने ओरडत पळत होती.

अन एक काळा कोट घातलेली व्यक्ती तिच्या मागे मोठा सुरा घेऊन तिला मारण्यासाठी तिचा पिछा करत होता. संध्या जिवाच्या आकांताने पळत सुटली होती, पळता-पळता एक लोखंडी पाईप तीच्या हाताला लागला, तिने तो त्या व्यक्तिच्या दिशेने भिरकावला. तसा ती व्यक्ती संध्याकडून भिरकावलेल्या पाईपपासून वाचण्यासाठी बाजुला झाली. पण त्या पाईपाची कडा त्या व्यक्तिच्या पायाला लागली अन ती खाली पडली.

त्याच्या पडण्याचा फायदा उचलत संध्या तेथुन पसार झाली अन एका आडोशाला लपली.

ती व्यक्ती विव्हळतच पुन्हा उठली, अन बाजुला पडलेला सुरा उचलून मोठ्या मोठ्याने ओरडु लागली “मी आज तुला जीता सोडणार नाय, तू कायपण कर माझ्या हातून वाचणार नाय”

संध्याला काहीच समजत नव्हते की ही व्यक्ती आपल्या जिवावर का उठली आहे. ती आपला श्वास रोखुन त्या लपलेल्या जागीच दबा धरुन बसली. ती व्यक्ती खुप चिडलेल्या अवस्थेत आपल्या हातातील चाकुने हवेत सपा-सप वार करत संध्याला शोधत होती.

संध्याला समजत नव्हते काय करावे, पण तिथे लपून राहण्याशिवाय तिच्याकडे पर्याय नव्हता. काही वेळाने सर्व शांत झाले, ती व्यक्तीही कुठे निघून गेली.

आता संध्या लपलेल्या ठीकाणावरुन बाहेर निघण्याच्या विचारात होती. अन........

अचानक तिच्या खांद्यावर कुणाचा तरी हात पडला; त्या हाताचा रख-रखीत स्पर्श जाणवताच संध्या जोरात किंचाळली.....

“काय गं, काय झाले?”, संध्याची आई धावतच तिच्या बेडरुम मध्ये शिरली अन संध्याला हलवु लागली.

तशी संध्या एकदम बेडवर उठुन बसली, तिला तरतरुन घाम आला होता.

“ओ बये, काय झालं असं किंचाळायला, अन किती घाबरली आहेस, अंग किती घामाने भरलं आहे?”, असे कितीतरी प्रश्न तिची आई करत होती. परंतु ती अजून त्याच स्वप्नाच्या दहशतीत होती.

काही वेळाने ती त्या स्वप्ननाच्या दहशतीतून बाहेर आली.

“काय झाले बाळा”, संध्याची आई तिला कुशीत घेऊन कुरवाळत होती अन तिची विचारपुस करत होती.

संध्याने आपल्याला पडलेले स्वप्न जशेच्या तसे आपल्या आईला सांगीतले.

“हम्म, म्हणून सांगत असते हॉररर मुव्ही पाहत जाउ नको असं”, संध्याची आई

तिने संध्याच्या डोक्यात मस्करीतच एक चपटी मारली अन लवकर आटपून घ्यायला सांगून ती संध्याच्या बेडरुम मधून निघून गेली.

संध्याने जाणून-बुजून काल रात्री खिडकीच्या बाहेर पाहिलेल्या त्या आकृतीबाबत आपल्या आईला काही सांगीतले नाही, नाहीतर आपली आई अधिक घाबरुन जायची.

तिने आवरुन घेतले अन ती जॉबवर जाण्यास निघाली.

आज तिचे लक्ष कामात लागत नव्हते, राहून-राहून तिला काल रात्री घडलेला प्रकार अन रात्री पडलेले स्वप्न आठवत होते. न राहवून शेवटी तिने आकाशला फोन केला अन संध्याकाळी भेटावयास सांगीतले.

संध्याकाळचे ६.०० वाजले होते; आकाश नेहमीच्याच कॉफी शॉप मध्ये संध्याची वाट पाहत एक कोपऱ्यातला टेबलावर बसला होता. तसे ते टेबल एकदम कोपऱ्यात असल्यामुळे तेथुन कॉफी शॉप मधले बाकीचे बरेचसे टेबल दिसत असले तरी बाकीच्यांना ते टेबल सहजा-सहजी नजरेत पडत नसे. संध्याची वाट पाहून बोअर झालेल्या आकाशने आपला मोबाईल काढला अन त्याच्या पुरता आवाज येईल एवढ्या लहान आवाजात गाणी प्ले करुन तो गाण्याचा आस्वाद घेऊ लागला.

गाणी ऐकता-ऐकता त्याची नजर एका टेबलाकडे गेली.

त्या टेबलवर अविनाश, म्हणजेच त्याचा मित्र अव्या काही व्यक्तींसोबत बोलत बसलेला होता. अविनाशचे अन त्या व्यक्तींचे काय संभाषण चालले आहे ते त्याला ऐकु येत नव्हते; परंतु एकंदरीत हाताच्या अन चेहऱ्याच्या हाव-भावावरुन काही तरी बाचा-बाची चालली आहे असे जाणवत होते.

आकाशने उठुन जाऊन अविनाश अन त्या व्यक्तींमध्ये काय घडतेय हे पाहण्यासाठी जाण्याचा प्रयत्न केला; पण समोरच्या खिडकीतून त्याला संध्या येत असल्याची नजरेस पडली अन तो तिथेच आपल्या टेबलावर बसून राहिला.

संध्या कॉफी शॉप मध्ये शिरताच तेथील एका सर्व्हिस बॉयने तिला आकाशच्या टेबलाकडे ईशारा केला. आकाशने आधीपासूनच काउंटर वर सांगून ठेवले होते; तसा मॅसेज त्या सर्व्हिस बॉयने तिला दिला. अन सरळ ती आकाश बसलेल्या टेबल वर येऊन बसली.

संध्या टेबलवर येऊन बसली तरी आकाशचे लक्ष अविनाश अन त्या व्यक्तींकडेच होते.

“हाय! मिस्टर कोणत्या तंद्रीत आहेस”, संध्या

“अम्म! काही नाही, का तडका-फडकी मला ईथे बोलवले?; एवढं प्रेम की आता माझ्या शिवाय एक दिवसही काढणे कठीण झालंय तुला”, आकाश मिस्किल पणे बोलून हसु लागला.

“ए चल हम्म, तसे काही नाही. मला तुझ्याशी काही महत्वाचे बोलायचे आहे”, संध्या

“काय झाले”, आकाश

तिने आजु-बाजुला बघितले अन आजु-बाजुला कोणीही नसल्याचे कन्फर्म करुन ती आकाश सोबत बोलु लागली.

“आकाश..... काही दिवसांपासून मला सारखे वाटत आहे की कुणी तरी माझ्यावर लक्ष ठेऊन आहे”, संध्या

“ काहीही काय बोलतेस वेड्या सारखी”, आकाश

“तुझ्यावर का म्हणून कोण लक्ष ठेवेल”, आकाश तिच्या वक्तव्यावर हसु लागला.

आकाश आपल्याला सिरिअस नाही घेत हे पाहून संध्याचा पारा हळु-हळु चढु लागला.

“हे बघ आकाश; तुला माझ्यावर विश्वास नसेल तर सांग तसे, पण हसु नकोस; मी काय तुला जोक सांगत नाहिए”, संध्या

“बर बाबा; काय झाले ते सांग”, आकाश

“असं का वाटते तुला, की कोणी तुझ्यावर लक्ष ठेऊन आहे”, आकाश

संध्याने काल रात्री घडलेला प्रकार, अन रात्री तिला पडलेले ते स्वप्न सगळे सविस्तर आकाशला सांगीतले.

आता मात्र आकाशही थोडा गंभीर झाला.

दोघांच्याही मनात एकच विचार घोंगावत होता “काल रात्री घडलेला प्रकार अन त्या स्वप्नाचा खरंच काय संबंध असेल का?”

“आकाश! आपण पोलिस केस करुयात का?”, संध्या

“हे बघ; ती व्यक्ती फक्त एकदाच तुला दिसली, अन तिचा चेहरा देखिल तू पाहीला नाही. तेव्हा पोलिस देखिल तुझा काहीतरी भास झाला असेल असे समजून अशी केस घेण्यास तयार होतील की नाही ते सांगता नाही येत”, आकाश

“पण आकाश... “ संध्या

“हे बघ संध्या मला तुझी परिस्थिती समजतेय; पण आपण जास्त घाई करायला नको”, आकाश

“आणखी काही दिवस आपण बघु असं काही घडते का? की तो फक्त तुला झालेला भास होता; अन मग तसेच काय असेल तर आपण पोलिसांकडे जाउया”, आकाश

“ठिक आहे” संध्या

दोघांनीही आपली कॉफी संपविली अन बिल पे करुन दोघेही जायला निघाले.

जाता-जाता आकाशने अविनाश बसलेल्या टेबलकडे नजर भिरकावली, पण तिथे कोणीच नव्हते.

अविनाश अन त्या व्यक्ती कधीच्या तेथुन निघून गेल्या होत्या.

त्याला चलता-चालता त्या टेबलाखाली काही तरी पडलेले असल्याचे जाणवले; पण संध्या सोबत असल्यामुळे तो तसाच कॉफी शॉपच्या बाहेत पडला अन तिला टॅक्सी मध्ये बसवून देऊन तो तसाच परत त्या कॉफी शॉप मध्ये घुसला.

अविनाश बसलेल्या टेबलाजवळ तो आला अन त्याने तेथे पडलेले कागदाचे काही तुकडे आपल्या कोटच्या खिशात कोंबले अन परत तो घरी जाण्यासाठी बाहेर पडला.

“साहेब काही विसरले का?” सर्व्हिस बॉय

“अरे काही नाही. गॉगल विसरलो होतो”, आकाशने त्या सर्व्हिस बॉयला थाप मारली.

घरी पोहोचल्यावर त्याने ते सर्व कागदाचे तुकडे खिशातून बाहेर काढले अन तो त्यांचे बारकाईने निरिक्षण करु लागला.

त्यामध्ये काही बिले होती, तर काही बिलांच्या मागे सांकेतिक भाषेत काहीतरी लिहिले होते. पण ते सर्व आकाशच्या समजण्याच्या पलीकडे होते. त्याने ते कागदाचे तुकडे जमा केले अन आपल्या कपड्याच्या कपाटात एक ठिकाणी ठेऊन दिले.

कपाट बंद करताना कसल्याशा वासाने शिंका आली म्हणून त्याने आपला हात नाकावर ठेवला अन अजून काहीतरी उग्र वास त्याच्या नाकात शिरला. त्याने तसेच त्या कागदांच्या तुकड्यांचा वास घेतला अन त्याला भोवळ आल्या गत झाले. ते कागदाचे तुकडे तेथेच सोडून तो कसा-बसा आपल्या बिछान्यावर जाऊन पडला.

काही वेळासाठी तो नशेच्या अंमलात गेल्या सारखे त्याला जाणवले. त्याने ते कागदाचे सर्व तुकडे जमा केले अन एका प्लास्टीकच्या पिशवीत भरले.अन ती पिशवी आपल्या कपड्याच्या कपाटात ठेऊन दिली.

मोबाईल काढला अन युट्युब वर काही विडिओज बघितले अन काहीतरी कन्फर्म केले.

“म्हणजे अव्या ब्राऊन शुगरच्या आहारी जातोय की काय?”, त्याने स्वत:लाच प्रश्न केला.

“नाही. कदाचित तो कागद अव्याला भेटायला आलेल्या त्या व्यक्तींपैकी कुणाचा असु शकतो”, त्याने स्वत:लाच अव्याच्या बाबतीत आश्वस्त केले.

नंतर त्याने अविनाशला फोन लावला, पण अविनाशला रिंग जाण्याच्या अगोदरच त्याने कॉल कट केला. कदाचित त्याच्या मनात काही वेगळाच विचार चालत होता.

तसं आता संध्या अन आकाशच जीवन मस्त चाललं होतं, दोघेही कामात कितीही बिझी असले तरी एक-मेकांसाठी वेळात-वेळ काढुन एक-मेकांना भेटत होते.

मधल्या काळात मालतीबाईंनी देखिल संध्याच्या घरी आकाश आणि संध्याच्या लग्नासाठी विचारपुस केली होती. अन संध्याच्या घरच्यांना देखिल आकाश आणि संध्याच लग्न व्हावं असं मनापासून वाटत होते.

दोघांच्याही घरचे एक चांगला मुहुर्त बघून दोघांची इंगेजमेंट करण्यासाठी आतुर होते. तसं त्यांनी ब्राम्हणाकर्वी इंगेजमेंट करीता तारीख विचारली होती; परंतु इंगेजमेंट योग्य मुहुर्त नसल्या कारणाने ब्राम्हणाने काही काळ थांबण्यास सांगीतले होते.

इथे निशाने देखिल आकाश अन संध्याच्या नात्याचा स्विकार करुन मुद्दाम आकाशपासून दुरच राहणे पसंत केले होते; पण अधून-मधून ती त्याला फोन करत असे.

खुप दिवस उलटून गेले होते; ती काळा कोट घातलेली व्यक्ती पुन्हा काही संध्याच्या नजरेस पडली नाही. परंतु तिला कोणी तरी मारण्याचा प्रयत्न करीत आहे असे स्वप्न आज देखिल तिला अधून-मधून पडत होते. अन त्या बाबतीत तिने आकाशला देखिल सांगीतले होते; पण आकाश तिला प्रत्येक वेळी सांगत असे की तू ते स्वप्न मनाला एवढे लाऊन घेतले आहेस की ते तुझ्या अंतरमनात बसले आहे, आणि म्हणून तुला ते स्वप्न सारखे-सारखे पडत आहे.

सकाळची ११.४५- १२.०० ची वेळ असेल उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे रस्त्यावर लोकांची वर्दळ देखिल कमीच होती. संध्या आपल्या कामात व्यस्त होती. बाकीचे कर्मचारी देखिल आपापल्या कामात व्यस्त होते. उन्हाळयाच्या दिवसांमुळे बॅंकेत देखिल गर्दि कमीच होती.

अचानक कसला तरी आवाज आला; अन कुणाला काही कळायच्या आत ३-४ मास्क घातलेल्या व्यक्ती बॅंकेत शिरल्या. प्रत्येकाच्या हातात पिस्तुल होते. त्यांना बघताच एकच हाहाकार उडाला; प्रत्येकजण एकच गलका करु लागला.

उडालेला गोंधळ पाहून त्यातील एकाने आपल्या हातातील पिस्तुलातून हवेत गोळी झाडली अन सर्वांना उद्देशुन म्हणु लागला " आहेत त्या स्थितीत जाग्यावर थांबा नाहीतर इथे मुडदे पाडीन".

अन सर्वजण काहीही हालचाल न करता जागच्या-जागी थबकले. संध्याचं लक्ष दरवाज्याकडे गेलं; पण तिथे सुरक्षा रक्षक नव्हता.

तो खाली वेदनेने विव्हळत पडला होता. त्याच्या खांद्याला गोळी लागली होती अन त्यातून खुप रक्त वाहत होते; काही वेळाने त्या सुरक्षा रक्षकाची शुद्ध हरपली.

त्या चोरांपैकी एकाने पटकन बॅंकेतील रोकड पोतड्यात भरायला सुरुवात केली. दुसऱ्याने बॅंकेतील प्रत्येकाजवळच्या सोन्याच्या वस्तु जमा केल्या.

आणखी त्यापैकी एक संध्याजवळ आला अन त्याने संध्याची बॅग ओढुन घेतली. पण संध्याने आपली बॅग तो चोर घेत असतानाच प्रतिकार म्हणून आपल्या बॅगेचा एक पट्टा खेचला.

पण त्या चोराची पकड एवढी मजबुत होती की त्या बॅग सहीत संध्यादेखिल पुढच्या बाजुला ओढली गेली. तिच्या बॅगमध्ये तिचा मोबाईल अन बॅंकेतील लॉकरच्या काही चाव्या असल्या कारणाने ती आपली बॅग त्या चोराकडे जाण्याला विरोध करत होती.

संध्या बरोबर चाललेल्या झटापटीचा फायदा घेत बॅंकेतील एका कर्मचाऱ्याने 100 नंबर डायल करुन पोलिसांना दरोडा पडल्याची माहीती दिली. त्याच वेळी त्या चोरांपैकी एकाचे लक्ष त्या कर्मचाऱ्याकडे गेले. अन त्याने त्या कर्मचाऱ्याच्या दिशेने गोळी झाडली.

परंतु तो कर्मचारी पटकन खाली वाकला. अन ती गोळी त्या कर्मचाऱ्याच्या मागे असलेल्या लोखंडी खांबावर आदळून रिव्हर्सला आली अन संध्याच्या कमरेत घुसली. तशी संध्या मोठ्याने ओरडून खाली कोसळली. पुन्हा एकच गोंधळ उडाला अन त्या परिस्थितीचा फायदा उचलत दरोडेखोरांनी तेथुन सर्व मुद्देमालासहीत व संध्याची बॅग घेऊन पळ काढला.

पळण्याच्या नादात त्यातील एकाचे मास्क दरवाज्याला असलेल्या चुकेत अडकले अन फाटले. त्याने पुन्हा पटकन आपला चेहरा कव्हर केला. पण हा सर्व घटनाक्रम बँकेतील CCTV कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त होत होता.

दरोडेखोरांनी पळ काढला. अन काही वेळानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले. नंतर पोलिसांनी ॲम्बुलन्स मागवून सुरक्षा रक्षक व संध्याला हॉस्पिटल मध्ये हलविले.

“बॉस! आज तुमच्या शातीर दिमाखामुळे आपण डबल गेम खेळण्यात यशस्वी झालो”, एक दरोडेखोर

“हो ना बॉस! त्या अविनाशने तुम्हाला त्या मुलीची बॅग काय पळवायला सांगीतली अन तुम्ही तर तिच्या बॅग सोबतच ती काम करत असलेल्या बँकेलाच लुटले. काय प्लान केला तुम्ही बॉस”, दुसरा दरोडेखोर

“इट्स माय ब्रेन. अन त्या अविनाशकडून पैसे घेतले ते वेगळे”, असे बोलून त्यांचा बॉस जोरा-जोरात हसु लागला.

“पण बॉस, बँकेतून पळताना ह्या तेजाचं मास्क फाटलं. काही प्रोब्लेम तर नाही होणार ना?” एक दरोडेखोर

“अरे नाही होत काय प्रोब्लेम, कॅमेरे बँकेच्या आतल्या बाजुला होते'; अन आपण बाहेर पडताना ह्याचे मास्क फाटले. जरी कॅमेऱ्यात आपण आलोच तरी मागच्या बाजुने आपल्याला कोण ओळखणार आहे”, असे बोलून त्यांचा बॉस पुन्हा जोर-जोरात हसु लागला.

इकडे हॉस्पिटल मध्ये डॉक्टरांनी संध्याला ऑपरेशन थिएटर मध्ये हलविले अन सुरक्षा रक्षकाला जास्त रक्त वाहून गेल्यामुळे मृत घोषित केले. बँक मॅनेजरने संध्याच्या घरच्या लॅन्डलाईन वर फोन केला.

समोरुन आवाज आला “ हॅलो”

आवाज एखाद्या साधारण चाळीशीतील बाईचा होता.

“हॅलो; मी XXXXX बँकेचा मॅनेजर बोलतो. आपण कोण?

“मी मिसेस XXX बोलते.” संध्याची आई

“संध्याच्या-च्या आई का- का तुम्ही?”, बँक मॅनेजर थोडा चाचपडत बोलत होता.

“हो. संध्याची आईच, काय झालं अन असे तुम्ही चाचपडत का बोलता आहात”, संध्याची आई

“एक वाईट बातमी आहे; संध्याला अपघात झाला आहे अन तिला आत्ता अमुक एका हॉस्पिटल मध्ये ॲडमिट केले आहे. तुम्ही शक्य तेवढ्या लवकर पोहोचा”, बँक मॅनेजरने एवढे बोलून फोन कट केला.

बँक मॅनेजरचे शब्द ऐकताच संध्याच्या आईचे हात-पाय गळून पडले, अन ती भोवळ आल्यागत जागच्या-जागी खाली बसून पडली.

तिने संध्याच्या बाबांना हाक मारली; पण यापुढे तिला काहीच बोलता येईना. संध्याच्या बाबांनी तिला अशा पडलेल्या अवस्थेत पाहून नीट उचलून बसविले अन तिला पाणी पाजले.

थोड्या वेळाने तिने सर्व प्रकार व बँक मॅनेजरशी झालेला संवाद संध्याच्या वडीलांना सांगीतला. संध्याच्या बाबांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन लगेच आपली गाडी काढली; संध्याच्या आईला सोबत घेतले अन ते हॉस्पिटलला जाण्यास निघाले. वाटेतूनच त्यांनी आकाशला देखिल घडला प्रकार फोनद्वारे सांगीतला अन हॉस्पिटलला पोहोचायला सांगीतले.

संध्याचे आई-वडील हॉस्पिटलला पोहोचले अन लगोलग आकाश देखिल काही वेळात हॉस्पिटलला पोहोचला. तोपर्यंत संध्याला ऑपरेशन थिएटर मध्ये हलविले होते अन तिचे ऑपरेशन चालु होते. सर्व फॉर्मॅलिटीज बॅंक मॅनेजरने पुर्ण केल्या होत्या.

बराच वेळ झाला तरी ऑपरेशन चालुच होते.

सर्वांच्या मनाची घालमेल अन धाक-धुक वाढली होती.

संध्याच्या आईला तर धक्काच बसला होता अन ती एखाद्या स्टॅच्यु प्रमाणे स्थब्ध बसून होती, फक्त तिच्या डोळयांतून सतत वाहणारे अश्रु तिच्या जिवंतपणाची जाणीव करुन देत होते.

काही वेळाने डॉक्टर ऑपरेशन थिएटरच्या बाहेर आले. आकाश, संध्याचे वडील असे सर्वांनी डॉक्टरांकडे धाव घेतली.

“डॉक्टर साहेब, माझी पोरगी कशी आहे आता?”, संध्याच्या वडीलांनी डोळयांतून अश्रु गाळतच डॉक्टरांना प्रश्न केला.

“हे बघा; ऑपरेशन व्यवस्थित पार पडलयं. पण अजून ती शुद्धीवर आली नाही तोपर्यंत मी काहीही सांगु नाही शकत”, डॉक्टर

डॉक्टरांचे शब्द ऐकताच संध्याचे वडील देखिल पायातील प्राण गेल्या प्रमाणे खाली पडणारच होते तवढ्यात आकाशने त्यांना सावरले.

“पण डॉक्टर साहेब संध्या कधीपर्यंत शुद्धीवर येईल काही आयडिया”, आकाश

आकाशदेखिल मनातून खुप खचला होता; पण या स्थितीत स्वत:ला सावरुन संध्याच्या घरच्यांना धीर देणे महत्वाचे होते हे तो जाणत होता. त्याने संध्याच्या वडीलांना सोफ़्यावर बसविले अन तो डॉक्टरांशी बोलत-बोलत डॉक्टरांच्या केबीनपर्यंत गेला.

काही वेळाने डॉक्टरांनी बॅंकेच्या मॅनेजरला देखिल आपल्या केबिन मध्ये बोलावून घेतले. त्या तिघांमध्ये बराचवेळ चर्चा चालली. डॉक्टरांनी संध्याच्या बाबतीत बॅंकेंत घडलेला सर्व प्रकार बॅंक मॅनेजरकडून माहीत करुन घेतला.

“हे बघा! तुम्हा दोघांच्या माहीतीसाठी सांगतो; मी जरी बाहेर सांगीतले असले की संध्या जोपर्यंत शुद्धीवर येत नाही तोपर्यंत काहीही सांगु शकत नाही; तरी ऑपरेशनच्या वेळी मला आलेल्या अनुभवानुसार संध्याच्या मणक्यामध्ये गोळी लागल्यामुळे तिचा कमरेखालचा भाग पॅरालाईज झाला आहे. अन कदाचित ती यापुढे चालु शकणार नाही.

डॉक्टरांचे बोलणे ऐकताच आता आकाशच्या पाया खालची देखिल जमीन सरकली.

पण त्याने स्वत:ला सावरले.

“डॉक्टर साहेब काही तरी उपचार असेल नं; तुम्ही सांगतील तेवढा पैसा मी ओतायला तयार आहे”, आकाश

“तुम्ही सांगतील ती सर्जरी आपण करु; पण प्लिज माझ्या संध्याला पहिल्यासारखे चालता-फिरता आले पाहीजे”, आकाश

डॉक्टर आपल्या खुर्चीवरुन उठले; आकाश बसलेल्या खुर्ची पाशी गेले अन आकाशच्या खांद्यावर थोपटून आकाशशी बोलु लागले.......

“बेटा आपल्या हातात असते तर असे कधी होऊच दिले नसते. तरीपण आपण आपल्या परीने सर्व प्रयत्न करु”, डॉक्टर

“काहीही झाले तरी आपण संध्याला पुर्ववत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करु”, डॉक्टर

डॉक्टरांच्या सहानुभुती पुर्वक बोलण्यामुळे आकाशला थोडे बरे वाटले.

# ६

आज ऑपरेशन झाल्यापासून तिसऱ्या दिवशी संध्या शुद्धीवर आली होती.

तिने आईला आवाज दिला; पण आजु बाजुला कुणीच नव्हते. तिने आपले डोळे उघडले अन ती आजु-बाजुला पाहु लागली. आता तिला जाणवत होते की ती ICU मध्ये होती. तिने उठण्याचा प्रयत्न केला; पण तिला काही केल्या उठता येईना. तिने आणखी एकदा तसाच उठण्याचा प्रयत्न करुन पाहीला. परंतु दुसरा प्रयत्न देखिल निरर्थक ठरला.

ती काही वेळ तशीच पडून राहीली; तिला त्या दिवशी आपल्या बरोबर बॅंकेत घडलेला प्रसंग आठवला.

काही वेळाने तिचे लक्ष ICU मधील डिजीटल घड्याळाकडे गेले, अन तिला धक्काच बसला.

“म्हणजे आपण तिन दिवसांपासून इथे आहोत”, ती स्वत:शीच पुटपुटली.

पुन्हा एकदा तिला तो प्रसंग आठवला........

ती त्या दरोडेखोरापासून आपली बॅग खेचत होती, अन अचानक तिच्या कमरेत एक जोराची कळ आली अन ती खाली कोसळली. तिने पुन्हा एकदा उठण्याचा प्रयत्न केला. पण पुन्हा ती अपयशी ठरली. आपले पाय आपल्या शरीरापासून कुणीतरी वेगळे केल्याचे तिला जाणवु लागले होते. तिने आपल्या पायावरची चादर घाबरत-घाबरत अलगद बाजुला केली. तिची दृष्टी तिच्या पायांवर पडली. ते जागेवर होते ते पाहून तिला खुप बरे वाटले; पण दुसऱ्याच क्षणी आपल्या पायांवर आपला कोणणताच ताबा नसल्याचे जाणवून ती जोरात किंचाळली अन रडु लागली.

तिची किंचाळी ऐकताच नर्स अन डॉक्टर ICU मध्ये आले.

संध्या ओक्साबोक्सी रडत होती. डॉक्टरांनी तिला शांत करण्याचा खुप प्रयत्न केला पण आता ती वेड्यासारखी डॉक्टरांवर देखिल हात उगारु लागली. शेवटी डॉक्टरांनी तिला एक इंजेक्शन दिले अन काही वेळातच तिची पुन्हा शुद्ध हरपली.

इथे ICUच्या बाहेर तिच्या आई-वडिलांना, आकाशला अन इतरांना संध्या शुद्दीवर आल्याने बरे वाटत होते; पण आता ती कदाचित कधीच चालु शकणार नाही याचे दु:ख देखिल होत होते.

डॉक्टर ICUच्या बाहेर आले तसे सर्वांनी पुन्हा त्यांच्या आजु-बाजुला गर्दी केली. डॉक्टरांनी कुणाशीही जास्त न बोलता संध्याच्या आई-वडीलांना आपल्या केबिन मध्ये बोलावून घेतले. त्यांच्या सोबत आकाशही डॉक्टरांच्या केबिन मध्ये गेला.

डॉक्टरांनी संध्याच्या प्रकरणात अन तिला आलेल्या अपंगत्वाबाबत तिच्या आई-वडीलांशी सविस्तर बोलणं केले.

त्यांच्या म्हणण्यानुसार तुम्हाला हवं असल्यास तुम्ही संध्याच ऑपरेशन विदेशात करू शकता; पण त्याने तिला पुन्हा चालता-फिरता येईल याची गॅरंटी नव्हती.

एखादा चमत्कारच तिला बरे करु शकतो, असे डॉक्टरांचे म्हणणे होते.

डॉक्टरांचे बोलणे ऐकताच संध्याच्या आईच्या डोळयांतून पुन्हा अश्रुधारा वाहु लागल्या. आकाशने संध्याच्या वडीलांना ईशाऱ्यानेच संध्याच्या आईला डॉक्टरांच्या केबिन बाहेर घेऊन जाण्यास सांगितले. नंतर काही वेळ डॉक्टरांशी जुजबी बोलणे झाल्यावर आकाश देखिल तेथुन बाहेर पडला.

आकाश डॉक्टरांच्या केबिन मधून बाहेर पडला तसाच मागून एक आवाज त्याच्या कानी पडला.....

हॅलो; मिस्टर आकाश

बॅंक मॅनेजर त्याला आवाज देत होते.

“हाय; हॅलो; कसे आहात तुम्ही”, आकाश

“खरं तर मी विचारायला हवं; संध्या कशी आहे आता?”, बॅंक मॅनेजर

“ठिक आहे ती आता, पण कदाचित ती केव्हाच चालु नाही शकणार”, आकाश हताश स्वरातच बोलला.

“काहीच करता येणार नाही का आकाश?”, बॅंक मॅनेजर

आकाशने डॉक्टरांसोबत झालेले बोलणे जशेच्या-तसे बॅंक मॅनेजरला सांगीतले. आकाशचे बोलणे ऐकताच बॅंक मॅनेजरला देखिल दु:ख झाले.

“एनिवे; तुमचं काय चाललय”, आकाश

“काय सांगु आकाश; आमचं तर ग्रहमानच सध्या खराब आहे; इथे संध्याच असं अन बॅंकेत पोलिसांचा ससेमिरा; कधीही चौकशी साठी बोलावलं जाते.”, बॅंक मॅनेजर

“मग काही क्ल्यु वगैरा मिळतो की नाही पोलिसांना”, आकाश

“नाही. पोलिसांच्या अजून काहीच हाती लागलं नाही; शिवाय आमच्या कडलं CCTV फुटेज सोडून”, बॅंक मॅनेजर

“मग CCTV फुटेज वरुन काही कळलं की नाही?”, आकाश

“नाही. सर्वांच्या तोंडावर मास्क होते”, बॅंक मॅनेजर

“मी तुमच्या कडलं ते CCTV फुटेज बघु शकतो का?”, आकाश

“ओके; मी माझ्या सिनिअर्सची अन पोलिसांची परवानगी घेतो; अन तुम्हाला कळवितो”, बँक मॅनेजर

बँक मॅनेजरने आकाशचा निरोप घेतला अन दोघेही आप-आपल्या मार्गाला लागले.

आज बऱ्याच दिवसांनी एक महत्वाची बिझनेस डिल असल्या कारणाने आकाशने ऑफिस अटेंड केले होते. बिझनेस मिटींग चालु होती; अन मध्येच आकाशचा मोबाईल वाजला. त्याने  मोबाईलच्या स्क्रिनकडे लक्ष दिले; बँक मॅनेजरचा कॉल होता.

मिटींग मध्ये डिस्टर्ब नको अन मिटींग संपल्यावर आपण बँक मॅनेजरला कॉल करु या हेतुने आकाशने आपला मोबाईल सायलेंट मोडवर टाकला.

आकाश कॉल उचलत नाही म्हणून बँक मॅनेजरने आकाश साठी एक मॅसेज ड्रॉप केला. “ *मि. आकाश; तुमच्या सांगण्यावरुन मी माझ्या सिनिअर्सना अन पोलिसांना CCTV फुटेजबद्दल सांगीतले. तुमचे अन संध्याचे रिलेशन लक्षात घेऊन त्यांनी तुम्हाला परवानगी दिली आहे. तुम्हाला जमेल तसे मला बँकेत येऊन भेटा”,* बँक मॅनेजर

मिटींग संपल्यावर आकाशने बँक मॅनेजरचा मॅसेज रीड केला. अन त्याने बँक मॅनेजरला कॉल करुन विचारले मी आता बँक मध्ये येऊ शकतो का?

“हा! मिस्टर आकाश; मी ५.०० वाजेपर्यंत बँकेत आहे तुम्ही शक्यतो त्या अगोदर या.”, बँक मॅनेजर

आकाश ३.५०च्या आसपास बँक मध्ये पोहोचला.

“मे आय कम इन?”, आकाश

“ yes, या मिस्टर आकाश”, बँक मॅनेजर

चहा-पाणी घेऊन झाल्यावर बँक मॅनेजर आणि आकाश कम्प्युटर रुम मध्ये गेले.

बँक मॅनेजर ने CCTV फुटेज चा विडिओ स्टार्ट केला.

पुर्ण CCTV फुटेज बघून झाले; पण त्यामध्ये काहिच क्ल्यु मिळत नव्हता.

आकाशने रिक्वेस्ट करुन पुन्हा एकदा ते CCTV फुटेज प्ले करायला सांगीतले.

अन बघता-बघता आकाशला त्या मास्क फाटलेल्या व्यक्तीच्या मानेवर काहीतरी खुण असल्याचे जाणवले.

त्यांनी बँक मॅनेजरला सांगून झुम करायला सांगीतले.

अन आता त्यांच्या हाती एक क्ल्यु लागला होता; ती खुण हाच एकमेव क्ल्यु होता. बँक मॅनेजरने लगेच कॉल करुन पोलिसांना बोलावून घेतले. काही वेळाने पोलिस आले. बँक मॅनेजरने त्या CCTV फुटेज मधली व्यक्तीच्या मानेवर असलेली ती खुण पोलिसांना दाखवली.

“गुड; आता आपण आपला तपास चालु करु शकतो”, पोलिस इन्स्पेक्टर

त्या इन्स्पेक्टर ने आपल्या मोबाईल वरुनच काही लोकांना कॉल केले. अन ते घाई-गडबडीत बँक मॅनेजर अन आकाशचा निरोप घेऊन निघून गेले.

“मिस्टर आकाश खुप तिक्ष्ण नजर आहे हो तुमची”, बँक मॅनेजर

“अहो तसं काही नाही, फक्त जे दिसलं ते मी नोटीस केलं बस”, आकाश

जुजबी बोलण्यानंतर आकाश सुद्धा तेथुन बाहेर पडला अन आपल्या घराच्या दिशेने निघाला.

इथे पोलिस त्या खुणेच्या दिशेने तपास करुन आपल्या पोलिस रेकॉर्ड मध्ये असे काही मिळते का या तपास कामात लागले. बरेचसे रेकॉर्डस चेक करुन देखिल त्यांना त्यात सफलता मिळत नव्हती. कदाचित त्या व्यक्तीची पोलिस हिस्ट्री असण्याची शक्यता कमीच होती.

आकाश ड्राईव्ह करता-करता त्या CCTV फुटेजच्या बाबतीतच विचार करत चालला होता. त्याला त्या व्यक्तीच्या मानेवरील ती खुण आपण अगोदर कुठेतरी पाहिल्या सारखे जाणवत होते. बऱ्याच वेळा त्याने आपल्या मेंदुला ताण दिला; पण त्याला फक्त ती खुण  कुठे तरी पाहीली आहे ह्या व्यतिरिक्त काहीच आठवले नाही.

कामामुळे आलेल्या थकव्यामुळे कदाचित त्याला त्याचा मेंदु सहकार्य करत नव्हता. तो घरी पोहोचला आपली बॅग त्याने टेबलावर ठेवली अन थेट बाथरुम मध्ये शिरला. अंघोळ करुन जेव्हा तो बाथरुम मधून बाहेर पडला तेव्हा त्याला बरेच प्रसन्न वाटत होते.

त्याने आपल्या आईला कॉफी बनवायला सांगून त्याच्या बेडरुम मध्येच पाठवायला सांगीतली. कॉफी घेतल्यावर पुन्हा तो त्याच खुणेच्या बाबतीत विचार करु लागला.

बिछान्यावर पडल्या-पडल्या तो विचार करत होता; अन त्याला कधी झोप लागली ते समजलेच नाही.

तो रस्त्याने झप-झप चालत होता; हातात ऑफिसच्या बॅग ऐवजी संध्याची पर्स होती. मध्ये- मध्येच मागे देखिल वळून पाहत होता. एकदम भेदरलेल्या परिस्थितीत कुणीतरी आपला पिछा करतेय असे त्याला वाटत होते. तो पुर्ण घामा-घुम होऊन त्याचा शर्ट देखिल घामाने चिंब झाला होता.

तो शक्य तितक्या झप-झप चालत होता; पण कुठे जायचे आहे हेच त्याला ठाऊक नव्हते. त्याने पुन्हा एकदा मागे वळून पाहीले. आता मागचा रस्ता एकदम मोकळा दिसत होता. तो रस्त्याच्या बाजुला असलेल्या एका झाडाच्या कापलेल्या बुंध्यावर काही वेळ विश्रांतीसाठी बसला. त्याची भेदरलेली नजर ईकडे-तिकडे दृष्टीक्षेप टाकत होती. अन एका ठिकाणी त्याची नजर खिळली. काही अंतरावर एका झाडाच्या बुंध्यावर एक मुलगी बसली होती.

ती मुलगी मागून हुबेहुब संध्या सारखी दिसत होती.

छे! संध्या कशी असणार; ती तर हॉस्पिटल मध्ये आहे, असा विचार करुन त्याने तेथुन आपले लक्ष वळवले. कुणाच्या तरी चालण्याचा आवाज आला म्हणून पुन्हा त्याने त्या दिशेने बघितले. अन तो एकदम थक्कच झाला. ती मुलगी संध्याच होती. अन काहिही न झाल्या प्रमाणे व्यवस्थित ती चालत आकाश बसलेल्या दिशेने येत होती. ती जवळ आली तसे तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

तिच्या चेहऱ्यावरच्या स्मित हास्याने आता क्रुरतेची जागा घेतली होती.

ती आकाशच्या जसे जवळ आली तिचे डोळे रागाने लाल-बुंद झाले होते.

तिने आकाश जवळ येताच त्याच्या हातातील बॅगेवर झडप घातली अन ती त्याच्या हातातील बॅग हिसकावु लागली.

आकाश तिला प्रतिकार करु लागला तसा तिने कुठेतरी लपवून ठेवलेला चाकु काढला अन आकाशच्या मानेत खुपसला....

**एवढ्यात मालती बाईंनी आकाशला जेवणासाठी हाक मारली अन आकाश झोपेतून खडबडून जागा झाला.**

“हे काय विचित्र स्वप्न होते”, तो स्वत:शीच पुटपुटला अन जेवणासाठी खाली जाउ लागला.

काही दिवसांपासून घडलेला घटनाक्रम अन हे विचित्र स्वप्न त्याचा काहीच जम बसत नव्हता.

फ्रेश होऊन तो जेवणाच्या टेबलावर येऊन बसला; प्लेट मध्ये थोडे जेवण घेतले; ते बका-बका खाऊन उठला अन पुन्हा आपल्या बेडरुम मध्ये गेला.

मालतीबाईंना काहीच समजत नव्हते काय चालले आहे ते. कारण यापुर्वी आकाश असे कधीच वागला नव्हता.

त्यांनी स्वत:च जेवण वगैरा आवरुन त्या आकाशच्या बेडरुमकडे गेल्या तोपर्यंत आकाश झोपी गेला होता. संध्याच्या अशा अवस्थेमुळे कदाचीत आकाश असे वागत असेल अशा विचारातच त्याही आपल्या बेडरुमकडे गेल्या.

खुप दिवस होऊनही पोलिसांना त्या खुण असलेल्या व्यक्तिचा पत्ता लागु शकला नाही. त्यामुळे पोलिसही आता हताश झाले होते.

इथे आकाशही संध्याची काळजी अन ऑफिस मधल्या कामाच्या ताणामुळे त्या खुण असलेल्या व्यक्तीचा जास्त विचार करत नव्हता.

संध्याला हॉस्पिटल मधून घरी शिफ्ट केलं होत; पण तिच्या तब्येतीत विशेष फरक जाणवत नव्हता ह्याच गोष्टीचं आकाशला सर्वात जास्त टेंशन होतं.

दोन-चार दिवसांपुर्वी संध्याने आकाशला सांगून टाकले होते की माझी अशी अवस्था आहे की मी कधी चालु शकेन की नाही मलाच माहीत नाही. तेव्हा तू एखादी चांगली मुलगी बघून लग्न कर अथवा निशा बरोबर लग्न कर. संध्याने तिच्या घरच्यांना देखिल आकाशने दुसरीकडे लग्न करावे म्हणून राजी करुन घेतले होते. पण आकाशचे संध्यावर एवढे घट्ट प्रेम होते की, काहीही झाले तरी मी तुझ्याशीच लग्न करेन या गोष्टीवर तो अडून होता.

त्या दिवशी तो ऑफीसमधले काम आटपून नंतर संध्याला भेटून घरी आला. त्याने आपली बॅग टेबलावर टाकली अन तो कपडे चेंज करण्यासाठी कपड्याच्या कपाटातून कपडे काढु लागला. कपडे काढत असताना एक प्लास्टीकची पिशवी खाली पडली. त्यामध्ये काही कागदाचे तुकडे होते.

ही तिच पिशवी होती ज्यात आकाशने त्याला कॉफीशॉप मध्ये मिळालेल्या कागदाचे तुकडे भरुन ठेवले होते. ती पिशवी पाहताच एवढ्या दिवसांपासून तो जे आठवण्याचा प्रयत्न करत होता त्या गोष्टीचा त्याला उलगडा झाला. त्याच्या डोळयासमोर त्या दिवशी अव्या अन त्या व्यक्तींच्यामध्ये घडलेला प्रसंग समोर आला.

अन त्याला आठवले, आपण CCTV मध्ये पाहिलेली ती खुण असलेली व्यक्ती तीच होती जी त्या दिवशी अविनाश सोबत काहीतरी बोलत होती. त्या व्यक्तीने गोल गळा असलेले लुज टिशर्ट घातले होते; त्यामुळे ते टिशर्ट सारखे माने खाली जात होते. अन ती व्यक्ती टिशर्ट सारखे वरती चढवत होती.

तेव्हाच आकाशला त्या व्यक्तिच्या मानेवरची खुण दिसली होती.

हे सर्व आठवताच आकाशने सर्व घटना अन त्या स्वप्नाचा संदर्भ जोडून पाहण्यास सुरवात केली

“ ते स्वप्न - कदाचित आपल्या जवळची व्यक्तिच आपला घात तर करत नाही ना?”, तो स्वत:शीच पुटपुटला.

अविनाश अन त्या व्यक्तीचा काय संबंध? असे कीती तरी प्रश्न त्याच्या मनात घर करु लागले.

आता आकाश अविनाशचा गांभिर्याने विचार करु लागला.

एक पॉलिसी एजंट खरंच एवढे पैसे कमाऊ शकतो का? आकाशने स्वत:च्याच मनाला प्रतिप्रश्न केला. आता कुठेतरी पाणी मुरत असल्याचा संशय आकाशला येऊ लागला.

आकाशने लगेच कॉल करुन अविनाशला त्याच कॉफिशॉप मध्ये दुसऱ्या दिवशी सकाळी भेटायला सांगीतले.

दुसऱ्या दिवशी अविनाश कॉफी शॉप जवळ पोहोचला तोपर्यंत आकाश त्याची कॉफी शॉप मघ्ये कधी अविनाश बसलेला त्याच टेबलवर वाट बघत बसला होता.

आकाशची बाहेर गाडी बघून अविनाश आतमध्ये आला.

“हाय आकाश! अरे यार बियर शॉप मध्ये बोलवायचं तर कॉफी शॉप मध्ये कसला बोलवतोस”, अविनाश

“अरे कधी प्यायला आहेस का ईथली कॉफी; खुप मस्त असते”, आकाश

“नाही यार; कधीच नाही. इनफॅक्ट मी इथे पहिल्यांदाच येतोय. अन तुला माहीत आहेच न की मला कॉफी शॉप मध्ये इन्जोय करणाऱ्या मुली नाही तर बियर शॉप मध्ये किंवा पब मध्ये इन्जोय करणाऱ्या मुली आवडतात”, अविनाश

अविनाशचं बोलणं बरोबरच होतं; कारण तो नेहमी बियर बार किंवा पब मध्ये इन्जोय करणाऱ्या मुलींबरबरच असायचा.

पण “इनफॅक्ट मी इथे पहिल्यांदाच येतोय” हे वाक्य आकाशच्या पचनी पडले नाही.

आता तर अविनाश आपल्यापासून काहीतरी लपवतोय याची जास्त शंका आकाशला येऊ लागली.

काही जुजबी बोलणं झाल्यावर आकाशने मुद्दाम शहराबाहेर एक काम आहे अन मला उद्या एक महत्वाची मिटींग असल्यामुळे जाणे जमणार नाही. त्यामुळे त्या कामाची जबाबदारी मी तुझ्यावर सोपवतो असे बोलून अविनाशला शहराबाहेत पाठवण्याचा प्लान केला.

“अरे गुड तशी पण माझी उद्या एका क्लायंटकडे मिटींग आहे. तेथुनच मी तुझेही काम करेन”, अविनाश

अविनाशच्या होकारामुळे आता पुढचा प्लान आकाशला एक्सेक्युट करायचा होता. आकाश मनोमन सुखावला.

## ७

दुसऱ्या दिवशी सकाळीच आकाश अविनाशच्या घरी पोहोचला; अविनाशला काय काम होते ते समजावून सांगीतले. अविनाश बाहेर जाण्यास निघाला. परंतु आकाशने मुद्दाम बरेच दिवसाने आला आहे तर वहिनीच्या हातची कॉफी पिऊन जातो म्हणून थांबला.

अविनाशची वाईफ कॉफी बनवण्यात बिझी झाली तशी आकाशने अविनाशच्या घरातील ऑफिसकडे आपला मोर्चा वळविला.

बरेच शोधा-शोध करुन देखिल त्याला अविनाशच्या ऑफिस मधून काहीही आक्षेपार्ह मिळाले नाही. त्याने अविनाशच्या टेबलच्या खणामध्ये काही मिळते का? म्हणून पाहण्याचा प्रयत्न केला; परंतु टेबलाचे ड्रोव्हर लॉक होते.

अचानक त्याच लक्ष टेबलच्या एकदम शेवटच्या खणाकडे गेले. अन तो खण काहीसा पुढे आलेला त्याला भासला. त्याने खाली हात घालून तो खण थोडासा पुढे खेचुन पाहीला तर तो खण सहजा-सहजी बाहेर आला. त्याने त्या खणाची झडती घेतली पण त्यात त्याला त्याच्या कामाचे काहीच मिळाले नाही.

अचानक त्याचे लक्ष खणाच्या शेवटी गेले अन तिथे खणाच्या खाली काहीतरी अडकलेले त्याला दिसले. त्याने तो पुर्ण खण बाहेर खेचला तर खणाच्या खाली गुलाबी रंगाचा कागदाचा तुकडा त्याला सापडला. त्याने तो हातात घेऊन पटकन आपल्या खिशात कोंबला अन तो खण जशाचा-तसा लाऊन तो परत आपल्या जागी बसला.

तेवढ्यात अविनाशची वाईफ कॉफी घेऊन आली. आकाशने कॉफी घेतली अन तो आपल्या घराकडे निघाला.

आकाश घरी पोहोचला तेव्हा मालतीबाई काहीतरी वाचनात गुंग होत्या. आकाश आपल्या रुम मध्ये गेला.

त्याने ते सर्व कागदाचे तुकडे पुन्हा एकदा कपाटातून बाहेर काढले. तसेच आपल्या खिशात कोंबलेला तो गुलाबी रंगाचा कागदही त्याने बाहेर काढला. आता तो ते कागदाचे तुकडे अन त्या गुलाबी रंगाच्या कागदामध्ये काही लिंक लागते का हे पाहण्याचा प्रयत्नात गुंतला. बऱ्याच प्रयत्ना नंतर काही तरी मिळाल्या प्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा उमटली.

पण दुसऱ्याच क्षणी तो थोडासा खिन्न झाला. कारण आजपर्यंतचा त्याचा जिवलग अन एकुलता एक मित्र अशा काही प्रकरणात असेल असे त्याला वाटले नव्हते. काही काळासाठी तो फ्लॅश बॅक मध्ये गेला. आता त्याला सर्व काही आठवत होते.

अविनाश करत असलेली शान-शौकत, त्याचे चैनीत फिरणे, पैसे उधळणे अन त्याने जमवलेली माया......

आकाशच्या मनात प्रश्न पडला; एक पॉलीसी एजन्ट खरंच एवढे पैसे कमाऊ शकतो का? अन मग त्याला अविनाशबद्दल पडलेल्या सर्व प्रश्नांची उत्तर मिळु लागली.

त्याचा मोबाईल वाजला; स्क्रीनवर संध्याचे नाव झळाळत होते.

त्याने डोक्यावर हात दिला; कारण रोज न चुकता तो संध्याला भेटायला जात असे अन आज तो पुर्णत: विसरुन गेला होता.

त्याने फ्रेशनेस साठी पटकन चेहऱ्यावर थोडे पाणी मारले अन तो संध्याकडे जाण्यासाठी निघाला.

गाडी चालवत असताना अविनाशबद्दलचे अनेक विचार त्याच्या डोक्यात घोंगावत होते. तो ते टाळण्याचा प्रयत्न करत होता; परंतु त्याचा मेंदू आज त्याची साथ देत नव्हता.

त्याने आपल्या मनाला खुप समजावण्याचा प्रयत्न केला “की आपला मित्र अव्या असं काही करुच शकत नाही”. पण मागे भुतकाळात घडलेल्या घटना त्याला त्याच्या मतावर ठाम राहू देत नव्हत्या.

अचानक त्याचे लक्ष बाहेर मोबाईल वर बोलणाऱ्या व्यक्तीकडे गेले. अन तिथेच त्याची नजर खिळली.

आकाशने गाडी रस्त्याच्या कडेला घेतली अन तो त्या व्यक्तीचं निरिक्षण करु लागला. तिच व्यक्ती जिच्या मानेवर कसली तरी खुण होती; आकाशने ओळखले त्या व्यक्तीला. ती व्यक्ती कोणाशी तरी मोबाईल वर बोलत होती. आकाशने दुरुनच त्याच्यावर नजर ठेवली.

काही वेळाने त्या व्यक्तीने मोबाईल ठेवला अन तो आपल्या बाईक वरुन जाण्यास निघाला. आकाशने देखिल आपली कार संध्याच्या घराच्या दिशेने न घेता त्या व्यक्तीच्या मागे पळवली; पण ठराविक अंतर ठेऊनच.

आता ती व्यक्ती एका साध्या-सुध्या जिथे जास्त कुणी जात नाही अशा एका बियर बार मध्ये घुसली.

आकाशही त्या व्यक्तीच्या पाठो-पाठ त्या बियर बारच्या दरवाज्यातून आत शिरला; पण क्षणार्धात पुन्हा दोन पावलं माघारी आला.

ती व्यक्ती जिथे बसलेली होती, बरोबर त्याच्या समोर अविनाश बसलेला होता. अन त्यांच्यात काहीतरी बोलणे चालु होते.

आकाश पार्टीशिअन चा आडोसा घेत त्यांच्यात काय बोलणे चालले आहे ते ऐकत होता.

इतक्यात समोरुन एक वेटर आकाशच्या दिशेने आला; तो आकाशला टेबलवर बसण्याची विनंती करणार इतक्यात आकाशने खुणेनेच त्याना गप्प बसण्यास सांगीतले; अन तो वेटर जवळ येताच त्याच्या खिशात पाचशे रुपयाची नोट कोंबली.

तो वेटर खुश होऊन तेथुन निघून गेला; त्याने पुन्हा आकाशकडे लक्षही दिले नाही. आता आकाश पार्टीशिअन ला असलेल्या होलातून त्यांच्यात काय चालले आहे ते पाहत होता.

ती खुण असलेल्या व्यक्तीने आपल्या सोबत आणलेले एक पार्सल अविनाश समोर टेबलवर ठेवले अन ते खोलु लागला. काही क्षणातच आकाशला एक जोराचा धक्का लागला; ते पार्सल म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून संध्याची बॅंकेतून चोरी झालेली बॅग होती.

संध्याची बॅग बघताच आकाशला मनातून वाटू लागले, आत्ता तेथे जाऊन दोघांच्याही कॉलर पकडून दोघांनाही पोलिसांच्या तावडीत द्यावे.

पण अजून पुढे काय होते हे पाहण्यासाठी तो तिथेच स्थिरावला.

अविनाशने त्या बॅगेची खालून शिलाई उसवली अन दोन्ही बाजुने दोन पॅकेट्स काढली. अन तो त्या व्यक्तीकडे पाहून हसु लागला.

ती पॅकेट्स पाहताच आकाशला समजायला जरा देखिल वेळ लागला नाही की ती पॅकेट्स ब्राऊन शुगरची आहेत.

ती पॅकेट्स पाहताच अविनाशच्या समोर बसलेल्या व्यक्तीच्या मनाची चल-बिचल झाली; अन ती व्यक्ती अविनाशकडे वेगळयाच नजरेने पाहु लागली.

अविनाशने त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरचे भाव अन नजर लगेच ओळखली. त्याने दुसऱ्याच क्षणी आपल्या खिशातून एक पिस्तुल बाहेर काढले अन टेबलवर ठेऊन त्यावर आपला रुमाल टाकला.

आता ती व्यक्ती देखिल जरा भेदरली अन सावरुन बसली.

अविनाशने आपला मोबाईल काढला अन त्याने कुणाला तरी फोन लावला.

जसा समोरच्या व्यक्तीने फोन उचलला तसा पहिले तर अविनाशने त्याला शिव्यांची लाखोली वाहीली. “काय रे भXX, पन्नास लाखाचा माल असलेली बॅग तुझा माणुस पन्नास रुपयाच्या वस्तु प्रमाणे घेऊन येतो; कुणी उडवली असती तर बॅग” , अविनाश रागातच बोलला

बॉस, पुन्हा अशी चुकी नाही होणार, समोरची व्यक्ती शक्य तितक्या अदबीने बोलत होती.

“हम्म! ऐका आता तुमच्या छोट्या-मोठ्या चोऱ्या, दरोड्याची कामं सोडा अन माझ्या हाताखाली माझ्या बिझीनेस मध्ये सामिल व्हा; मी माझा बिझनेस  वाढवत आहे”, अविनाश

“तुम्हालाही भरपुर पैसे मिळतील; फक्त माझ्या आदेशाचं पालन करा”, अविनाश

अविनाशचे शब्द ऐकताच ती समोरची व्यक्ती कमालीची खुश झाली.

“आणखी ऐक; उद्या संध्याकाळी 7.00 वाजता मी माझ्या फार्म हाऊस वर बिझनेस पार्टी ठेवली आहे; तिथे आपल्या धंद्यातले सर्व बिझनेसमन येणार आहेत. तर तू आपली सर्व माणसं तिथे बंदोबस्तासाठी लाव; अन तू पण जातीने तेथे हजर राह, काही चुकी झाली तर मी कुणाचीही हय-गय करणार नाही”, अविनाश

ओके बॉस, असे बोलून त्या व्यक्तीने फोन ठेऊन दिला.

“पण बॉस ही पॅकेट्स या बॅग मध्ये कशी?”, ती व्यक्ती

अविनाश त्याला सांगु लागला “विमान तळावरुन ही पॅकेट्स बाहेर काढताना आमचा माणुस पकडला जाऊ नये म्हणून त्याने फॉरेन वरुन आलेल्या नविन मालाच्या लॉट मधील एका बॅग मध्ये ही पॅकेट्स लपविली होती.”

लकीली ती बॅग सिक्युरीटी चेक मधून सेफली बाहेर पडली; अन तो लॉट तिथुन एका दुकानात पोहोचला; दुकान दाराकडे चौकशी केली असता ती बॅग विकली गेल्याचे समजले. अन आता काही दिवसातच आमच्या त्या माणसाने ती बॅग अमुक एका लेडीकडे असल्याची आम्हाला टीप दिली. त्यांचे बोलणे ऐकून आकाशने देखिल तेथुन कल्टी मारली.

कार ड्राईव्ह करता-करता आकाशला पुन्हा अविनाशचे सर्व शब्द आठवु लागले. अविनाशचा फार्म हाऊस? अन मला कधी काहीच सांगीतले नाही अव्याने, तसं पण तो असे काही धंदे करतो असे देखिल कुठे सांगीतले त्याने आपल्याला, आकाश स्वत:शीच पुटपुटला.

नंतर आकाशने आपल्या दिमागावर थोडा जोर दिला अन त्याला आठवलं.....

अविनाशने बऱ्याचवेळा एकाच फार्म हाऊसवर पार्ट्या केल्या आहेत. पण तो तर बोलला होता की हा त्याच्या एका मित्राचा फार्म हाऊस आहे.", आकाश स्वत:शीच पुटपुटला.

एक-दोन वेळा आकाशही अविनाश सोबत त्या फार्म हाऊस वर पार्टीला गेला होता. पण त्या अविनाशच्या पर्सनल पार्ट्या होत्या. आकाशच्या मनात पार्टीच्या आठवणी ताज्या झाल्या.

आकाशला पुर्ण प्रकरणाची कल्पना आली; तसेच आपला जिवा-भावाचा मित्र किती मोठ्या जाळयात गुंतला आहे ह्याचे देखिल त्याला दु:ख वाटत होते.

पण मनाशी खंबीर राहून शेवटी आकाशने पोलिसांना ह्या सर्वाची कल्पना देण्याचा निर्धार केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आकाश पोलिस स्टेशनला पोहोचला तेव्हा इन्स्पेक्टर ढोले आपल्या सिनियर सोबत बोलण्यात गुंतले होते.

तिथल्या एका हवालदाराने आकाशची विचारपुस केली.

"मला इन्स्पेक्टर ढोलेंना भेटायचे आहे", आकाश

" हे बघा ढोले साहेब आता ACP साहेबांसोबत मिटींग मध्ये व्यस्त आहेत; तुम्ही त्यांची वाट बघु शकतात", हवालदार

"अरे उत्तमच आहे; मला एका खुप महत्वाच्या प्रकरणावर बोलायचं आहे, अन तुमचे ACP साहेब पण असतील तर उत्तमच होईल", आकाश

"तुम्ही ढोले साहेबांना माझं हे कार्ड द्या. ते मला चांगलेच ओळखतात", आकाश

“ठिक आहे साहेब”, हवालदाराने थोडे कचरतच आकाश जवळून आकाशचे व्हिजिटींग कार्ड घेतले अन तो मिटींग रुम मध्ये भित-भितच शिरला.

(आकाशची बिझनेसमन म्हणून बऱ्याच जणांबरोबर ओळख होती; त्यातीलच एक ढोले साहेब; जे नेहमी आकाशच्या मदतीसाठी तत्पर असतं)

जवळ-जवळ १५-२० मिनिटांनी त्या हवालदाराकरवी ढोले साहेबांनी आकाशला मिटींग रुम मध्ये बोलाविले. आकाश जेव्हा मिटींग रुम मध्ये शिरला तेव्हा तेथे असलेले काही इन्स्पेक्टर्स मिटींग आटपून बाहेर पडले. आता तिथे फक्त ढोले साहेब अन ACP दोघेच होते.

“ या मिस्टर आकाश; तुमचा मॅसेज मिळाला. प्रकरण खुप गंभीर आहे का? नाही तर तुम्ही असं मिटींगमध्ये मला कधी डिस्टर्ब केलेला आठवत नाही.”, इन्स्पेक्टर ढोले

“ हो खुप महत्वाच बोलायचं आहे मला”, आकाश

“हा बोला मिस्टर आकाश”, इन्स्पेक्टर ढोले

त्या नंतर आकाशने संध्या काम करत असलेल्या बॅंकेवर पडलेला दरोडा, त्यामध्ये संध्याला लागलेली गोळी, संध्याच्या बॅगचा अन त्या दरोडेखोरांचा- अविनाशचा संबध; सर्व काही इन्स्पेक्टर ढोले अन ACP साहेबांना सांगीतले.

“आज सर्व ड्रग्ज माफियांची संध्याकाळी 7.00 वाजता अविनाशच्या फार्म हाऊसवर पार्टी आहे”, आकाशने इन्स्पेक्टर ढोलेंना सांगीतले.

त्यानंतर इन्स्पेक्टर ढोले, ACP आणी आकाश तिघेही मिळून संध्याकाळच्या पार्टीवर टाकायच्या छाप्याचे प्लानिंग करु लागले.

इन्स्पेक्टर ढोलें नी आकाशकडून जेवढी माहीती मिळेल तेवढी काढुन घेतली. अन ACP नी तत्काळ फोन करुन जास्तीत जास्त पोलिस फोर्स मागवून घेतली. आता पोलिसांचा अविनाशच्या फार्म हाऊसवर छापा मारण्यासाठी फुलप्रुफ प्लान तयार होता. ACP नी आपल्या मर्जीतल्या अन आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ असलेल्या ८-१० पोलिसांना संध्याकाळच्या त्या पार्टीत साध्या वेशात मिक्स व्हायला सांगीतले.

# ८

साध्या वेशातील पोलिस वेश बदलून अविनाशच्या फार्म हाऊसकडे संध्याकाळी ६.०० वाजता रवाना झाले. बाकीचा पोलिस ताफा त्या साध्या वेशातील पोलिसांच्या पुढील ऑर्डरची वाट पाहत आकाशच्या फार्म हाऊसपासून १ किलोमिटरच्या परीसरात थांबणार होते.

अविनाशच्या फार्म हाऊस बाहेर गुंडांचा कडक बंदोबस्त होता; पण वेश पालटलेल्या पोलिसांना फार्म हाऊस मध्ये शिरायला जास्त कष्ट करावे लागले नाही. कारण तेथे पार्टी साठी येणाऱ्या खुप लोकांमध्ये मिसळल्यामुळे त्या गुंडांना पोलिस असल्याचे ओळखणे शक्य झाले नाही.

सर्व साध्या वेशातील पोलिसांनी प्रथम फार्म हाऊची निट पाहणी केली.

प्रत्येका जवळ कम्युनिकेशनसाठी ब्ल्युटुथ डिवाईस असल्यामुळे समोरा-समोर न येता ते परस्परांशी संवाद साधत होते.

आता जवळ-जवळ पार्टी मध्ये येणारे सर्व लोक फार्म हाऊस वर जमले होते.

फार्म हाऊसवर जास्त झगमग नव्हती पण पार्टी साठी लागणारी सर्व व्यवस्था तिथे केली गेली होती.

पार्टीची शान वाढवण्या साठि काही नर्तकींना देखिल बोलवण्यात आले होते; अन त्या पार्टीत चालु असलेल्या गाण्यावर ठेका धरुन स्टेजवर नाचत होत्या.

पार्टीतला सर्व जमाव ड्रींक घेत-घेत त्यांना नाचताना न्याहळत होता; तर काही शौकीन लोक त्या नाचनाऱ्या नर्तकींचे रुप अन नाचण्याच्या ढंगावर फिदा होऊन त्यांच्यावर पैशाची उधळण करत होते. पार्टीने चांगलाच जोर धरलेला होता.

अविनाश एका मोठ्या टेबलावर काही बिझनेसमन लोकांसोबत बोलण्यात व्यस्त होता; कदाचीत त्यांच्यात काहीतरी बिझनेस डिल चाललेलं असावं

सर्व वेश पालटलेल्या पोलिसांनी ब्ल्युटुथ डिवाईस द्वारे एक-मेकांशी संवाद साधला; त्यांच्यात काही तरी एकमत झाले.

अन त्या साध्या वेशातील पोलिसांच्या म्होरक्याने बाहेर थांबलेल्या पोलिसांच्या ताफ्याशी संवाद साधून त्यांना अविनाशच्या फार्म हाऊसला बाहेरुन घेराव घालण्याचे आदेश दिले.

१५ ते २० मिनिटांमध्येच सर्व पोलिस ताफा अविनाशच्या फार्म हाऊसवर पोहोचला, अन त्यांनी पुर्ण फार्म हाऊसला घेराव घातला.

अचानक आलेल्या एवढ्या मोठ्या पोलिस फोर्सला पाहून तिथे बाहेर असलेल्या सर्व गुंडांना दरदरुन घाम फुटला; सर्वांची एकच भांबेरी उडाली. काही गुंडांनी पोलिसांवर बंदुका ताणल्या, तर काही गुंड आतमध्ये पोलिसांनी आपल्याला घेरल्याची कल्पना देण्यासाठी गेले.

आता आतमधील वातावरण देखिल कमालीचे भितियुक्त झाले. ज्याला-त्याला काय करावे नी काय नाय, काहीच सुचत नव्हते.

बाहेरुन स्पिकर वरुन पोलिसांनी पत्येकाला क्षरणागती पत्कारुन बाहेर येण्याचे आवाहन केले.

पण अविनाश अन त्याच्या बिझनेस पार्टनरनी आपल्या आतील सर्व गुंडांना पोलिसांशी लढा देऊन आपण कसेतरी येथुन निसटु या उद्देशाने बाहेर पाठविले. अन ते निसटण्याचा प्लान बनवु लागले.

आतील सर्व गुंड बाहेर जाताच वेश पालटलेल्या पोलिसांनी परिस्थितीचा फायदा घेत अविनाश अन त्याच्या बिझनेस पार्टनरवर आपल्या बंदुका ताणल्या.

अविनाश अन त्याच्या बिझनेस पार्टनरला काही उमगण्याच्या आतच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले अन ते त्यांना फार्म हाऊसच्या मुख्य दरवाज्याजवळ घेऊन आले.

आपले सर्व बॉस पोलिसांच्या हाती लागल्याचे पाहून बाहेर पोलिसांशी लढा देणाऱ्या सर्व गुंडांचे अवसान गळून पडले अन त्यांनी देखिल पोलिसां समोर शरणागती पत्कारली.

पोलिसांनी सर्व गुंडांना बेड्या ठोकल्या अन स्पेशल वॅन मध्ये सर्वांना भरुन वॅन पोलिस हेड क्वार्टरला रवाना झाली.

पोलिसां सोबत आकाशला पाहून अविनाश अचंब्यात पडला होता; दोघांनीही एक-मेकांना पाहून देखिल त्या क्षणाला आपली ओळख देण्याचे टाळले होते.

पोलिस हेड क्वार्टरला पोहोचल्यावर सर्व प्रथम अविनाश ने आकाशशी बोलण्याची इच्छा पोलिसांसमोर प्रकट केली.

आकाशने अगोदरच इन्स्पेक्टर ढोलेंना त्याच्या अन अविनाशच्या मैत्रीची कल्पना दिलेली असल्यामुळे इन्स्पेक्टर ढोलेंनी देखिल आपल्या सिनिअर्सशी सल्ला-मसलत करुन अविनाशला आकाशशी बोलण्याची परवानगी दिली.

अविनाश वेटींग रुम मध्ये बसला होता. आजु-बाजुला दोन-चार हवालदार देखिल होते. आकाश वेटींग रुम मध्ये आला; तेथिल हेड कॉन्स्टेबलशी काहीवेळ बोलल्यानंतर ते चारही हवालदार त्या दोघांना एकटे सोडून काही काळासाठी बाहेर गेले. दोघांना एक-मेकांशी बोलण्यासाठी किमान अर्धा तासाची वेळ पोलिसांनी दिली होती.

अविनाशनी बोलण्यास सुरवात केली. “आकाश तू पोलिसांना सामिल असेल ह्याची मला तुझ्याकडून अपेक्षा नव्हती.”

अन तू एवढा मोठा ब्राऊन शुगरचा डिलर असेल असे मी स्वप्नात देखिल विचार केला नव्हता; अन असे मला माहीत असते न तर मी तुझ्याशी कधी मैत्री देखिल ठेवली नसती; You bloody.... एवढे बोलून आकाशने तिथेच आपले वाक्य तोडले.

त्यानंतर दोघांमधील वाद खुप विकोपाला जाऊन हाता-पायी होण्या अगोदर पोलिसांनी अविनाशला लॉक-अप मध्ये टाकले अन आकाशला समजाऊन घरी जाण्यास सांगीतले.

आकाश पोलिस स्टेशन मधून बाहेर पडत होता; अन अविनाश लॉक-अप मधूनच आकाशला धमक्या देत होता.... तुला मी पाहून घेईन, संध्या सारखीच तुझ्या फॅमीलीतील प्रत्येक मेंबरची अवस्था करेन इ.

# ९

पाच महिन्यानंतर.......

पाच महीने उलटून गेले होते; अविनाश त्याच्या सर्व साथीदारांसह जेल मध्ये सडत पडला होता; कोर्टाने अर्जंट बेसवर त्याची केस निकाली लाऊन सर्वांना कडक शासन केले होते.

इथे आकाश अन निशाचे लग्न होऊन दोन महिने झाले होते. दोघेही आपल्या संसाराची घडी बसवण्याचा प्रयत्न करत होते. विशेष म्हणजे संध्याने आग्रह करुन आकाशला निशाशी लग्न करण्यास भाग पाडले होते. (अर्थात आकाशने निशाशी लग्न करावे अशी मालतीबाईंची इच्छा होती. पण आकाशने त्यांचे ऐकले नसते म्हणून त्यांनी संध्याला आकाशने निशाशी लग्न करण्यास मनवावे असे सुचविले होते.)

आकाशने सुरुवातीला मला फक्त तुझ्याशीच लग्न करायचे आहे असे संध्याला सांगीतले होते; पण संध्याने वारंवार तू निशाशीच लग्न कर असे बोलून तसेच आकाशला काही शपथा घालून आकाशला निशाशी लग्न करण्यास भाग पाडले.

आकाशही शेवटी एका अटीवर तयार झाला की मी निशा सोबत लग्न करेन पण तू कायमची माझ्या घरीच राहायचं. तसे पण संध्याला आलेल्या कायमच्या अपंगत्वामुळे आता तिचे मन दुससे कुणा सोबत संसार थाटण्यासाठी तयार नव्हते; शेवटी तिने आकाशची अट मान्य केली.

आज तिघांच्या जिवनाचा तो त्रिकोण पुर्ण झाला होता; ते तिन्ही कोन एक-मेकांना पुरक होते, अन आनंदी देखील होते.

संध्या आणि निशा दोघींनीही एक-मेकींना आकाशच्या पत्नी म्हणून स्विकार केला होता. एकंदरीत तिघांचे जिवन आनंदी चालले होते.

------------- समाप्त --------------

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात,

अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com